रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक १५९ | पृष्ठे १० | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




# कृषीवल

रायगड, रविवार, दि. १६ नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹

## दीडशेहून अधिक उमेदवारी अर्ज दाखल

**रायगड :** रायगड जिल्ह्यातील दहा नगर परिषदांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया चार दिवसांपासून सुरू झाली आहे. शनिवार (दि. १५) पर्यंत एकूण १५३ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. त्यात १४० नगरसेवक व १३ नगराध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली. रायगड जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, श्रीवर्धन, मुरूड-जंजिरा, रोहा, महाड, पेण, उरण, कर्जत, माथेरान या दहा नगरपरिषदांच्या थेट नगराध्यक्ष पदासाठी दहा, तर नगरसेवक पदासाठी २१७ जागांसाठी निवडणूक होणार आहे. सोमवार (दि.१०)पासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. सुरुवातीचे दोन दिवस एकहा पान २ वर

## वेधक

### महायुतीत जुंपली

**मुंबई :** महानगरपालिकेची निवडणूक अद्याप जाहीर झालेली नसली तरी महापौरपदाच्या दाव्यांमुळे महायुतीत खडाजंगी सुरू झाली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी, 'मुंबईत महायुतीची सत्ता येणार, महापौर भाजपचाच' असे ठाम विधान केले आहे. मात्र, रवींद्र चव्हाण यांच्या वक्तव्यानंतर महायुतीत चांगलीच जुंपल्याचे चित्र आहे. भाजपने महापौरपदाचा दावा केल्यानंतर शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी रवींद्र चव्हाणांवर पलटवार केला आहे. 'मुंबई महापालिकेच्या महापौरपदाबाबत चव्हाणांनी केलेल्या वक्तव्याला आम्ही फारसे महत्त्व देत नाही. अंतिम निर्णय मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री घेतील. जोपर्यंत युती होत नाही, तोपर्यंत भाष्य करणे योग्य नाही, असे शिरसाट म्हणाले.

### राज्य गारठणार

**मुंबई :** नोव्हेंबर महिन्यातही अवकाळी पावसाने हजेरी लावल्यानंतर आता अखेर पावसाने परतीची वाट धरली आहे. यामुळे आता राज्यभरात गार वारे वाहात असून, हवामान विभागाने महाराष्ट्रात थंडीच्या लाटेचा अंदाज व्यक्त केला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ईशान्येकडून वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे महाराष्ट्रात गारठा वाढत असून, येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये किमान तापमान आणखी खाली घसरण्याची शक्यता आहे. यामुळे मुंबईसह इतर जिल्ह्यात थंडी वाढणार आहे. उत्तर मध्य महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांमध्ये शनिवारपासून तर मराठवाड्याच्या काही जिल्ह्यांमध्ये रविवारपासून (दि. १६) थंडीच्या लाटा पसरणार आहेत, अशी माहिती हवामान विभागाने दिली.

### ई-सिगारेटची विक्री; गुन्हा दाखल

**पनवेल :** ई-सिगारेट विक्री प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात १३ नोव्हेंबर रोजी अर्षद मोहम्मद सलीम शेख आणि मिथलेश माणिकचंद साहू यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सी लाईन आयटीएम कॉलेजजवळील कॅफे नाईन पान शॉप आणि सौरभ पान शॉप सेक्टर चार, बेलपाडा, खारघर येथे कॅफे नाईन पान शॉपमध्ये अर्षद मोहम्मद सलीम शेख आणि सौरभ पान शॉपमध्ये मिथलेश माणिकचंद साहू यांच्याकडे प्रतिबंधित सिगारेट सापडून आले. ३४ हजारांचे १७ ई-सिगारेट पोलिसांनी जप्त केले. पनवेल, कळंबोली, खारघर, कामोठे, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, तळोजा आदी परिसरात ई-सिगारेट खुलेआमपणे विकले जात आहेत.

### १७ लाख तीन हजारांची फसवणूक

**पनवेल :** ओमकारा प्राईड या इमारतीमध्ये फ्लॅट खरेदी करण्यास इच्छुक असणाऱ्या सहा ग्राहकांकडून १७ लाख ३ हजार रुपये घेऊन ती रक्कम कंपनीकडे जमा न करता रकमेचा अपहार केल्याप्रकरणी विनायक प्रभाकर लोखंडे (रा. कानसई, सेक्शन, अंबरनाथ पूर्व) याच्याविरोधात ११ नोव्हेंबर रोजी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सुभाषू सुभाष बिस्वाल हे खारघर, सेक्टर २७ येथे राहात असून, त्यांचे रियल इस्टेट क्षेत्रात काम करणारी कंपनी आहे. ते विविध बिल्डर्सने बांधलेले इमारतीतील फ्लॅट ग्राहकांना विकणे, मार्केटिंग करणे व जाहिरात करण्याची कामे करतात. घोटगाव येथे ओंकारा प्राईड ही बिल्डिंग पान २ वर

# प्रशासनाचा डाव, शेतकऱ्यांवर घाव

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

**अलिबाग तालुक्यातील धेरंड शहापूर येथील प्रस्तावित सिनारमास प्रकल्पाचा विषय सध्या चांगलाच चर्चेत आला आहे. स्थानिकांना विश्वासात न घेता प्रशासकीय अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सीमांकन करण्याची प्रक्रिया सुरु केली. मात्र, स्थानिकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. त्यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करुन तोडगा काढण्याचा पर्याय उपस्थित अधिकाऱ्यांना दिला होता. त्यानुसार २१ नोव्हेंबर रोजी बैठकीचे आयोजनही करण्यात आले होते. असे असतानाही दुसऱ्याच दिवशी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी पोलीस बळाचा वापर करीत पोहोच रस्त्याच्या भरावाला सुरुवात केली. स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी विरोध दर्शविताच त्यांना बेकायदेशीरपणे पोलीस ठाण्यात नेण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेत जिल्हाधिकारी किशन जावळे तसेच उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी फोन बंद ठेवून बघ्याची भूमिका घेतली. त्यामुळे हा संपूर्ण प्रकार पूर्वनियोजित असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. यावेळी प्रशासन बळाचा वापर करुन शेतकऱ्यांची गळचेपी करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे वास्तव शनिवारी (दि.१५) समोर आले.** पान २ वर

## जिल्हाधिकाऱ्यांसह प्रांत अधिकाऱ्यांचे फोन बंद

## पोहोच रस्त्याच्या भरावाला सुरुवात

## शेतकरी, ग्रामस्थांवर पोलीस बळाचा वापर




(छायाचित्र : समीर मालोदे)

### उपरे नको, स्थानिकांना घ्या

सिनारमास प्रकल्पापर्यंत पोहोच रस्ता करण्यासाठी एमआयडीसीद्वारे भरावाचे काम एका बाहेरील ठेकेदाराला देण्यात आले. स्थानिकांना विश्वासात न घेता, काम सुरु केल्याने संताप व्यक्त करण्यात आला. यावेळी स्थानिकांनी उपरे नको, स्थानिकांना रोजगार द्या, अशी मागणी केली.

"धेरंड, शहापूर भूसंपादन प्रकिया अपूर्ण अवस्थेत आहे. तरीदेखील बळजबरीने पोलिसांचा धाक दाखवून पोहोच रस्त्याचे काम सुरु करण्यात आले. प्रकल्पासह विकासाला विरोध नाही. परंतु, पुनर्वसनाबाबत बोलण्यास अधिकारी तयार नाही. भरपाईची वाच्यता होत नाही. संपादनाचा रुपयादेखील शेतकऱ्यांना मिळाला नसताना, त्यांची मुस्कटदाबी करीत भराव करण्यात आला आहे. बेकायदेशीर ताबा घेतला जात आहे. बाधित घरे, गोठे आदींचा सकारात्मक विचार व्हावा. सकारात्मक चर्चा होत नाही, तोपर्यंत हा लढा सुरूच राहणार आहे. मस्त ग्रामस्थ धाकटे शहापूर येथील स्मशानभूमीवर उपोषण करतील.

– ॲड. मानसी म्हात्रे,
शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख"

### आज होणार पंचनामा

पोहोच रस्त्याच्या कामासाठी भराव करण्यात आला होता. काही माती, खडीचा भराव करण्याबरोबरच जेएसडब्ल्यू कंपनीतील स्लॅग (टाकाऊ खडी) देखील टाकण्यात आली. या भरावामुळे परिसरातील शेतकरी, ग्रामस्थांचे प्रचंड नुकसान झाले. शेततळ्याची हानी झाली आहे. शेतकऱ्यांच्या आक्रमक भूमिकेनंतर रविवारी (दि.१६) सकाळी दहा वाजता पंचनामा होणार असल्याची माहिती एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी भानुदास यादव यांनी दिली.

### जिल्हाधिकारी झोपले; ग्रामस्थ थकले

संपूर्ण गाव रस्त्यावर उतरला होता. एमआयडीसीचे अधिकारी भराव करीत होते. महिला आपली जागा वाचविण्यासाठी जिवाचा आकांत करीत होत्या. जेसीबी अडविण्याचा प्रयत्न करीत होत्या. परिस्थिती चिघळली होती. वातावरण तापले होते. अशातच पोलिसांनी महिलांसह गावातील नागरिकांना पोलीस ठाण्यात नेले. त्यावेळी शेतकरी जिल्हाधिकारी किशन जावळे तसेच प्रांत अधिकाऱ्यांसह संबंधित अधिकाऱ्यांना फोन लावून परिस्थिती सांगण्याचा प्रयत्न करीत होते. मात्र, अधिकारी फोन बंद ठेवून निश्चिंत होते. त्यामुळे संतप्त जमावाने जिल्हाधिकारी झोपले असल्याची टीका करीत अधिकाऱ्यांच्या भूमिकेचा निषेध व्यक्त केला.

# अलिबागमध्ये आघाडीचे शक्तिप्रदर्शन



(छायाचित्र : समीर मालोदे)

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबाग नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासहनगरसेवकपदासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी मोठे शक्तीप्रदर्शन करीत शनिवारी, दि. १५ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. महाविकास आघाडीकडून नगराध्यक्ष पदासाठी अक्षया नमिता प्रशांत नाईक यांनी, तर नगरसेवक पदासाठी प्रशांत नाईक यांच्यासह वीस जणांनी उमेदवारी अर्ज भरले. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार विक्रम पाटील, मुख्याधिकारी सागर साळुंखे यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले.

थेट नगराध्यक्ष पदासाठी अक्षया नाईक, नगरसेवक पदासाठी प्रभाग एकमधून संतोष मधुकर गुरव, संध्या शैलेश पालवणकर, प्रभाग दोनमधून सुषमा नित्यानंद पाटील, प्रशांत मधुसूदन नाईक, प्रभाग तीनमधून साक्षी गौतम पाटील, आनंद अशोक पाटील, प्रभाग चारमधून रेश्मा मनोहर थळे, महेश वसंत शिंदे, प्रभाग पाचमधून निवेदिता राजेंद्र वाघमारे, समीर मधुकर ठाकूर, प्रभाग सहामधून ऋषीकेश रमेश माळी, अश्विनी ठोसर, प्रभाग सातमधून ॲड. मानसी संतोष म्हात्रे, अभय म्हामुणकर, प्रभाग आठमधून ॲड. निलम किशोर हजारे, अनिल चोपडा, प्रभाग नऊमधून योजना प्रदीप पाटील, सागर शिवनाथ भगत, प्रभाग दहामधून शैला शेषनाथ भगत, वृषाली महेश भगत यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी सर्व उमेदवार व कार्यकर्ते शेकाप भवन येथे जमले होते. दरम्यान, उमेदवारांनी शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील, अलिबागच्या माजी नगराध्यक्षा सुनिता नाईक, ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, द्वारकानाथ नाईक, जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी सुप्रिया पाटील यांनी सर्व उमेदवारांचे औक्षण केले. शेतकरी भवनसमोर हातात लाल झेंडा घेऊन कार्यकर्त्यांनी गर्दी केली. एक वेगळा उत्साह कार्यकर्त्यांमध्ये दिसून आला. फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. दरम्यान, असंख्य कार्यकर्ते मोठ्या उत्साहाने शेतकरी भवन येथे दाखल झाले होते. त्यांनी उमेदवारांना भेटून शुभेच्छा दिल्या. त्यानंतर दुपारी सर्व उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

- **नगराध्यक्ष पदासाठी अक्षया नाईक यांचा अर्ज दाखल**
- **नगरसेवक पदासाठी प्रशांत नाईक यांच्यासह वीस जणांनी भरले अर्ज**

### कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

अलिबाग नगरपरिषदेची निवडणूक प्रदीर्घ कालावधीनंतर होणार आहे. सध्या नगरपरिषदेवर राजकीय राजवट आहे. अक्षया नाईक यांच्या रुपाने महिलाराज येणार आहे. शनिवारी दुपारी अलिबाग नगरपरिषदेसमोर कार्यकर्त्यांनी गर्दी केली. अर्ज भरण्याचा दिवस असल्याने कार्यकर्ते हा क्षण डोळ्यात टिपण्यासाठी सकाळी नऊ वाजल्यापासून शेकाप भवनसमोर जमले होते. शहरातील कार्यकर्त्यांसह ग्रामीण भागातील कार्यकर्तेदेखील यामध्ये सहभागी झाले होते. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये एक वेगळा उत्साह दिसून आला.

### उमेदवारांवर शुभेच्छांचा वर्षाव

अलिबाग नगरपरिषदेच्या थेट नगराध्यक्ष पदासाठी अक्षया नाईक तसेच नगरसेवक पदासाठी प्रशांत नाईक यांच्यासह वीस जणांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे अक्षया नाईक यांच्यासह नगरसेवक पदाच्या उमेदवारांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांसह सर्व क्षेत्रातील मंडळींकडून शुभेच्छा देण्यात आल्य. यावेळी नव्या चेहऱ्यांना निवडणुकीत संधी देण्यात आली आहे. राजकीय व सामाजिक वारसा असलेल्या अक्षया नाईक यांच्या रुपाने उच्च शिक्षित, समाज कार्याची आवड असणारा उमेदवार शेकाप, महाविकास आघाडीला मिळाला. नवे विचार, नवे व्हिजन घेऊन अक्षया नाईक राजकीय रिंगणात उतरल्या आहेत. अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या त्या धाकट्या कन्या आहेत. वडिलांकडून मिळालेला राजकीय, सामाजिक संस्कारांचा वारसा जनतेच्या हितासाठी जपण्याचे काम त्या करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे.

# शेजारधर्माला फासला काळीमा

- **गळा आवळून चिमुकल्याचा जीव घेतला**
- **नेरळ पोलीसांनी केला आरोपी महिलेचा पर्दाफाश**

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील वारे ग्रामपंचायत हद्दीतील कुरकुलवाडी या वस्तीमध्ये शेजारधर्माला काळिमा फासणारी व हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली आहे. शेजाऱ्यांच्या क्षुल्लक वादातून थेट अडीच वर्षांच्या निरागस चिमुकल्याचा गळा आवळून खून करण्यात आल्याने संपूर्ण तालुका हादरला आहे. शेजाऱ्याची मुले माझ्या मुलांना मारतात म्हणून मी त्याला मारले, अशी धक्कादायक कबुली आरोपी जयवंता गुरुनाथ मुकणे हिने पोलिसांसमोर दिली आहे. मयत चिमुकल्याचे नाव जयदीप गणेश वाघ पान २ वर



### तपासात गुन्हा उघड

या घटनेच्या आदल्या दिवशी म्हणजेच ८ नोव्हेंबर रोजी आरोपी महिलेने मृत मुलाच्या चार वर्षांच्या मोठ्या बहिणीचाही गळा आवळून ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. तो प्रयत्न फसला आणि दुसऱ्या दिवशी मुलगा एकटाच आढळताच आरोपीने त्याचा जीव घेतला. आरोपी जयवंता मुकणे हिने गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीलादेखील तीन मुले असून, दोन जुळी मुले दीड वर्षांचे, एक मोठा मुलगा बहिणीला दत्तक दिलेला आहे.

# कोट्यवधीचे अमली पदार्थ जप्त

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

नवी मुंबईला नशामुक्त करण्याच्या उद्देशाने पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दिलेल्या सूचनांनुसार अमली पदार्थ विरोधी पथकाने तळोजा परिसरातील एका फ्लॅटवर छापा मारुन अमली पदार्थाच्या रॅकेटचा पर्दाफाश केला. या कारवाईत पोलिसांनी नवज्योतसिंग उर्फ विकी रंधावा (३४) आणि गुरज्योतसिंग उर्फ सनी रंधावा (३२) या दोन भावांना अटक करुन त्यांच्याजवळ सापडलेले तब्बल १ कोटी १७ लाख १९ हजारांचे हेरॉईन आणि अफीम जप्त केले आहे. पोलिसांनी आता या रॅकेटमध्ये सहभागी असलेले पुरवठादार व सब डीलर अशा पाच जणांचा शोध पान २ वर

# विवाहितेची आत्महत्या

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

विवाहितेने आत्महत्या केल्याप्रकरणी पती गिरीश वत्स आणि सासू सुमन सुभद्रा कुवर यांच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात १३ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

पूनम सिंग यांचे लग्न एप्रिल २०२५ मध्ये गिरीश वत्स यांच्याशी चंद्रपूर येथे झाले. ते खारघर सेक्टर ३५ जी येथे राहण्यासाठी आले. मात्र, त्यांच्यात भांडणं होत होती. बाहेरून पैसे आणण्यासाठी तिच्या मागे तगादा लावत होते. आणि तिला मानसिक त्रास देत होते. त्यामुळे पाच नोव्हेंबर रोजी लोखंडी हुकाला गळफास घेऊन पूनम हिने आत्महत्या केली. याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# कार पाण्यात पडून चालकाचा मृत्यू

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

सायन-पनवेल महामार्ग खारघर खाडी पुलावरुन एक पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारचा भीषण अपघात झाला आणि कार थेट पाण्यात कोसळली. यात कार चालक जोबिन बेनिदीप्त (४२) याचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली.

स्विफ्ट कार क्रमांक केए ४१ पी ३४४७ वरील चालक १४ नोव्हेंबर रोजी मुंबईहून पुण्याकडे जात होता. रात्री दहाच्या सुमारास त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने गाडी पुलाचं रेलिंग तोडून थेट २० ते २५ फूट खाली पाण्यात कोसळली. या घटनेत कार चालक जोबिन याचा जागीच मृत्यू झाला असून, पुढील सोपस्कारासाठी त्यांना उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे नेण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांच्या पथकाने या ठिकाणी धाव घेत अग्निशामक दलाच्या मदतीने गाडीला पाण्यातून बाहेर काढले. यावेळी बघ्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. या अपघातात कारचेदेखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



## शिवानी वझे प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित | थळगावात आनंदाचे वातावरण

# अलिबागच्या कन्येचा अमेरिकेत गौरव

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबाग येथील शिवानी साईकर-वझे हिला ऊर्जा व्यवस्थापनातील उत्कृष्ट योगदानाबद्दल 'एनर्जी इंजिनियर ऑफ द इयर २०२५ मिडवेस्ट यूएस' आणि 'फिल विर्डझेक इमर्जिंग लीडर इन नॅशनल लॅब्स २०२५' हे अमेरिकेतील दोन प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले आहेत.

मूलकण संशोधनासाठी जगप्रसिद्ध असलेल्या अमेरिकेतील फर्मी नॅशनल ॲक्सेलेरेटर लॅबोरेटरी (फर्मिलॅब) मध्ये शिवानी ऊर्जा व्यवस्थापकपदी कार्यरत आहे.

अलिबागजवळील थळगावचे रहिवासी साईकर दाम्पत्याची मुलगी शिवानीने आरसीएफ शाळेत शिक्षण घेतले. त्यानंतर मुंबईच्या व्हीजेटीआयमधून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगची पदवी आणि नॉर्थईस्टर्न युनिव्हर्सिटी (अमेरिका) मधून ऊर्जा विषयात पदव्युत्तर पदवी (मास्टर्स) प्राप्त केली. डेनवरमधील एका खासगी कंपनीत काही काळ उमेदवारी केल्यानंतर तिची निवड शिकागो येथील फर्मिलॅबच्या ऊर्जा विभागात व्यवस्थापक पदासाठी झाली. दरम्यान, बॉस्टनमध्ये असताना अलिबागच्या मैत्रेय वझे याच्याशी मैत्री होऊन ती त्याच्याशी अमेरिकेतच विवाहबद्ध झाली. विशेष म्हणजे, अलिबागमधील सुविख्यात डॉक्टर दाम्पत्य डॉ. रीटा आणि डॉ. राजीव धामणकर यांनी अमेरिकेत झालेल्या या विवाहसोहळ्याचे पौरोहित्य अलिबागमधून दूरस्थ पद्धतीने केले होते.

फर्मिलॅबमध्ये ऊर्जा कार्यक्षमतेतील सुधारणा आणि विविध शाश्वत उपक्रम प्रभावीपणे राबवण्याच्या तिच्या प्रयत्नांची दखल घेत, असोसिएशन ऑफ एनर्जी इंजिनियर्सतर्फे तिला 'एनर्जी इंजिनियर ऑफ द इयर २०२५ मिडवेस्ट यूएस' हा मानाचा पुरस्कार १७ सप्टेंबर रोजी जॉर्जिया वर्ल्ड काँग्रेस सेंटर, अटलांटा येथे प्रदान करण्यात आला. याशिवाय, इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर सस्टेनेबल लॅबोरेटरीजतर्फे 'फिल विर्डझेक इमर्जिंग लीडर इन नॅशनल लॅब्स २०२५' हा प्रतिष्ठित पुरस्कारही तिला जाहीर झाला आहे. तसेच ऊर्जा संवर्धनावरील तिचा संशोधन लेख ऊर्जाविषयक आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाला आहे.

आपल्या यशाचे श्रेय आई-वडिलांसह व्हीजेटीआय आणि आरसीएफ शाळेला देताना, शिवानी अलिबागमधील दादा वारीसे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाचाही कृतज्ञतापूर्वक उल्लेख करते.





कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# उरणमध्ये महाविकास आघाडीचा झंझावात




**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत महाविकास आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार भावना घाणेकर यांनीशनिवारी (दि.१५) वाजतगाजत मिरवणूक काढत आपला उमेदवारी अर्ज आमदार जितेंद्र आव्हाड, माजी आमदार मनोहर भोईर, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या उपस्थितीत निवडणूक निर्णय अधिकारी तथा उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांच्याकडे दाखल केला आहे. दरम्यान, प्रभाग क्रमांक १ ते प्रभाग क्रमांक १० मधून महाविकास आघाडीच्या २१ नगरसेवक पदासाठी उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी महाविकास आघाडी-शेकाप व मनसेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शक्तीप्रदर्शन करत हम भी कुछ कम नहीं असे भाजपला दाखवून दिले आहे.

उरणनगरपरिषदनिवडणुकीच्या रणधुमाळीत महाविकास आघाडी -शेकाप व मनसे एकत्र येण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे.

- **भाजपाला रोखण्यासाठी आवळली वज्रमूठ**
- **नगराध्यक्षपदासाठी भावना घाणेकरांचं अर्ज दाखल**

यामुळे या निवडणुकीत भाजपचे आमदार महेश बालदी यांच्यासमोर जोरदार आव्हान उभे ठाकणार आहे. तसेच उरणकरांनाही आणखी एक नवा पर्याय मिळणार आहे. यामध्ये आघाडीतून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांच्या महिला प्रदेश उपाध्यक्षा भावना घाणेकर या नगराध्यक्षपदासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या आहेत. उरण नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक तब्बल नऊ वर्षांनी होत आहे. त्यामुळे या निवडणुकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

उरण शहर हा उरणचे आमदार महेश बालदी यांचा बालेकिल्ला आहे. त्यामुळे शहरात असणारी महेश बालदी यांची मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी महाविकास आघाडी-शेकाप व मनसे एकत्र आली आहे.

यावेळी शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हा उपप्रमुख नरेश रहाळकर, माजी जिल्हाप्रमुख दिनेश पाटील, तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, मनसेचे तालुकाध्यक्ष अॅड. सत्यवान भगत, शेकापचे तालुका चिटणीस तथा कामगार नेते रवी घरत, काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते मिलिंद पाडगावकर, अखलाक शिलोत्री, माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनंत भिंगारी, जय्यद नूरमुला, काँग्रेस शहराध्यक्ष उफराण तुंगेकर, नरेश घरत, दीपक पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुका अध्यक्षा हेमलता पाटील, गणेश उर्फ नाना नलावडे, अरुण तेंलणे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

> **ही निवडणूक धनशक्तीविरोधात जनशक्ती अशी असली तरी उरण शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मी नगराध्यक्ष पदासाठी थेट जनतेतून निवडणुकीला सामोरे जात असून, जनता जनार्दनाचा पाठिंबा हा निश्चितच मला लाभणार आहे.**
> **- भावना घाणेकर**




# उरणमध्ये बालदिन उत्साहात साजरा

**। उरण । प्रतिनिधी ।**

पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून यू.ई.एस. इंग्लिश मीडियम स्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स अॅण्ड कॉमर्समधील पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व ज्यु. कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी विविध रंगी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी कविता पठण, कथा सांगणे, एकल गायन, चित्रकला, निबंधलेखनव फॅन्सी ड्रेस ह्या स्पर्धा होत्या तर माध्यमिक विभागाच्या विदयार्थ्यांसाठी क्विझ, मास्क मेंकिंग, बेस्ट आऊट ऑफवेस्ट, फॅन्सी ड्रेस आणि यू. ई. एस. गॉट टॅलेंट स्पर्धा तर ज्यु. कॉलेजच्या विदयार्थ्यांसाठी एक्सटेम्पोर, क्विझ, रांगोळी, टीशर्ट पेंटिंग, डोअर मॅट मेकिंग व मेहंदी इत्यादी स्पर्धा तर सांस्कृतिक कार्यक्रमात गायन, नृत्य व बॉलीवूडमधील प्रतिष्ठित कलाकारांचा अभिनय करणे इत्यादी विविध कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांनी आपले कलागुण सादर केले.

विद्यार्थ्यांनी या सर्व स्पर्धांमध्ये मोठ्या उत्साहाने सहभाग घेऊन स्पर्धा रंगारंग व रंगतदार केली. म्हणूनच यु.ई. एस. संस्थेच्या सर्व कमिटी मेंबर्स, स्कूल अॅण्ड ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, समन्वयक तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका आणि शिक्षकांनी विद्ययार्थ्यांच्या कलागुणांना व प्रयत्नांना मनापासून दाद दिली व कौतुकही केले.

# वयोवृद्ध महिला बेपत्ता

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण जिते हद्दीतील मंजुळा नामदेव जोशी, वय ७० वर्षे ही महिला ६ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजून ५६ मिनीट ते सायंकाळी ५ वाजून १५ मिनिटांच्या दरम्यान वीर, ता. महाड येथून घरी जिते येथे येत असताना बेपत्ता झाली आहे.



दरम्यान, साक्षीदार प्रवीण दामोदर ठाकूर यांनी बेपत्ता महिलेस हमरापूर रेल्वे स्टेशन येथे पाहिले असता तिला जिते रेल्वे स्टेशन येथे उतरण्यास सांगितले. परंतु, ती जिते रेल्वे स्टेशन येथे न उतरता कोठेतरी निघून गेली, ती अद्यापही घरी परत आली नाही. ती बेपत्ता झाल्याची फिर्याद पेण दादर सागरी पोलीस ठाण्यात त्यांच्या मुलीने दि. ८ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजून ५३ मिनिटांनी तक्रार दिली. त्यानुसार गुन्हा नोंदविला आहे.

या फिर्यादीमध्ये वर्णन केल्यानुसार मंजुळा नामदेव जोशी वय ७० वर्षे, रा. जिते, ता. पेण, जि. रायगड, उंचीने ५ फूट ०६ इंच, रंगाने गहुवर्ण, केस कुरळे व लांब, नाक सरळ, डोळे घारे, चेहरा उभट, नेसून तांबूस रंगाची काष्टी पातळ लुगडा, तांबसू रंगाची चोळी, पायात चप्पल, गळ्यात डिस्को मण्यांची माळ, हातात पितळेच्या बांगड्या, कापडी पिशवी, जवळ खर्चापुरते पैसे असल्याचे सांगितले आहे. तरी, या वर्णनाची महिला कुठे आढळल्यास पेण दादर सागरी पोलीस ठाणे दूरध्वनी क्र. ८८३०४४७२५६ वर संपर्क करावा, असे आवाहन पोलीस ठाणे दादर यांच्याकडून करण्यात आले आहे.

# कर्जतमध्ये विचित्र अपघाताने खळबळ

## टाटा हरिअर गाडीने पाच-सहा बाईकला दिली धडक

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातील नगर परिषदेपासून बुद्धनगरकडे जाणाऱ्या वळणावर शनिवारी (दि.१५) रोजी दुपारी झालेल्या एका विचित्र अपघाताने परिसरात एकच खळबळ माजली. सुदैवाने मोठी हानी टळली असली तरी पाच ते सहा मोटारसायकलींना धडक देत वेगात आलेली टाटा हरिअर गाडी अखेर बुद्धनगर वस्तीच्या कमानीला जाऊन आदळली.

मिळालेल्या माहितीनुसार, टाटा हरिअर गाडीचा चालक अचानक ब्रेक न लागल्याने वाहन पूर्णपणे अनियंत्रित झाले. समोरून येणाऱ्या दोन बाईकना गाडीने जोराची धडक दिल्यानंतर चालकाने रिव्हर्स टाकण्याचा प्रयत्न केला आणि त्यात पाठीमागे असलेल्या आणखी दोन आणि पुन्हा पुढे जोरात घेऊन दोन मोटरसायकली उडवल्या. अखेर बुद्धनगरसमोरील कमानीला आदळली.


(छायाचित्र : संजय गायकवाड)

या गाडीत दोन व्यक्ती प्रवास करत होते. चालकाच्या चुकीमुळे झालेल्या धडकेत गाडीचा एअरबॅग तात्काळ उघडल्याने दोन्ही व्यक्ती गंभीर दुखापतीपासून बचावले. मात्र, त्यांना किरकोळ दुखापत झाली आहे. अपघातात रस्त्यावरील दोन व्यक्तींना किरकोळ जखमी झाले आहेत. गाडीने बुध्दनगर येथील कमानीला दिलेल्या धडकेत कमानीचे किरकोळ नुकसान झाले आहे. दुपारी साधारण दीड वाजता घडलेल्या या अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

# सुरेखा हातनोलकर यांचे निधन

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठण्यातील केएमजी विभागातील कुंभार आळीमधील रहिवासी आणि कुंभार समाज महिला मंडळाच्या प्रमुख सुरेखा हरिश्चंद्र हातनोलकर (७७) यांचे गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले.

अष्टविनायक पतसंस्थेचे विद्यमान संचालक तसेच केएमजी गणेशोत्सव मंडळाचे माजी अध्यक्ष रोहिदास हातनोलकर यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात एक विवाहित मुलगा, एक विवाहित मुलगी, सून, जावई, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. दिवंगत सुरेखा हातनोलकर यांचे दशक्रिया विधी शनिवार, दि. २२ नोव्हेंबर रोजी, तर उत्तरकार्य मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी होणार असल्याचे हातनोलकर कुटुंबियांनी सांगितले.


(छायाचित्र : संजय गायकवाड)

# शनिवारी दोन उमेदवारी अर्ज दाखल

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत नगरपरिषदेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी दि.१० ते १७ नोव्हेंबर असा कालवधी आहे. कर्जत नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी पहिल्या चार दिवसांत एकही अर्ज दाखल झालेला नव्हता. मात्र, आज सहाव्या दिवशी दोन अर्ज दाखल झाले आहेत. आता एकूण तीन अर्ज दाखल झाले आहेत, अशी माहिती नगरपरिषद सूत्रांकडून मिळाली.

प्राप्त माहितीनुसार, १४ नोव्हेंबर रोजी शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार म्हणून प्रभाग क्रमांक दोनमधून संकेत जनार्दन भासे यांनी अर्ज दाखल केला होता. शनिवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी जयदीप कृष्णा शिंदे अपक्ष प्रभाग क्रमांक एकमधून, तर गौरी भालचंद्र जोशी भारतीय जनता पार्टी प्रभाग क्रमांक सातमधून या दोघांनी उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी धनंजय जाधव यांच्याकडे सादर केले आहेत.

पान १ वरून

## दीडशेहून अधिक उमेदवारी अर्ज दाखल

अर्ज दाखल झाले नाही. मात्र, तिसऱ्या दिवसापासून अर्ज भरण्यास सुरुवात झाली. शनिवार (दि.१५)पर्यंत १५३ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

खोपोली नगरपरिषदेमध्ये नगरसेवक पदासाठी १६, नगराध्यक्ष पदासाठी तीन अर्ज दाखल झाले आहेत. अलिबाग नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी एक व नगरसेवक पदासाठी २१ अर्ज भरण्यात आले आहेत. श्रीवर्धनच्या नगराध्यक्ष पदासाठी एकही अर्ज दाखल झाला नाही. मात्र, नगरसेवक पदासाठी एकच अर्ज दाखल झाला आहे. मुरूड-जंजिराच्या नगरसेवक पदासाठी २७ व नगराध्यक्ष पदासाठी एक अर्ज दाखल झाले आहेत. रोह्याच्या नगराध्यक्ष व सदस्य पदासाठी एकही अर्ज दाखल झाला नाही. महाडमध्ये नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी प्रत्येकी एक अर्ज दाखल झाले आहेत. पेणमध्ये नगराध्यक्ष पदासाठी एकही अर्ज दाखल झाला नाही. परंतु, नगरसेवकपदासाठी २१ अर्ज प्राप्त झाले आहेत. उरणमध्ये नगरसेवक पदासाठी ५० व नगराध्यक्षपदासाठी सात अर्ज दाखल झाले आहेत. ेकर्जतमध्ये फक्त नगरसेवक पदासाठी तीन अर्ज दाखल झाले आहेत. माथेरानमध्ये एकही अर्ज दाखल झाले नसल्याची माहिती समोर आली आहे.

## प्रशासनाचा डाव, शेतकऱ्यांवर घाव

धेरंड शहापूर परिसरात सिनारमास प्रकल्प येत आहे. सर्व्हे नं. २६४, २६५ मधील औद्योगिक क्षेत्राच्या पोहोच रस्त्याच्या कामाबाबत सीमांकन करण्यासाठी एमआयडीसीचे अधिकारी पोलीस बंदोबस्तामध्ये शुक्रवारी (दि.१४) शहापूर परिसरात दाखल झाले होते. सीमांकनाव्यतिरिक्त काहीही करू नये, असे सांगूनही अधिकारी पोलिसांच्या बळाचा वापर करीत मनमानी कारभार करीत होते. संतप्त शेतकऱ्यांनी भरावाला तीव्र विरोध केला होता. त्यानंतर बैठक घेण्याचे लेखी आश्वासन दिल्यावर तूर्तास लढा थांबविण्यात आला. मात्र, शनिवारी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास जेसीबीसह माती, खडीने भरलेले ट्रक घेऊन एमआयडीसीचे अधिकारी आले. त्यांनी भरावाला सुरुवात केली. त्यावेळी ग्रामस्थांनी या भरावाला तीव्र विरोध केला. ग्रामस्थांच्या या विरोधाची पर्वा न करता एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांवर पोलीस बळाचा वापर करीत भरावाचे काम सुरूच ठेवले. या कामाच्या विरोधात ग्रामस्थांनी आक्षेप नोंदवला. त्यावेळी पोलीस आणि ग्रामस्थांमध्ये चकमक झाली. परिस्थिती ताणतणावाची होऊ नये, म्हणून पोलिसांनी कारवाई करत अनेकांना ताब्यात घेऊन पोयनाड पोलीस ठाण्यात हलविले. त्यानंतर प्रशासनाने रस्त्याचे काम पुढे सुरू ठेवले. यावेळी ग्रामस्थांनी न्यायासाठी जिल्हाधिकारी तसेच उपविभागीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधला. मात्र, त्यांचे फोनच बंद होते. त्यामुळे ग्रामस्थांचा संताप तीव्र झाला. सायंकाळपर्यंत शेतकऱ्यांचा लढा सुरूच होता. प्रकल्पाला विरोध नाही; मात्र जमिनीचा दर, पुनर्वसनाच्या अटी आणि भरपाई याबाबत समाधानकारक निर्णय व चर्चा करण्यात यावी, अशी मागणी यावेळी शेतकऱ्यांनी केली. योग्य चर्चा न करता आणि मागण्या मान्य न करता हा रस्त्याचा भराव सुरू करणे चुकीचे आहे. प्रशासनाने प्रथम संवाद साधावा, त्यानंतरच कामाला सुरुवात करावी, अशी प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख अॅड. मानसी म्हात्रे, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले.

ग्रामस्थांना योग्य दर, पुनर्वसनाची हमी आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी जबरदस्तीने काम सुरू करण्याचा प्रयत्न हा जनतेच्या हक्कांवर गदा आणणारा आहे. त्यांनी प्रशासनाने तातडीने बैठक घेऊन मार्ग काढावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

ग्रामस्थ, शेतकऱ्यांची तटस्थ भूमिका आणि पोयनाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयकुमार देशमुख यांच्या मध्यस्थीने भरावाचे काम थांबविण्यात आले. भराव करणारे जेसीबी हटविण्यात आले. परंतु, परिस्थिती नियंत्रणात असली तरीदेखील परिसरात तणावाचे वातावरण कायम होते.

**शहापूरमध्ये संतापाची लाट**

पोलिसांच्या मदतीने ग्रामस्थांचे आंदोलन मोडीत काढण्याचा घाट एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी घातला. त्यावेळी ग्रामस्थ, शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली. शहापूर परिसरात संतापाची लाट उसळली होती. मागण्या जोपर्यंत मान्य करीत नाहीत, बैठक घेतली जात नाही, तोपर्यंत आंदोलन सुरुच ठेवणार, असा इशारा यावेळी ग्रामस्थांनी दिला.

**गावाला छावणीचे स्वरूप**

दोन दिवसांपासून शहापूर परिसरात दोनशेहून अधिक पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शुक्रवार व शनिवारी असे दोन दिवस शहापूर परिसरात पोलीस आहेत. त्यामुळे या गावाला छावणीचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

**बाधित क्षेत्राची जयंत पाटील यांच्याकडून पाहणी**

धेरंड-शहापूर येथील सिनारमास प्रकल्पापर्यंत पोहोच रस्ता करण्यासाठी प्रशासनाने मनमानी कारभार सुरु केला. ही माहिती शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या लक्षात आल्यावर शनिवारी सकाळी त्यांनी शहापूर येथे जाऊन बाधित क्षेत्राची पाहणी केली.

## कोट्यवधीचे अमली पदार्थ जप्त

सुरु केला आहे.तळोजा परिसरामध्ये अमली पदार्थाचे मोठे रॅकेट सुरु असल्याचे तसेच दोन व्यक्ती सदर अमली पदार्थांचा पुरवठा करत असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपायुक्त (गुन्हे शाखा) सचिन गुर्जाळ यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे आणि त्यांच्या पथकाने हेरिटेज कंसल या बिल्डिंगमधील नवज्योतसिंग आणि गुरज्योतसिग हे दोघे भाऊ राहात असलेल्या फ्लॅटवर छापा टाकला. या छाप्यात १५८ ग्रॅम हेरॉईन (किंमत १ कोटी १६ लाख १९ हजार) आणि ४० ग्रॅम अफीम (किंमत १ लाख) असा साठा आढळून आला. त्यामुळे अमली पदार्थ विरोधी पथकाने १ कोटी १७ लाख रुपये किमतीचा अमली चौकशीत नवज्योतसिंग आणि गुरज्योतसिंग हे दोघेही पंजाब येथून ट्रक ड्रायव्हरमार्फत अमली पदार्थ नवी मुंबईत मागवून ते तळोजा व कळंबोलीतील चार सब डीलरमार्फत ग्राहकांना विक्री करत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार अमली पदार्थ विरोधी पथकाने या दोघांना अटक केली आहे. दरम्यान, पंजाब येथून नवी मुंबईत अमली पदार्थ आणून देणारा मुख्य पुरवठादार तसेच नवज्योतसिंग आणि गुरज्योतसिंग या दोघांमार्फत ग्राहकांना अमली पदार्थांची विक्री करणारे चार सब डिलर या पाच जणांचा या रॅकेटमध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असून, पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. ही कारवाई सह पोलीस आयुक्त संजयकुमार बेनपुरे, अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) दीपक साकोरे, पोलीस उपायुक्त (गुन्हे शाखा) सचिन गुजांळ आणि सहाय्यक पोलीस आयुक्त प्रेरणा कडू यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे, पोलीस हवालदार रमेश तायडे, पदु दोरे, गणेश पवार, चालक परमेश्वर भावड, पोलीस शिपाई पाटील आणि महिला पोलीस कॉन्स्टेबल पगारे यांच्या पथकाने केली.

## शेजारधर्माला फासला काळीमा

(वय अडीच वर्ष) असून, त्याच्या मृत्यूला सुरुवातीला नैसर्गिक मृत्यूचा रंग देण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र, या घडनेचा नेरळ पोलिसांनी पर्दाफाश केला आहे.

९ नोव्हेंबर २०२५ रोजी फिर्यादी गणेश वाघ व पत्नी पुष्पा हे दोघे मजुरीसाठी कामावर गेले असताना त्यांची मुले घरासमोर खेळत होती. याच वेळी शेजारी राहणाऱ्या आरोपी जयवंता मुकणे हिने ईर्षा व रागातून जयदीपला उचलून पाठीमागील पायवाटेजवळ नेले आणि गळा आवळून त्याला ठार केले. यानंतर तिने मुलगा बेशुद्ध झाल्याचे नाटक करत हा नैसर्गिक मृत्यू असल्याचा आभास निर्माण केला. मुलगा मृत आढळताच त्याला त्याच्या आईने कळंब रुग्णालयात नेले होते; परंतु त्याला उपस्थित डॉक्टरांनी मृत घोषित केले. त्यामुळे कुटुंबाने परंपरेनुसार त्याचे अंत्यसंस्कारही करून टाकले.

पण, एका जागरूक नागरिकाने पोलिसांना गुप्तपणे माहिती दिल्यामुळे संपूर्ण प्रकरणाचा धागा सुटला. माहिती मिळताच नेरळ पोलीस ठाण्याचे अधिकारी शिवाजी ढवळे व त्यांची पोलीस टीम हे तात्काळ घटनास्थळी पोहोचले. सुरुवातीपासूनच मुलाच्या मृत्यूबाबत संशय बाळगणाऱ्या ढवळे यांनी तपासाची दिशा बदलणारी महत्त्वाची पावले उचलली. यावेळी रायगड पोलिस अधीक्षक आंचल दलाल, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनानुसार, तसेच कर्जतचे तहसीलदार धनंजय जाधव यांच्या परवानगीने मृतदेह पुन्हा कबरीतून बाहेर काढण्यात आला आणि जेजे रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. शवविच्छेदन अहवालात मुलाचा गळा आवळून खून केल्याचे निष्पन्न झाले. कर्जत तालुक्यात या अमानवी घटनेने प्रचंड संतापाची लाट उसळली असून, आरोपी महिलेवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. पोलीस तपास सुरू असून, पुढील पुरावे शोधण्याचे काम सुरू आहे. नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून आरोपीला अटक करण्यात आली. आरोपीला प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी कर्जत यांचे न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाकडून आरोपीस १७ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

## १७ लाख तीन हजारांची फसवणूक

निर्माणाधीन असून, त्या बिल्डिंगमधील फ्लॅट विक्री करण्याचे कंत्राट त्यांच्या कंपनीला मिळाले. त्यांच्यात सामंजस्य करार झाला. त्यानुसार साईट हेड म्हणून विनायक प्रभाकर लोखंडे हा काम करत होता. लोखंडे याने फ्लॅट खरेदी करण्यास इच्छुक असणाऱ्या सहा ग्राहकारांकडून एकूण १७ लाख ३ हजार रुपये घेतले. मात्र, ते पैसे कंपनीला किंवा बिस्वाल यांना कळवले नाही आणि ग्राहकांकडून घेतलेल्या पैशांचा अपहार स्वतःच्या फायद्यासाठी केला.

# श्रीवर्धन : शनिवारी उमेदवारी अर्ज नाही

**श्रीवर्धन** : श्रीवर्धन नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी दि. १५ नोव्हेंबरपर्यंत फक्त वसंत गजानन यादव यांचाच एकमेव उमेदवारी अर्ज नगरसेवक पदासाठी दाखल झाला आहे.आज शनिवारी एकही उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल झाला नाही. आता रविवार आणि सोमवार (दि.१६ आणि १७) असे दोनच दिवस उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी राहिले आहेत. प्रामुख्याने सोमवार, दि. १७ रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी एकदम गर्दी होईल, असा अंदाज आहे. नगराध्यक्षपदाकरिता त्या-त्या पक्षांकडून अंतर्गतरित्या नाव ठरलेही असेल; परंतु जोपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल होत नाही, तोपर्यंत ते अधिकृत मानता येणार नाही. सांप्रतच्या निवडणुकीपूर्वी श्रीवर्धन न.प.मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच (अ.प.गट) सत्तास्थानी होता. यावेळी या पक्षामध्ये नगराध्यक्षपदासाठी तीन उमेदवार इच्छुक असल्याचे समजते. नगराध्यक्ष व नगरसेवक पदांसाठीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अ.प.गट) व शिवसेना (उबाठा) हे दोन्ही पक्ष निवडणूक लढविणार आहेत.

## वावेघर रस्त्यावर कचऱ्याचे ढीग

**आपटा** : वावेघर ग्रामपंचायत हद्दीत कचऱ्याच्या साम्राज्य पसरले आहे. येथील सर्व कचरा रस्त्यावर आला असून, प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सर्व कचरा वावेघर नाल्यात फेकून दिला जात असल्याने कचऱ्याचा ढीग साचलेला दिसून येत आहे. परिणामी, या कचऱ्यामुळे पातळगंगा नदीचे पाणी प्रदूषित होत असून, याकडे महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्डाने गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे. दांड फाटाकडे जाताना डाव्या बाजूला स्मशानभूमीजवळ तसेच सार्वजनिक शौचालयाच्या बाजूला मोठ्या प्रमाणात कचरा टाकण्यात येत आहे. याबाबतीत ही ग्रामपंचायत काहीच कारवाई करत नसल्यामुळे कचऱ्याचे ढीग पाहायला मिळत आहेत.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांनबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-आंबिवली तर्फे कोतलखलाटी, ता.कर्जत, जि.रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| | ६३ | ५/अ | ०-४९-०० | ० | ०९ |
| १) सोनल अश्विन जैन | ६३ | १० | ०-९२-०० | ० | ४१ |
| २) निपा प्रविण शाह | ६३ | ११ | ०-५९-०० | ० | २८ |
| ३) राजीव गिरीशचंद्र पारीख | ६३ | १२ | ०-५९-०० | ० | ७५ |
| ४) समीर हर्षद पटेल | ६३ | १५ | ०-०९-०० | ० | ४५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट,
कर्जत नगरपालीका कार्यालय शेजारी,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही /-
**अॅड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक : १६/११/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार अब्दुल केडर अब्दुल हमीद असदुल्ला यांनी मौजे. मेचकरवाडी, ता, कर्जत, जि. रायगड येथिल मिळकतीचे मालक श्री. मनोहर प्रभाकर पिंपरकर यांची सदर खालीलप्रमाणे वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेणेचे ठरविलेले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ५६ | ३ | ०-९६-०० पैकी विकत देणेचे क्षेत्र ०-४८-०० | ०-३० |

सबब सदरबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती हया निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहुन येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक १६/११/२०२५

**अॅड. शिवाजी किसन टोकरे**
पत्ता- शॉप नं.९ समर्थ
कृपा हौसिंग सोसायटी नेरळ,
महेश टॉकीज जवळ, नेरळ,
कर्जत, जि. रायगड
पिनकोड नं. ४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

# उत्साही वातावरणात उमेदवारी अर्ज दाखल








● अलिबाग नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासह नगर-सेवक पदासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी मोठे शक्तीप्रदर्शन करीत शनिवारी (दि.१५) उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. महाविकास आघाडीकडून नगराध्यक्ष पदासाठी अक्षया नाईक यांनी, तर नगरसेवक पदासाठी प्रशांत नाईक यांच्यासह वीस जणांनी उमेदवारी अर्ज भरले. (छायाचित्र : समीर मालोदे)

## विठ्ठलनामाने दुमदुमली अलिबागनगरी



● अलिबाग जवळील वरसोली येथिल प्रति पंढरपूर म्हणून समजल्या जाणाऱ्या विठ्ठल रखुमाई मंदिरात शनिवारी (दि.१५) दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. या परिसरात पुढील ५ दिवस यात्रा भरणार असून शनिवारी सकाळी छोटे पाळणे व खेळण्यांची दुकाने लावण्याची दुकानदारांची लगबग सुरु होती. (छायाचित्र : समीर मालोदे)

## संयोगी नाईकचे नेत्रदीपक यश

### पहिल्या शिष्यवृत्तीचा मिळवला बहुमान



। अलिबाग । प्रतिनिधी ।

मुंबई विद्यापीठाने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या पात्र, गुणवंत आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थीनींसाठी सुरू केलेली 'स्वर्गीय डॉ. शर्वरी प्रिया रविंद्र कुलकर्णी शिष्यवृत्ती' जाहीर करण्यात आली आहे. या महत्त्वाकांक्षी शिष्यवृत्तीच्या पहिल्याच वर्षी अलिबाग येथील जे.एस.एम. महाविद्यालयाची एम.ए. मराठी या वर्गातील विद्यार्थिनी संयोगी नाईक हिला हा शिष्यवृत्ती मिळवण्याचा बहुमान मिळाला आहे.

पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर विविध परीक्षांमध्ये केलेली उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरी, तसेच राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक कार्यक्रमांचा युवा महोत्सव यांसारख्या विविध अभ्यासपूरक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग आणि उत्तम कामगिरी या निकषांवर आधारित केलेल्या मूल्यांकनात संयोगी नाईक हिची संपूर्ण मुंबई विद्यापीठातून निवड करण्यात आली. मुंबई विद्यापीठाच्या सर कावसजी जहांगीर दीक्षान्त सभागृहात शुक्रवारी (दि.१४) हा शिष्यवृत्ती प्रदान सोहळा संपन्न झाला. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रविंद्र कुलकर्णी यांच्यासह विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनील पाटील उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संयोगी नाईक हिला रोख रक्कम १० हजार, स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र या स्वरूपात ही शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. हा बहुमान संयोगी हिने डॉ. सोनाली पाटील, जयेश म्हात्रे व पालकांसमवेत स्वीकारला.

संयोगी नाईक हिने मळिवलेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल तिच्यावर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे. जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, उपाध्यक्ष डॉ. साक्षी पाटील, सेक्रेटरी गौरव पाटील, तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सोनाली पाटील यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले. या शिष्यवृत्तीमुळे पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या गरजू व गुणवंत विद्यार्थिनींना शिक्षणासाठी मोठी मदत होणार आहे.

## शेकापच्यावतीने आळंदीत आरोग्य शिबीर

। पनवेल । प्रतिनिधी ।

आळंदी येथे संजीवन समाधी सोहळा पार पाडत असताना 'आरोग्याची वारी आळंदीच्या दारी' ही संकल्पना राबवत शेतकरी कामगार पक्षाच्या डॉक्टर सेलच्यावतीने शुक्रवारी (दि.१४) मोफत आरोग्य तपासणी व उपचार आळंदी आगरी धर्मशाळा या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. शेकाप हा नेहमीच समाज उपयोगी कामे करण्यास अग्रेसर आहे. तो नेहमी समाजाला उपयुक्त असे कार्यक्रम राबवत असतो. त्यामध्ये आरोग्य तपासणी, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप इत्यादी कार्यक्रम राबवले जातात. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, शेकाप डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉ. राहुल भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली या आरोग्य तपासणीचे शिबीर आयोजित करण्यात आले. येथे येणारा वारकरी हा पायी चालत येतो. त्याला मोफत औषधोपचार दिल्यामुळे त्याच्यातील ऊर्जा पुन्हा वाढते आणि तो पुन्हा जोमाने संप्रदायाच्या कामाला सुरुवात करत असतो, असे त्यांनी सांगितले. हे शिबीर डॉ. संतोष जगे, डॉ. अभिजित भोईर, डॉ. वैभव कोपरकर, डॉ. स्वप्नील भोईर, डॉ. स्वप्नील घरत, डॉ. रोशन पाटील, डॉ. अमोल राजे, डॉ. अमर राजे, नगरसेवक ज्ञानेश्वर पाटील व प्रकाश पाटील यांच्या उपस्थितीत पार पडले.



# पोलीस अधीक्षकांच्या कार्यक्रमातून पत्रकारांना डावळले?

। पाली । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा पोलीस प्रशासनाच्यावतीने सुधागड तालुक्यातील वावलोळी आदिवासी आश्रमशाळेतील मुलांकरिता शिक्षण, करिअर व बालविवाह जनजागृती यावर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन शुकवारी (दि.१४) करण्यात आले होते. हा कार्यक्रम जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्या या कार्यक्रमानिमित्त प्रथमच सुधागड तालुक्यात आल्या होत्या. त्याबाबत पाली पोलीस ठाण्याच्यावतीने तालुक्यातील पत्रकारांना कोणतीही माहिती न देण्यात आल्याने आपल्याला या कार्यक्रमातून डावळल्याने पत्रकांरमध्ये नाराजीच सुर उमटत आहेत.



पोलीस अधिक्षकांच्या कार्यक्रमाला स्थानिक पत्रकारांना डावळल्याने यासंदर्भात सुधागड प्रेस क्लबचे अध्यक्ष विनोद भोईर यांच्या नेतृत्वाखाली क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी मिळून याबाबत शनिवारी (दि.१५) पालीच्या पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांना विचारणा केली. त्यावेळी त्यांनी सांगितले की, आम्हाला तुमच्या निमंत्रणाबाबत कल्पना नव्हती. या कार्यक्रमाचे अधिक्षकांच्या कार्यालयातून नियोजन केले होते. आणि आम्ही स्थानिक पत्रकारांना खासगी निमंत्रण पाठवले होते, असे सांगण्यात आले. त्यावर, कुठल्याही स्थानिक पत्रकाराला खासगी निमंत्रण मिळाले नाही. त्यामुळे जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक पहिल्यांदाच तालुक्यात येत असताना स्थानिक पत्रकारांना डावळने कितपत योग्य आहे? अशी विचारणा ज्येष्ठ पत्रकार रविंद्रनाथ ओव्हाळ यांनी केली. त्यानंतर पाली पोलिसांनी पत्रकारांचे ऐकून न घेता पत्रकारांवरच अरेरावी करून अपमानित केल्याने ही चर्चा थांबवून पत्रकार बाहेर निघून आले. या प्रकरणाबाबत लवकरच सुधागड प्रेस क्लब व रायगड प्रेस क्लबचे वरिष्ठ पदाधिकारी जिल्हा पोलीस अधिक्षक यांची भेट घेऊन त्यांच्याकडे तक्रार दाखल करणार असल्याचे सांगण्यात आले.

### पाली पोलिसांचे निरर्थक कारण

रायगड जिल्हा पोलीस प्रशासनाकडून आयोजित आदिवासी मुलांकरिता जनजागृती व मार्गदर्शनपर कार्यक्रमानिमित्त रायगडच्या पोलीस अधिक्षक आंचल दलाल या सुधागड तालुक्यात प्रथमच येतात, ही सर्वांसाठी आनंदाची बाब आहे. परंतु, याबाबतची कोणतीही माहिती स्थानिक पत्रकारांना देण्यात आली नाही. तालुक्याच्या कार्यक्रमाचे यजमानपद पालीच्या पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांच्याकडे असताना पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले असल्याचे त्यांच्याकडून निरर्थक कारण सांगण्यात आले. अशा समजप्रबोधनपर कार्यक्रमाची प्रसिद्धी होणेही तितकेच योग्यतेचे असतानाही ते पाली पोलीस ठाण्याला योग्यतेचे वाटले नाही का? असा देखील संतप्त सवाल सुधागड प्रेस क्लब तर्फे करण्यात येत आहे.



## खालापूर तालुक्यात बालदिन साजरा


। रसायनी । प्रतिनिधी ।

खालापूर मधील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांचे बालदिनाच्या निमित्ताने शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षकांनी औक्षण केले. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंती निमित्त शाळेतील विद्यार्थी विविध वेशभूषा करून शाळेत आले होते. चाचा नेहरू, चित्रपटातील पुष्पा, वारकरी, स्पायडरमॅन तर कुणी कोळीण अशा विविध वेशभूषा करून शाळेत आले होते. तसेच, विविध नृत्याने बालदिन आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा झाला. यावेळी विद्यार्थ्यांची भाषणे, गाणी व काही मनोरंजनात्मक खेळाचे आयोजन देखील करण्यात आले होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, स्वयंसेवक, अंगणवाडी सेविका आदींसह पालक उपस्थित होते.

## निवडक

### म्हसळ्यात बिबट्याचा वाढता संचार

**म्हसळा** : तालुक्यात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्याच्या संचारात वाढ झाल्याचे समोर येत आहे. चिरगाव, म्हसळा दुर्गवाडी, नेवरूळ, घूम, पाष्टी, मोरवणे, देहन आणि खामगाव या ग्रामीण भागात बिबट्याचे वास्तव्य अधूनमधून स्थानिकांच्या निदर्शनास येत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दोन दिवसांपूर्वी म्हसळा परिसरातील जंगलात एका शेतकऱ्याला बिबट्याची दोन पिल्ले आढळून आली असून या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



वन विभागाने तात्काळ पथके घटनास्थळी पाठवून परिस्थितीची पाहणी केली असल्याची माहिती मळिाली आहे. गेल्या वर्षभरात तालुक्यात बिबट्याच्या हल्ल्यांमुळे किमान वीस ते तीस गोवंश जातीच्या जनावरांचा बळी गेल्याची नोंद वन विभागाकडे करण्यात आली आहे.सततच्या गोवंशाच्या हानीमुळे पशुपालक व शेतकरी वर्ग मोठ्या चिंतेत आहे. वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने बिबट्याचे अस्तित्व महत्त्वाचे असले तरी ग्रामीण भागात त्याचा वाढता वावर लक्षात घेता संबंधित विभागाने योग्य ती खबरदारी घेऊन उपाययोजना राबवण्याची गरज व्यक्त केली जात आहे. परिसरातील नागरिकांना शक्य तितक्या सावधगिरीने वावर करण्याचे आवाहन वन विभागाकडून करण्यात येत आहे.

### वावोशीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**वावोशी** : छावा मराठा सेना महाराष्ट्र राज्य संघटनेच्यावतीने शिक्षक व गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा कार्यक्रमाचे आयोजन वावोशी फाटा येथील जेष्ठ नागरिक सभागृहात करण्यात आला. हा कार्यक्रम शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये उत्तीर्ण झालेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा सत्कार आणि त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा राबविण्यात आला. या कार्यक्रमाला छावा मराठा सेना महाराष्ट्र राज्य संघटना संस्थापक



अध्यक्ष सुनील भोर, जिल्हाध्यक्ष तानाजी शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी, अश्विनी ठाकूर, गणेश मोरे, भूषण पाटील, महेश पाटील, भगवान ढेबे, मनीष हातनोलकर, गावित, विद्या घरत, मानसी केदारे, शर्मिला मिसाळ आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रे देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.



### अजिवलीतील रक्तदान शिबीर संपन्न

**वावोशी** : अजिवली येथील ए वन फेन्स प्रॉडक्ट कंपनीत फाउंडर्स डे निमित्त शुक्रवारी (दि.१४) समर्पण ब्लड बँकच्या सहयोगाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवत कंपनीने आयोजित केलेल्या या उपक्रमाला कर्मचारी व नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हे रक्तदान शिबीर प्रशिक्षित वैद्यकीय पथकाच्या उपस्थितीत सर्व सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करून पार पडले. यावेळी कंपनीतील ४० हून अधिक कामगारांनी रक्तदान करीत समाजाप्रती कर्तव्यभावना व्यक्त केली. कंपनी व्यवस्थापक मनोहर खरीवले यांनी या उपक्रमाची संकल्पना मांडली होती. रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे. समाजातील गरजूंना जीवनदान देण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरेल, असे त्यांनी सांगितले. फाउंडर्स डे सारख्या विशेष दिवशी आयोजित या उपक्रमामुळे कंपनीची सामाजिक बांधिलकी अधिक दृढ झाल्याचे कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नमूद केले.

### तांबाटीत बालदिन उत्सव साजरा

**वावोशी** : भारताचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनी १४ नोव्हेंबर रोजी साजरा होणाऱ्या राष्ट्रीय बालदिनानिमित्त तांबाटी ग्रामपंचायत हद्दीत बालदिनाचा उत्सव मोठ्या आनंदात पार पडला. यावेळी परवीन शेख, सुप्रिया देशमुख, प्रतिक्षा बापर्डेकर, अनुराधा चौरे, योगिता देशमुख, लीना जोशी, ज्योती भुजबळ आणि स्वाती डाले आदी उपस्थित होते. संस्थेच्या अध्यक्षा वर्षा मोरे यांनी बालदिन उपक्रम यशस्वी केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

## चाळधारकांचा कचरा रस्त्यावर

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणात चाळ संस्कृती फोफावत आहे. या चाळकऱ्यांकडून आपल्या घरातील कचरा परिसरात अस्ताव्यस्त टाकला जात आहे. त्यामुळे परिसर अस्वच्छ झाला असून दुर्गंधी पसरली आहे. दरम्यान, चाळधारकांच्या घरातील सर्व कचरा रस्त्यावर टाकला जात असून नेरळ ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायत परिसरामध्ये अनेक वसाहती झपाट्याने वाढत आहेत. नेरळ मधील मोहाची वाडी जवळ असलेली कोमलवाडी येथे मोठ्या प्रमाणात चाळी उभारण्यात आलेल्या आहेत. या चाळींमध्ये मोठ्या संख्येने लोक राहात असून देखील येथील कचरा उचलण्यासाठी ग्रामपंचायतीकडून घंटागाडी जात नाही. त्यामुळे चाळधारक घरातील कचरा आनंदवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत टाकत आहेत. त्यामुळे तेथे दुर्गंधी पसरली आहे. या रस्त्याने प्रवास करणारे रहिवासी व शाळकरी मुलांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न देखील येथे उपस्थित होत आहे. तसेच, या कचऱ्यामुळे परिसरातील कुत्रे येथे जमा होत असतात. त्यामुळे शाळकरी मुले या रस्त्याने जात असताना त्यांच्या अंगावर ही कुत्री धावून जातात. त्यामुळे त्यांच्यासह पालक वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.

## राखीव आरक्षणामुळे दिग्गजांची कोंडी

**तळा** : तालुक्यामध्ये पंचायत समिती आरक्षण अनुसूचित जमातीसाठी राखीव झाल्याने दिग्गज कोंडीत सापडले आहेत. त्यामुळे पंचायत समितीचे सभापती होण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांचा पत्ता कट झाला असून सर्वच पक्षांना उमेदवार शोधण्याची वेळ आली आहे. नव्याने अस्तित्वात आलेल्या रहाटाड पंचायत समिती गणात गिरणे, मेढे, रहाटाड, पिटसई, शेणवली या पाच ग्रामपंचातीचा समावेश होतो. या गणातून जो निवडून येणार तो थेट पंचायत समितीचा सभापती होणार आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी या पंचायत समिती गणाकडे लक्ष केंद्रित केले आहे.

## बिरसा मुंडा यांना अभिवादन

। म्हसळा । प्रतिनिधी ।

म्हसळा येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये 'जन जातीय गौरव दिन' म्हणजेच क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा यांना १५० व्या जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य डी.आर. पाटील यांनी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना अधिक माहिती करून दिली. तसेच, विद्यार्थी मनोगतात दिया ओसवाल, त्रिशाला चव्हाण, लावण्या साळुंखे,वैभव कामडी, मनस्वी म्हशिलकर, दैविक पवार, हर्ष ओसवाल, दूर्वा घोलप, अंश मोहिते, पायल प्रजापती,पल्लवी गांगुर्डे, सृष्टी खैरनार आदी




विद्यार्थ्यांनी बिरसा मुंडा यांच्या जीवनावर व कार्याविषयी मनोगत व्यक्त केले. तसेच, शिक्षक मनोगतात एस.ए. वसावे यांनी क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांच्या कार्याची ओळख करून आदिवासी समाजासाठी त्यांचे योगदान काय होते हे पटवून दिले. तसेच, १ ते १५ नोव्हेंबरपर्यंत 'जनजातीय गौरव पंधरवडा' साजरा करण्याचे नियोजन करून त्यात विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी ज्येष्ठ शिक्षक ई.सी. पाटील, एन.एम. गर्जे, एच.बी. मोरे, आर.डी. पाटील, एल.पी. सहारे, आर.डी. गांगुर्डे, आमले, डी.सी. खोकले, एम.सी. गवळी, एन.एस. तडवी आदि मान्यवर उपस्थित होते.

## माऊली वृद्धाश्रमाला इंग्लिश स्कूलची भेट

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यातील युनायटेड इंग्लिश स्कुल मोर्बा या शाळेने तालुक्यातील बोरवाडी येथील माऊली वृध्दाश्रमाला बुधवारी (दि.१२) भेट दिली. यावेळी युनायटेड इंग्लिश स्कुल मोर्बाच्या मुख्याध्यापिका झोया बडे, शिक्षक वफा गैबी, फायझा मुल्ला, अक्षय पवार, रतिका गमरे व शाळेतील इयत्ता सातवी ते नववीतील विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील वृद्ध व्यक्तींशी संवाद सांधला. त्यांनी वृद्धाश्रमातील वृद्धांच्या दैनंदिन जीवनातील प्रवास व आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात हे





वृद्ध लोक व्यतित करीत असलेले जीवन याबाबत त्यांच्याशी संवाद साधला. त्यांच्यासोबत मनोरंजनात्मक खेळ खेळून एका आगळ्यावेगळ्या अनुभवाचा मनमुराद आनंद घेतला.

यावेळी वृद्धापश्रमातील व्यक्तींनी शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांसमवेत आपल्या आयुष्याची कहाणी कथन केली. त्यावेळी या सर्वांना भरभरून आले. शाळेच्या विद्यार्थ्यांनी बनविलेले ग्रिटिंग कार्ड वृद्ध व्यक्तींना भेट देण्यात येऊन वृध्दाश्रमाला 'झाडे लावा, झाडे जगवा' संदेश देत एक बदामाचे वृक्ष शाळेतर्फे भेट देण्यात आले.

## मराठी शाळा होणार संगणक साक्षर



। रसायनी । प्रतिनिधी ।

वांसाबेतील सर्व जिल्हा परिषद शाळा तसेच जनता विद्यालय मोहोपाडा येथे ५४ संगणक, प्रिंटर, स्कॅनर प्रिंटर, तसेच डिजीटल स्क्रीन खासदार तटकरे यांच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. हे साहीत्य प्रशासकीय व शैक्षणिक कामे करताना या साहित्याची शाळेला अत्यंत गरज होती, हल्लीच्या डिजीटलायझेशनच्या युगात मराठी शाळा मागे राहु नयेत, तसेच परीसरातील होतकर, गरजू विद्यार्थी संगणक साक्षर व्हावे यादृष्टीने हे अत्याधुनिक साहीत्य खूप मोलाचे कार्य करेल. माजी सरपंच संदिप मुंढे व सरपंच उमा मुंढे यांच्या सततच्या पाठपुराव्याने हे साहीत्य वासांबे परीसरातील शाळांना मिळाले.

## कंठवली येथे कार्यशाळेचे आयोजन



। चिरनेर । प्रतिनिधी ।

कंठवली येथे 'हिंद-दी-चादर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम भव्य सोहळ्याच्या नियोजनाची पूर्व बैठक व कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. हा भव्य समारंभ शनिवारी (दि.२२) दुपारी २ वाजता संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन हिंद-दी-चादर ३५० वी शहिदी समागम समिती, समस्त शीख, बंजारा, लभाणा, सिकलीगर, मोहियाल, सिंधी समाज, महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विभाग व शहिदी समागम राज्यस्तरीय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

## गांडूळ खतनिर्मिती प्रकल्पाचा शुभारंभ

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

अदानी फाऊंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड आणि ग्रुप ग्रामपंचायत वडवली यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत उपजीविका प्रकल्प अंतर्गत नैसर्गिक शेती प्रोत्साहन भाजीपाला लागवड व गांडुळ खत निर्मिती प्रकल्पाचा शुभारंभ पंचायतीच्या कार्यालयात पार पडला. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत अदानी फाऊंडेशनचे अवधूत पाटील यांनी प्रकल्पाची रूपरेषा सांगताना शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न वाढविणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे स्पष्ट केले. यावेळी कृषी विस्तार अधिकारी राधा कराळे यांनी




कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती देत शेतकऱ्यांना योजनांचा फायदा घेण्याचे आवाहन केले. प्रभारी सुपारी संशोधन अधिकारी सिद्धेश सावंत यांनी गांडुळ खत निर्मितीचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देत त्याची पद्धत आणि उपयोग याबाबत मार्गदर्शन केले. कृषी सहायक पंकज पाटील यांनी नैसर्गिक शेतीच्या फायद्यांविषयी माहिती दिली. या प्रकल्पासाठी एकूण पन्नास शेतकरी लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून त्यांना गांडुळ खत निर्मितीसाठी आवश्यक बेडचे वाटप करण्यात आले. वडवली गावात शाश्वत शेती पद्धतींना नवे बळ मिळणार असून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीस मदत होणार असल्याचे उपस्थितांनी सांगितले. या कार्यक्रमाला ग्रामसखी अरुंधती पिळणकर, नम्रता दिघीकर आणि ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन ग्रामपंचायत अधिकारी गोविंद वासले यांनी केले.

संघर्षातून उभी राहिलेली प्रेरणादायी कलायात्रा | दिग्गजांसोबत कामाची संधी

## माणगावचा उदयोन्मुख कलाकार अतुल विरकर

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव सारख्या शांत, लहानशा शहरातून मोठं स्वप्न घेऊन निघालेल्या अतुल विरकर यांचा प्रवास आज उदयोन्मुख कलाकार म्हणून सर्वांना प्रेरणा देणारा ठरत आहे. 'अभिनय' या एकाच ध्यासाने त्यांनी सुरू केलेली वाटचाल आज छोट्या पडद्यावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्यात यशस्वी झाली आहे.

लहानपणापासूनच अतुल विरकर यांना अभिनय आणि नृत्याची विलक्षण आवड आहे. स्थानिक स्नेहसंमेलन, नवरात्र, गणेशोत्सव अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये ते नियमित भाग घेत असत. अशोक दादा साबळे



विद्यालयातील रंगभूमीनेच त्यांच्या कलागुणांना पहिले व्यासपीठ दिले. परंतु, त्यांच्या मनात एकच जिद्द होती की, मोठे काहीतरी करायचे आहे. त्यावेळी त्यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. त्यांच्या आई-वडिलांच्या निधनानंतर अतुल यांच्यावर संकटांचे डोंगर कोसळले. त्यांना राहायला स्वतःचे घर नव्हते; भाड्याच्या छोट्याशा खोलीतून आयुष्याचा प्रवास पुढे सुरू होता. उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडवण्यासाठी ते सत्यनारायण पूजेसाठी भटजी म्हणून काम करू लागले. परंतु, मनाचा एक कोपरा सतत चित्रपट आणि मालिकांच्या जगाकडेच ओढला जात होता. शेवटी मनातली स्वप्ने घेऊन ते मुंबईत पोहोचले. तेथून त्यांचा खरा संघर्ष सुरू झाला. कामाच्या शोधात दिवस-रात्र भटकंती, ऑडिशन्स, नकार, निराशा, अशा परिस्थितीत त्यांनी प्रयत्नांची साथ कधीही सोडली नाही. १९९९ साली ज्येष्ठ अभिनेते अशोक शिंदे यांनी अतुलची कला आणि आवड ओळखली. त्याच्या जीवनातील ही पहिली मोठी संधी ठरली. सिनेमातील छोटंसं पात्र असो किंवा मालिकेतील छोटेखानी भूमिका, अतुल यांनी त्या प्रत्येक भूमिकेत स्वतःची छाप सोडली. याच मेहनतीने त्यांनी पुढील मार्ग प्रशस्त केला. अनेक लोकप्रिय मालिकांमधून दमदार अभिनय केला. त्यांनी हिन्दी आणि मराठी या दोन्ही क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. अशोक सराफ, निलेश साबळे, अशोक शिंदे, रवि जाधव, विजय कदम, भाऊ कदम यांसारख्या दिग्गज कलाकारांसोबत काम करण्याची संधीही अतुल यांना मिळाली.

### गाजलेल्या मालिका

तारक मेहता का उल्टा चष्मा (सब टीव्ही),चिडियाघर (सब टीव्ही), सावधान इंडिया/सावध भारत (स्टार भारत), क्या हाल है श्रीमान पाँचाल (स्टार भारत), उडान (कलर्स), अनुपमा (स्टार प्लस), या हिंदी मालिंसह मराठीतील अप्पी माझे कलेक्टर, कुलवधू, किमयागर, शेजारी शेजारी पक्के शेजारी,माझा नवऱ्याची बायको, मालवणी दिवस, मधु इथे आणि चंद्र तिथे, राधा प्रेम रंगी रंगीली व या गोजिरवाण्या घरात अशा त्यांच गाजलेल्या मालिका आहेत. सध्या कलर्स मराठीवरील 'अशोक मामा' मालिकेत त्यांचा प्रभावी अभिनय प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. त्याचबरोबर कुमारी गंगुबाई नॉन मॅट्रिक, शिनेमा, अरे बाबा पुरे, १२३४ अशा मराठी सिनेमात अतुल यांनी काम केले आहे. त्यांना खरी ओळख 'चला हवा येऊ द्या' आणि 'तारक मेहता का उलटा चष्मा' यामधील अभिनयाने मिळवून दिली.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१६ नोव्हेंबर**

१) श्रीम.शुभांगी कमलाकर किल्लेकर १६-११-१९४९ महादेव आळी, अलिबाग

# आदिवासी आश्रमशाळेत बालविवाह निर्मूलनावर भर

## • पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन • सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगत वाढवली

**| पाली | प्रतिनिधी |**

बालदिनानिमित्त रायगड जिल्हा पोलिसांनी आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी महत्त्वाकांक्षी 'प्रेरणा' उपक्रमाची सुरूवात केली आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात हा उपक्रम राबवण्याचा मानस असून, त्याची सुरुवात पाली तालुक्यातील वावळोली येथील आदिवासी आश्रमशाळेत पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या हस्ते करण्यात आली. कार्यक्रमाच्या दरम्यान देव एक्टिंग मॉडलिंग अकॅडमी पनवेलचे देवदत्त घरत यांच्या समूहाने बालविवाह निर्मूलन बाबत पथनाट्य सादर केले. आमचा सर्वांचा एकच नारा, बालविवाह मुक्त करू रायगड सारा ही घोषणा देऊन बालविवाह न करण्याची शपथ सर्व विद्यार्थ्यांना दिली गेली.



पोलीस अधीक्षक दलाल यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना अनेक संवेदनशील विषयांवर प्रकाश टाकला. जिल्ह्यात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणावर असून, लैंगिक छळाच्या गुन्ह्यांमध्ये या समाजातील महिलांचे प्रमाण अधिक चिंताजनक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बालदिनाचे औचित्य साधत पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी विद्यार्थ्यांसोबत केक कापून आनंद साजरा केला. कार्यक्रमा दरम्यान त्यांनी आपली वर्दीतील कडक भूमिका बाजूला ठेवत आदिवासी मुलींच्या समूहात जाऊन मनमोकळा संवाद साधला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्यांतही त्या सहभागी झाल्या आणि सर्वांसोबत उत्साहाने आनंद व्यक्त केला. कार्यक्रमात त्यांनी आपुलकीचे, आणि मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करत विद्यार्थ्यांशी जवळीक साधली. यावेळी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व चॉकलेटचे वाटप करण्यात आले.

'प्रेरणा' उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअर मार्गदर्शन, आत्मविश्वास निर्माण, तसेच गुन्हेगारीपासून संरक्षणाबाबत जागृती अशा विविध उपक्रमांचा समावेश असेल असे त्यांनी सांगितले.

रायगड जिल्ह्यातील प्रत्येक आदिवासी बहुल तालुक्यात हा उपक्रम टप्प्याटप्प्याने राबवण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमास उपविभागीय पोलीस अधिकारी प्रसाद गोकुळे, हेमलता शेरेकर, सरिता चव्हाण, तहसीलदार उत्तम कुंभार, रवींद्र लिमये, शिल्पा लिमये, साठे, सुभाष पाटील, भैरवी मालवणकर, साधुराम बांगारे, वावळोली आश्रम शाळेचे ८०० विद्यार्थी मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

> **“कमी वयात विवाह केल्यास होणारे शारीरिक व मानसिक दुष्परिणाम सोप्या भाषेत विद्यार्थ्यांसमोर मांडले. अल्पवयात गर्भधारणा झाल्यास आईच्या आरोग्यावर होणारा धोका, प्रसूतीतील वेदना, पौगंडावस्थेतील अपूर्ण शारीरिक विकास या महत्त्वाच्या मुद्द्यांवर त्यांनी विशेष भर दिला.**
> **–डॉ. भैरवी मालवणकर**
> **वैद्यकीय अधिकारी”**

> **“आधुनिक युगात इलेक्ट्रॉनिक, मोबाईल त्यांचा वापर करताना त्यापासून चांगल्या गोष्टी घेतल्या तर आपले करियर चांगले घडू शकते. आदिवासी बांधवांच्या घरी शिक्षणाचे महत्त्व माहीत नसल्यामुळे त्यांची प्रगती होत नाही. शिक्षण नाही म्हणून वाईट मार्गाला जायला सुरुवात होते. या सर्व गोष्टी टाळण्यासाठी शिक्षण घेऊन विकास करावा. संस्कार आणि शिक्षणाने चांगला नागरिक म्हणून समाजाची व देशाची उन्नती करावी**
> **–प्रसाद गोकुळे,**
> **विभागीय पोलीस अधिकारी रोहा”**

## जीवनधारा संस्थेतर्फे मुलांना मार्गदर्शन

**खांब :** जीवनधारा संस्था वरसगाव –कोलाड येथे बालदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात करुणा गोळे व विलास आठवले यांनी मुलांना बाल हक्क विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी ३६ आदिवासी वाड्यांमधून एकूण ७०० मुलं तसेच विभा चोरगे, प्रीतम पाटील, करुणा गोले, विलास आठवले, रवींद्र ठाकूर, डॉ. नेहा पडवळ, कोलाड पोलीस स्टेशनच्या बांद्रे, व भोईर रवींद्र लोखंडे, गजानन बामणे, रोहा चर्चेचे फादर रुडॉल्फ, तसेच शिक्षक, अंगणवाडी सेविका, आदी मान्यवर उपस्थित होते.



## बिरसा मुंडा जयंती साजरी

**| सुतारवाडी | प्रतिनिधी |**

केंद्रशाळा कुडली येथे भारतीय आदिवासी क्रांतिकारी धारती आबा बिरसा मुंडा यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी पदवीधर शिक्षक राठोड यांनी बिरसा मुंडा यांच्या कार्याबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमानिमित्त शाळेत निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये इयत्ता सहावी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. चित्रकला स्पर्धेचा निकाल प्रथम क्रमांक सार्थक जाधव, द्वितीय क्रमांक वीरा कामथेकर, तृतीय क्रमांक श्रुती पंदेकर निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक सई चव्हाण द्वितीय क्रमांक, वीरा कामतेकर तृतीय क्रमांक श्रवण कामथेकर प्रोत्साहन पर निबंध स्पर्धेत आरोही धनावडे यांना बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांचे सहकार्य केले.

## सायन–पनवेल महामार्गावर अपघात

**| नवी मुंबई | प्रतिनिधी।**

सायन–पनवेल महामार्गावर खारघर येथे एका कारचा भीषण अपघात झाला. या अपघातात ती कार थेट पुलावरून २५ फूट खाली थेट नाल्यात कोसळली. मारुती सुझुकी स्विफ्ट (केए ४१ पी ३४४७) वरील चालक सायन–पनवेल महामार्गावर जात असताना त्यांच्या मागून आलेली क्रेटा कारने मागून धडक दिल्याने ती कार पुलावरून थेट २५ फूट खाली नाल्यात कोसळली. या अपघाताची माहिती मिळताच खारघर पोलिसांचे पथक, वाहतूक शाखा व अग्निशमन दलाने तात्काळ सदर ठिकाणी पोहचून ती कार नाल्यातून बाहेर काढली. या अपघातात कारचालक जखमी झाला असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



## बालदिनानिमित्त वन्यजीव संरक्षण जागरूकता

**| खांब | प्रतिनिधी |**

दीपक नायट्राईट कंपनी, धाटाव आणि दीपक फाऊंडेशन, रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने सानेगाव आश्रम शाळेत बालदिनानिमित्त वन्यजीव संरक्षण जागरूकता संपन्न झाले. वन विभागाच्या सहकार्याने दीपक फाऊंडेशनतर्फे आयोजित या सत्राचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीवांचे संवर्धन, नैसर्गिक अधिवासांचे संरक्षणाची जाणीव निर्माण केली. या कार्यक्रमात विवेक विद्या प्रकल्पातील ६२ विद्यार्थी आणि एसटीईएम प्रकल्पातील ११५ विद्यार्थीनी सहभाग नोंदविला होता. कार्यक्रमास संतोष रेवणे, आदिनाथ डुंबरे, निखिल पाटील, भगवान पिंगळे, प्रीती कापसे, ओजस्विनी महाडीक, सायली भोईर, विवेक विद्या साथी, कोमल मोरे, प्राजक्ता धुमाळ, प्राची शिर्के, अमोल जाधव, आश्रमशाळेचे शिक्षकवृंद उपस्थित होते.

## भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या संकुलात स्वातंत्र्य लढ्याच्या ठेव्याचे प्रदर्शन

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

मनागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या वेलशेत येथील शैक्षणिक संकुलात असलेल्या एस. डी. परमार इंग्लिश मीडियम स्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज येथे गुरुवारी (दि.१३) ओळख देश भक्तांची, शाळा तिथे क्रांती मंदिर या उपक्रमा अंतर्गत भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या एका अनमोल ठेव्याचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यलढ्याचे सचित्र दर्शन घडले. या प्रदर्शनाच्या निमित्ताने स्वातंत्र्य लढ्याच्या आठवणींना उजाळा मिळाला.



कार्यक्रमात कोशाकार चंद्रकांत शहासने यांच्या संग्रहातील दहा हजार क्रांतीकारकांची माहिती असलेला देशभक्त कोश तसेच दोन हजार क्रांतिकारकांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील या अमूल्य ठेव्याच्या प्रदर्शनाचे ८१० दिवसांचे अभूतपूर्व अभियान ठिकठिकाणी राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून आयोजित केलेल्या या प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपुढे स्वातंत्र्यलढ्याचा पट उघडला गेला. यावेळी चंद्रकांत शहासन यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

या प्रदर्शनासाठी सुरेश जैन, अमृता गायकवाड यांच्यासह संस्था समितीचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुवर्णा पाटील यांनी केले.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. १६ ते २२ नोव्हेंबर २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ–अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### धनलाभ प्राप्तीची शक्यता

**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला या कालावधीत तुमच्या करिअर मध्ये उन्नती येईल आणि जर तुम्ही मनापासून मेहनत करतात तर, यश मिळवण्यात आणि पद-उन्नती मिळवण्यात तुम्हाला कुणीच थांबवू शकत नाही. जर तुम्ही सर्व्हिसइंडस्ट्री, ऑटोमोबाईल, प्रिंटिंग प्रेस, इत्यादी. करतात तर, यावेळी तुम्हाला उन्नती मिळण्याची अधिक शक्यता आहे. मल्टीनेशनल कंपनी मध्ये कार्य करणाऱ्यांसाठी वेळ चांगली राहील. तुम्हाला या गोष्टीची नेहमी काळजी घ्यावी लागेल की, अत्याधिक आत्मविश्वासात राहून कुठला ही चुकीचा निर्णय घेऊ नका आणि आपल्या अधिनस्थ कर्मचाऱ्यांना कुठल्या ही प्रकारचे कष्ट देऊ नका अन्यथा स्थिती याच्या विपरीत होऊ शकते. एकूणच, ही वेळ तुमच्या करिअर साठी बरेच उत्तम राहण्याची शक्यता बनत आहे. **महिलांना:** आर्थिकरूपात उन्नतीच्या अनेक संधी तुमच्या समोर येतील आणि त्याच्या फळस्वरूप, तुम्ही चांगले धनलाभ प्राप्त करण्यात यशस्वी व्हाल. तुम्ही वेळ आल्यास आपल्या काही मित्र आणि नातेवाइकांची ही आर्थिक मदत कराल. **शुभ दिनांक : १६,१७.**

### आर्थिक स्थिती उत्तम राहील

**वृषभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला बाहेरून विदेशी संपर्कांनी ही चांगला लाभ होण्याची शक्यता आहे. तुमची आर्थिक स्थिती बरीच उत्तम राहणारी आहे. नोकरीपेक्षा लोकांना ही अधिक लाभ मिळेल. त्यांना मनासारखी नोकरी प्राप्त होण्याने ही चांगले धन लाभ होऊ शकतात. या कालावधीमध्ये अचानक धन प्राप्तीची शक्यता बनू शकते. यामध्येच अत्याधिक खर्च होण्याने तुमच्या फायनान्शिअल कंडिशनवर ही थोडा प्रभाव पडू शकतो. परंतु, त्यानंतर परत तुमची स्थिती अधिसारखी मजबूत होईल आणि तुम्ही एक चांगल्या आर्थिक जीवनाचा आनंद घ्याल. तुम्हाला आपले मित्र, नातेवाईकाद्वारे अनेक प्रकारे सहयोग तसेच आर्थिक लाभ होण्याची स्थिती उत्पन्न होईल. **महिलांना:** यावेळी तुम्हाला चांगल्या आर्थिक लाभाच्या कारणाने उन्नत जीवन व्यतीत करता येईल आणि भविष्याच्या हेतूने धनसंचय करण्यात ही सक्षम व्हाल. तुमच्या अनेक उन्नती कारक यात्रा या कालावधीत संपन्न होतील. तुमच्या वडिलांना आरोग्य संबंधित समस्यांचा सामना करावा लागू शकतो. **शुभ दिनांक : १८,१९.**

### कुटुंबाला वेळ द्या

**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला या कालावधीमध्ये तुमच्या संवादशैलीमध्ये अत्यंत महत्वपूर्ण बदल येतील. आपले काम करण्यास सक्षम व्हाल. ज्याची परिणीती एक चांगल्या धनलाभाच्या रूपात होईल. भागिदारीत व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना आपल्या भागीदारांसोबत चांगले संबंध बनवले पाहिजे कारण, या वेळात त्यांच्या प्रयत्नांनी तुम्हाला आर्थिक लाभ होण्याची चांगली शक्यता असेल. घरातल्यावर लक्ष ठेवा विशेषता लहानमुले त्यांची काळजी घेणे तुमच्यासाठी आवश्यक असेल. या कालावधीमध्ये तुम्ही आपल्या उत्तम कौटुंबिक जीवनाचा आनंद घ्याल आणि सुख शांतीने जीवन व्यतीत कराल. **महिलांना:** आपली मनीषा असेल तर नंतर तुम्ही स्थान परिवर्तन ही करू शकतात अर्थात अशी शक्यता पहिली जाते की, तुम्ही आपल्या वर्तमान निवास स्थानापासून कुठे दूर राहायला जाऊ शकतात. तुम्ही या कलावधीत बरीच मेहनत कराल या कारणाने तुम्ही आपल्या कुटुंबाला कमी वेळ देऊ शकाल आणि याची त्यांना तुमच्याकडे तक्रार असेल. **शुभ दिनांक : २०,२१.**

### उत्सवाचे वातावरण राहील

**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुमच्या कुटुंबात काही समारंभ अथवा शुभकार्य संपन्न होऊ शकते. या कारणाने कुटुंबात उत्सवाचे वातावरण राहील आणि सर्व प्रसन्नचित्त दिसतील. या वेळी घरात कुणाचा विवाह किंवा संतानचा जन्म होण्याची शक्यता आहे. तसेच तुमच्या घरात आईच्या समस्या राहू शकते. विशेषरूपात हा कालावधी तुमच्या आई–वडील दोघांच्या स्वास्थ्यासाठी अधिक चांगला सांगितला जाऊ शकत नाही म्हणून, त्यांच्या आरोग्याला घेऊन या महिन्यात विशेष सावधानता बाळगा. जर तुम्हाला परदेशात सेटल व्हायची इच्छा असेल, आणि तुमच्या कुंडलीमध्ये हा योग उपस्थित आहे आणि अनुकूल वेळ आहे तर, यावेळी तुम्ही या कार्यात यश प्राप्त करू शकतात. यासाठी विशेष अनुकूल वेळ पुढे असला तरी आतापासून प्रयत्न केलेत तर नक्की यश मिळणार आहे. **महिलांना:** प्रयत्न केले तर, तुम्हाला विशेष स्वरूपात यश मिळेल आणि तुमचे परदेशात सेटल होण्याचे स्वप्न पूर्ण करू शकाल. हा कालावधी आनंद देणार आहे त्याचा आस्वाद घ्या. **शुभ दिनांक : १६,२१.**

### धैर्याने काम करा

**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला आपले घर घेण्याची इच्छा ठेवणाऱ्या लोकांना आत्ता अजून वाट पाहावी लागणार आहे. सध्या अधिक अनुकूल वेळ दिसत नाही तथापी, तुमच्यापैकी काही नशीबवान लोकांना पुढील सहा महिन्यात आपले घर खरेदी करण्यात यश मिळू शकेल. जे लोक परदेशात व्यापार करत आहे, ते या वर्षी देशाच्या बाहेर आपले घर बनवण्यात यशस्वी होतील. तुमचे वैवाहिक जीवन आनंदी राहील आणि काही मोठी समस्या या कालावधीत तुमच्या समक्ष येणार नाही. आपले धैर्य कायम ठेवा आणि जीवनातील मूल्यांच्या प्रति आपले दायित्व नक्की लक्षात ठेवा तथापी, आठवड्याच्या शेवटी आपल्या सासरच्या पक्षासोबत काही वाद होऊ शकतात. तुमच्या जीवनसाथी सोबत कुठल्या गोष्टीला घेऊन मतभेद होऊ शकतात तथापी, वेळ पाहताच त्यांच्या सर्व गोष्टी क्लिअर करून घ्या म्हणजे नंतर समस्या उचलावी लागणार नाही. **महिलांना:** तुमच्यासाठी आवश्यक असेल की, तुम्ही कामासोबतच थोडा आराम ही करा अन्यथा तुम्हाला जास्त थकवा येईल. **शुभ दिनांक :१९,२२.**

### अहंकाराला बाजूला ठेवा

**कन्या :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तसे तर, तुम्ही तंदुरुस्त असाल परंतु, नंतर तुम्हाला आपल्या जेवणावर लक्ष द्यावे लागेल. शिळे आणि भरपेट जेवण करू नका आणि चुकून ही जेवण करणे टाळू नका. या कालावधीत आव्हानांच्यामध्ये एक चांगला अनुभव प्राप्त होईल. यावेळी तुम्हाला पूर्वी केल्या गेलेल्या प्रयत्नांचे चांगले फळ प्राप्त होतील आणि जर तुम्ही मेहनत कायम ठेवली तर, नि:संदेह हे एक उत्तमवेळ सिद्ध होऊ शकते. तुम्हाला जीवनात स्थिरता आवडते आणि याकालावधीत जर तुम्ही या दिशेमध्ये प्रयत्न केले तर, तुम्हाला यश मिळेल आणि जीवनात विश्राम येईल. तुम्हाला आपल्या मार्गात येणाऱ्या विभिन्न विकल्प शोधावे लागतील आणि योग्य वेळी चांगल्या संधीला कॅच करावे लागेल तेव्हाच तुम्ही एक चांगल्या वेळेचा आनंद घेऊ शकाल. **महिलांना:** आपल्यासाठी महत्वाचे हे असेल की, तुम्ही कशा प्रकारे निर्णय घेतात कारण, तेच निर्णय तुमच्या कौटुंबिक जीवनाला मुख्य रूपात प्रभावित करेल. अहंकाराला बाजूला ठेवून आणि आपल्या साथीदारावर प्रेम करा. **शुभ दिनांक : १६,२१.**

### जाणकाराकडून सल्ला घ्या

**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला यावेळी आपल्या अहंकाराला आणि आपल्या लालसेला नियंत्रणात ठेवावे लागेल कारण, तुमच्या चिंतेचे हेच कारण असू शकते. जर तुम्ही यावर नियंत्रण ठेवण्यात यशस्वी झाले तर, हे जाणून घ्या की, जर प्रेमाला मिळवायचे आहे तर, तुम्हाला त्यांच्या काही कमींकडे दुर्लक्ष करावे लागेल म्हणून, आपल्या मानिपणा, अहंकाराला बाजूला ठेवून आणि आपल्या आप्तवर प्रेम करा. या राशीतील जातकांना कुठल्या प्रकारच्या वित्तीय गुंतवणुकीसाठी खूप विचार करून पुढे गेले पाहिजे. जर या क्षेत्रातील जाणकाराकडून सल्ला घेऊन काही कार्य केले तर यश प्राप्ती होईल. तुमच्या सामाजिक जीवनासाठी हा एक चांगला कालावधीत सिद्ध होईल आणि याच्या अतिरिक्त तुम्ही आपल्या व्यक्तिगत संबंधांना ही अधिक अनुकूल बनवण्यात यशस्वी व्हाल. **महिलांना:** तुम्हाला ही काळजी घ्यावी लागेल की, प्रेम आणि नात्यामध्ये आपलेपणा, स्नेह आणि प्रेमाने चालते म्हणून, कुठल्या ही नात्यामध्ये आयडियल मत ठेऊ नका आणि हवेचा झोका पाहून काही कार्य करा. आपल्या आजूबाजूंना चांगले वातावरण ठेवा. **शुभ दिनांक : १७,२२.**

### रागावर नियंत्रण ठेवा

**वृश्चिक :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला इतरांसोबत स्वतःच्या स्वतंत्रतेला ही महत्व नक्कीच द्याव लागेल. यामुळे तुम्ही चांगल्या जीवनाचा आनंद अनुभव करू शकाल. आपल्या चार ही बाजूवर लक्ष ठेवा कारण, काही लोक असे आहेत जे तुम्हाला नुकसान पोहचवण्याच्या विचारातच आहे त्यांच्या पासून सावध राहा आणि कुठले ही नवीन कार्य करण्याच्या आधी त्यांच्या सर्व पैलूंवर विचार करा. जर तुम्ही काही कॉन्ट्रैक्ट साईन करण्यास जातात तर, त्यांच्या प्रत्येक विषयाला वाचून घ्या आणि कुठली ही जोखिम घेऊ नका. तुम्हाला आपल्या रागावर नियंत्रण ठेवावे लागेल कारण, अधून–मधून कुठल्या कारणास्तव तुम्ही कुणाशी वाद किंवा भांडण करू शकतात आणि जर तुम्ही अख्या कार्यात लिप्त राहिले तर, त्याच्या कारणाने तुम्हाला अनेक समस्यांचा सामना करावा लागू शकतो. **महिलांना:** तुम्हाला काही कठीण निर्णय ही घ्यावे लागतील जे संभवत तुम्हाला दुःख देऊ शकतात परंतु, तुमच्यात ती क्षमता आहे की, तुम्ही आपल्या मनोबलाने प्रत्येक दुःखी वेळेतून बाहेर निघू शकतात आणि स्वतःला सक्षम बनवू शकतात. **शुभ दिनांक : १८,१९**

### सकारात्मक विचार करा

**धनु :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात याराशीतील लोकांना मिश्रित परिणाम देईल आणि तुम्ही आपले मनोबल आणि मेहनतीच्या बळावर अनेक उद्दिष्टांना मिळवू शकाल. आपल्या काही कमींना दूर करून तुम्ही एक यशस्वी व्यक्ती म्हणून वरती याल. यावेळी तुमच्यासाठी ऍडव्हेंचर असेल आणि प्रेम ही असेल, आणि आपल्या लोकांचा साथ ही असेल. तुम्हाला आपल्या क्षमतेचा प्रयोग करावा लागेल आणि यावेळी यश प्राप्त करण्यासाठी तयार राहावे लागेल. जर असा निर्णय घ्यावा लागला तर, घाबरू नका कारण, हे तुमच्या भविष्यासाठी खूप चांगले सिद्ध होईल. थोडा कालावधी काही समस्यांनी भरलेली राहू शकते आणि या वेळी शक्यता आहे की, तुमचे मन आपल्या कामाने थकून जाईल परंतु, जर तुम्ही हिम्मत ठेवली आणि धैर्याने काम करत राहिले तर, नंतर खूप चांगले सकारात्मक बदल आपल्या करिअर मध्ये पहायला मिळेल. **महिलांना:** ही वेळ तुमच्याकडून मेहनत करवून घेईल. परंतु, त्यानंतर तुम्ही उन्नतीच्या मार्गावर अग्रेसर व्हाल आणि ही उन्नती लांब वेळेपर्यंत सोबत राहील म्हणून, तुम्ही प्रसन्न राहाल आणि आपले प्रयत्न कायम ठेवाल. तुम्ही यावेळी अनेक असे कार्य कायम ठेवण्यात यशस्वी व्हाल जे तुम्ही मागील दिवसा पासून करत आहात. **शुभ दिनांक : २०,२१.**

### गुंतवणूक करू नका

**मकर :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात जर तुम्ही एखादा व्यवसाय करतात तर, लक्षात ठेवा की, सुरुवातीमध्ये अजिबात मोठी गुंतवणूक करू नका. जर तुमची व्यवसाय प्रारंभ करण्याची इच्छा आहे तर, त्यासाठी सुरवातीचा त्याग करा कारण, यावेळेत तुम्ही काही असे काम केले तर, तुम्हाला आर्थिक लाभाच्या स्थानावर हानी होण्याची शक्यता अधिक राहील. संपत्ती, घर, वाहन आणि दागिने इत्यादी प्राप्त करण्यासाठी मजबूत संकेत दिसत आहे. तुम्ही या कालावधी कुटुंबात कुणाचा विवाह अथवा शुभ कार्यात खर्च करू शकणार आहात. नंतर अचानक लाभाचे संकेत आहे आणि तुम्ही आपले जुने ऋण फेडण्यास सक्षम व्हाल. जे कुणी द्रवव्यवसाय अथवा शेअर बाजार संबधित आहेत त्यांना मनासारखे लाभप्राप्त होण्याची शक्यता राहील. तुमच्या विचार करण्याच्या शक्तीमध्ये जबरदस्त परिवर्तन येईल आणि तुम्ही आपल्या मन शक्तिद्वारे कमाईमध्ये वाढ करण्याकडे लक्ष द्याल. **महिलांना:** जर तुम्ही धनामागे खूप पळत आहेत तर, कुटुंबात समस्या वाढेल आणि जर तुम्ही कौटुंबिक समस्यांचा सामना कराल तर, धन संबंधित काही समस्या येऊ शकतात चिंता नको त्यातून तुम्ही मार्ग काढू शकाल. **शुभ दिनांक : १६,१८.**

### शुभकार्य होण्याची शक्यता

**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला तुम्हाला बऱ्याच प्रकारे प्रेरणा मिळेल ज्या कारणाने तुम्ही कार्पोरेट जगात उंचशिड्या चढू शकाल. नवीन योजनेला सुरु करण्यात आणि आपल्या कार्यस्थळी नवीन कार्य सुरु करण्यासाठी हा एक खूप अनुकूल काळ आहे. सप्ताहाचा मध्यभाग तुम्हाला आजपर्यंत केलेल्या कार्यासाठी पर्याप्त प्रतिफळ देईल. आर्थिक दृष्टिकोनाने सुरुवात ही वेळ बरीच सांभाळून चालण्याची असेल कारण, यावेळी तुम्हाला आर्थिक रूपात समस्यांचा सामना करावा लागू शकतो आणि या वेळी कमाई कमी राहील तर, दुसरीकडे खर्च अप्रत्यशित रूपात वाढतील तथापी, धन खर्च आणि गुंतवणूक दोन्ही खूप विचार–पूर्वक करा. घरात काही शुभकार्य होऊ शकते परंतु, बुद्धिमान राहून वित्ताचा प्रयोग करा. आपल्या घरात सुधारणा, जीवनशैलीची स्थिती यामध्ये ही वृद्धी इत्यादींवर व्यर्थ होऊ शकतो. **महिलांना:** शेवटी चांगली वित्तीय प्रभावाची शक्यता आहे. आपल्या चांगल्या वित्तीय प्रबंधनासाठी सुरक्षित खर्चाला प्राथमिकता देणे शिका. घरातील वातावरण आनंदी राहील. **शुभ दिनांक : १८,१९.**

### कामाचे कौतुक होईल

**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला शेती, शिक्षणाच्याक्षेत्रात मिश्रित परिणामांची प्राप्ती होईल. तुम्ही जितकी मेहनत कराल तितकाच तुम्हाला आर्थिक लाभ होईल. या राशीतील लोकांचे करिअर उच्चतेवर जाण्याची चांगलीच शक्यता दिसत आहे. यावेळी जर तुम्हाला नोकरी बदलण्याची इच्छा असेल तर, तुम्हाला त्यात यश मिळेल आणि नवीन नोकरी प्राप्त होईल, त्यात सुरवातीमध्ये काही अधिक परिश्रम करावे लागतील परंतु, त्यानंतर टिकाऊ नोकरीमध्ये परिवर्तित होईल आणि तुम्ही एक चांगल्या कार्यस्थळी काम करण्यात यशस्वी व्हाल. या वेळेत तुम्ही आपल्या सर्वच कामात यश मिळवाल आणि तुमच्या वरिष्ठ अधिकाऱ्याद्वारे तुमच्या कामाचे कौतुक होईल. तुम्ही आत्तापर्यंत जे परिश्रम केले आहे त्याचे फळ मिळण्याची वेळ आत्ता आली आहे. **महिलांना:** तुम्हाला आपल्या वर्तमानस्थितीवर विचार करण्याची संधी येईल, या वेळी तुम्ही हे विचार करू शकतात की, जे कार्य तुम्ही करत आहे वास्तवात खरंच तुम्हाला तेच करायचे आहे? किंवा काही वेगळे! मात्र कार्यक्षेत्राच्या संबंधित कुटुंबाबाबत काही मोठा निर्णय घेऊ नका अन्यथा समस्यांचा सामना करावा लागू शकतो. **शुभ दिनांक : २०,२१.**

# नेरळ स्थानकाचे आधुनिकीकरण

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान या लोकप्रिय पर्यटनस्थळाकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी मुख्य प्रवेशद्वार असलेल्या नेरळ रेल्वे स्थानकाचे रूप हे आता अधिक आधुनिक होत आहे. नेरळ फलाट क्रमक एकवर प्रवाशांच्या सोयीसाठी बसवण्यात आलेला स्वयंचलित सरकता पायरी मार्ग (एक्सलेटर) शुक्रवारी सायंकाळी ५ वाजता प्रवाशांच्या सेवेत खुला करण्यात आला आहे. या एक्सलेटरचा शुभारंभ हा मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर यांच्या हस्ते होणार होता. मात्र त्यांचा नेरळ दौरा हा पुढे ढकलल्याने अखेर रेल्वे प्रशासनाने स्वतःच हा मार्ग प्रवाशांसाठी सुरू करण्याचा निर्णय घेतला.

स्वयंचलित शिडीमार्गामुळे आता रेल्वे प्रवाशांसह अंध, अपंग, आबालवृद्धांसह नागरिकांना आज या फलाटां दरम्यान सहज आणि सुरक्षितपणे ये-जा करणे अधिक सोपे झाले आहे. विशेष म्हणजे, पहिल्या डब्याजवळ आणखी एक सरकता पायरी मार्ग बसवण्याचे काम देखील मध्य रेल्वे प्रशासनाकडून लवकरच पूर्ण केले जाणार आहे.दररोज हजारो प्रवासी आणि पर्यटक माथेरानकडे जाण्यासाठी नेरळ स्थानकामधून प्रवास करतात. त्याच प्रमाणे नेरळ व नेरळ परिसरातील वाढते नागरिकरण पाहता प्रवाशांचा वाढता ओघ लक्षात घेऊन मध्य रेल्वे प्रशासनाने नेरळ स्थानकाचे आधुनिकीकरण, पादचारी पूल, एक्सलेटर शिडी मार्ग आणि लिफ्टसारख्या सुविधांची उभारणी हाती घेतली आहे. नेरळ दोन नंबर स्थानकाच्या कामालाही लवकरच सुरुवात होणार असल्याची माहिती मिळाली आहे. या सर्व विकास कामांमुळे नेरळ स्थानकाचे रूपच पालटणार असून, प्रवाशांना अधिक सुखसोयी, आधुनिक आणि आकर्षक वातावरणाचा लाभ मिळणार आहे.सायंकाळी सरकत्या पायऱ्या सुरू होताच प्रवाशांनी उत्साहाने त्यांचा लाभ घेण्यास सुरुवात केली आहे. सजलेले लिफ्ट क्षेत्र आणि आधुनिक शिडीमार्गामुळे नेरळ स्थानक आज परिसरातील नवे आकर्षण केंद्र ठरत आहे.



### आकर्षक रंग सजावट

प्रवाशांसाठी बसवण्यात आलेली स्वयंचलित लिफ्ट देखील आकर्षणाचे केंद्र ठरली आहे. लिफ्टच्या बाह्य भागावर दिलेल्या गुलाबी रंगाच्या शेडमुळे ती महिला प्रवाशांच्या विशेष पसंतीस उतरली आहे. वयोवृद्ध, अपंग आणि महिला प्रवाशांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

## विवाहिता महिला बेपत्ता

**पनवेल :** कळंबोली येथून एक ४२ वर्षीय विवाहिता महिला कोणास काही एक न सांगता कोठेतरी निघुन गेल्याने ती हरवल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रेखा दिलीप मिश्रा असे या महिलेचे नाव असून तिचा रंग गोरा, उंची ५ फुट ५ इंच, नाक सरळ, चेहरा उभट, केस लांब व काळे, बांधा मध्यम, डावा डोळा तिरळा, त्यांनी अंगात लाल रंगाची साडी घातलेली आहे. सदर महिलेबाबत कोणाला काही माहिती असल्यास पोलीस नाईक एम. एम. गोसावी यांच्याशी संपर्क साधावा. सदर महिलेला शोधून देणाऱ्यास किंवा त्याबाबत माहिती देणाऱ्या इसमास १० हजार रुपयांचे बक्षीस कुटुंबियांकडून देण्यात येणार आहे.

## उतेखोलवाडी शाळेत विद्यार्थ्यांना खाऊ वाटप



। माणगाव । प्रतिनिधी ।

राजिप पीएमश्री उतेखोलवाडी शाळा येथे शुक्रवार (दि. १४) नोव्हेंबर रोजी बालदिन मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेत निपुण भारत कार्यक्रमही साजरा करण्यात आला.

या बालदिनाच्या औचित्य साधून सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात आग्रेसर असणाऱ्या माणगाव चारिझेन फाऊंडेशनतर्फे राजिप पीएमश्री उतेखोलवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास ज्ञानदेव पवार, कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, राकेश पडवळ, शंकर शिंदे, सतीश काळे, किशोर झेमसे, शोभा तालिमकर, जागृती बुटे, संस्कृती उभारे, शुभांगी काळे, साधना खराडे, शाळेचे शिक्षकवर्ग, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अजगराला दिले जीवदान

। उरण । प्रतिनिधी ।

चिरनेर नितीन गोंधळी यांच्या भातशेतीचे काम चालू असताना शेतात लपून बसलेला भलामोठा अजगर साप अंदाजे १२ फूट लांब असलेला साप शेतात काम करीत असणाऱ्या कामगारांना दीसला त्याने लगेच शेत मालकाला सांगीतले व शेत मालकाने लगेच फेंड्स नेचर टीमच्या हेल्पलाईन नंबरवर संपर्क केला असता सर्प मित्र अनिकेत ठाकुर यांनी तो अजगर साप सुरक्षीत पकडून सर्प मित्र राजेश पाटील यांच्या मदतीने चिरनेर जंगल परिसरात मुक्त केले. फेंड्स ऑफ नेचर या निसर्गप्रेमी, प्राणीप्रेमी संघटनेतर्फे विविध पशु पक्षी, वन्य जीवांचे नेहमी संरक्षण, संवर्धन केले जाते.



## कळंबोलीत कीर्तन महोत्सव सोहळा

। पनवेल । प्रतिनिधी ।

कळंबोली येथे साईबाबा उत्सव प्रित्यर्थ भव्य कीर्तन महोत्सव सोहळ्याचे सोमवार दि.१७ ते शुक्रवार २१ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. या कीर्तन महोत्सवाच्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण करण्यात येणार आहे. कळंबोली कॉलनीच्या सेक्टर ५ येथे होणाऱ्या किर्तनास गणेश महाराज डांगे, कविराज झावरे, निवृत्ती इंदोरीकर, शिवलीला पाटील, कबीर अत्तार, लक्ष्मीप्रसाद कुलकर्णी, निलेश कोरडे, अश्विनी म्हात्रे यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने श्री गणेश सहकारी गृहनिर्माण सोसायटी यांच्या सहकार्याने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी आपण सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष व समाजसेवक आत्माराम नामदेव पाटील यांनी केले आहे.

## बबनदादा पाटील कॉलेजमध्ये आरोग्य शिबीर

। पनवेल । प्रतिनिधी ।



तळोजे येथील बबनदादा पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये आरोग्य शिबीर चे आयोजन भारती मेडीकव्हरचे हॉस्पीटल यांच्या सौजन्याने करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष व शिवसेना उपनेते बबनदादा पाटील यांच्या हस्ते या शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले.

यावेळी जगदिश गायकवाड, हरेश केणी, बबन केणी, नोफील सय्यद, अनिल नाईक, विजय केणी, कैलास घरत, अंकुश गायकवाड, विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिनगारे, प्राचार्य डॉ मनोज अग्निहोत्री, प्राचार्य डॉ. अक्षय मेश्राम, अर्चना हिवसे, डॉ. आनंद श्रीवास्तव, डॉ. सुश्मिता पराटे, सचिन श्रीवास्तव आदींसह विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते. या शिबीराचे आयोजन प्राचार्य सौरभ खेडेकर, प्राची गाडे, रसना नायर यांनी केले होते.

## शेखर लाळे यांचे निधन

**उरण :** उरण शहरातील देऊळवाडी येथील देऊळवाडीतील विठ्ठल मंदिराचे पुजारी शेखर गणपत लाळे यांचे बुधवार (दि.१२) रोजी पहाटे ५ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. लाळे एनएडीमध्ये ते मोठ्या हुद्द्यावर कामाला होते.ज्योतिषी व आध्यात्म यात त्यांचा दांडगा अभ्यास होता. आपल्या कार्यकाळात त्यांनी जीवनातील बऱ्याच गोष्टीबद्दल जनतेला,नागरिकांना मार्गदर्शन केले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा असा त्यांचा कुटुंब परिवार आहे. यांच्यावर पनवेलमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी उरण, पनवेल तालुक्यातील तसेच रायगड जिल्ह्यातील नातेवाईक, मित्रपरिवार ब्राह्मण सभा उरण, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, देऊळवाडी युवक मंडळ, देऊळवाडी ग्रामस्थ मंडळाचे पदाधिकारी, एनएडीचे अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## कार्तिकी एकादशीनिमित्त आळंदीत मांदियाळी

। रसायनी । प्रतिनिधी ।

कार्तिकी एकादशीला आळंदी येथे वारकरी संप्रदाय व भक्तांची तुफान मांदियाळी जमली होती. दरवर्षी प्रमाणे यंदाही वारकरी संप्रदाय व भाविकांनी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेतले.

आळंदीमध्ये कार्तिकी एकादशीचे मोठे धार्मिक महत्त्व आहे, जिथे पंढरपूरहून वारकरी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी स्थळाला भेट देण्यासाठी येतात. या दिवशी वारकरी संप्रदायाचे लोक आषाढी एकादशीला आळंदीहून पंढरपूरला गेलेल्या यात्रेतून परत येऊन ज्ञानेश्वरांचे स्मरण करतात. ही एकादशी मोठी एकादशी किंवा प्रबोधिनी एकादशी म्हणूनही ओळखली जाते, कारण या दिवशी भगवान विष्णू चातुर्मासातील निद्रेतून जागे होतात, असे मानले जाते. वारकरी संप्रदायासाठी ही एकादशी अत्यंत महत्त्वाची आहे. या एकादशीने चातुर्मास व्रत पूर्ण होते आणि भगवान विष्णू पुन्हा सृष्टीचे पालन करतात, असे मानले जाते.



## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **दुकानाचा गाळा भाड्याने देणे आहे.** अलिबाग-रेवस रोडवर हॉटेल रविकिरण शेजारी, अलिबाग बाझार शेजारील गाळा, एरिआ-६६० चौ.फूट, अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा- ९८५०९५६७८२/७०५८५८१८०१
- **सर्वप्रकारचे विवाह/आजार,** संतानप्राप्ती/सोनेतारणावर बिनव्याजी कर्ज/शेतकरी/निराधार विधवा महिलांना दरमहा ३०००/-ठेवीदारांना दरमहा ८,०००/- घरबसल्या कायमस्वरुपी लाखो कमविण्यासाठी डॉ. नथुराम धायाशेठ मोकल, इंटरप्रायझेस शिहू (पोयनाड-नागोठणा) रायगड ४०२१०६/८२६३८९०४२३(वेळ ठरवूनच)
- **SALE OF BAGAYATI WADI.** 13 GUNTHE, @26 Lakh per Guntha, 200 Mtr. (meter) from. sea Beach. Village-THAL, Gunjal Ali, Alibag, M. 8779805353
- **श्री इलेक्ट्रीकल अँड प्लंबिंग वर्क्स,** चेंढरे मारुती मंदिराशेजारी कामासाठी ड्रायव्हर, इलेक्ट्रिशन, वायरमन व प्लंबर या कामाचा अनुभव असलेली मुले पाहिजेत. प्रत्यक्ष भेटा पगार रु. १५०००/- संपर्क- ९४२२६९०८५३,७८७५६८३७७३
- **समुद्रापासून पाच मिनिट** अंतरावर फुल फर्निश ब्लॉक विकणे आहे. मो. ८८०५५४०४६४.
- **कंपनी अधिकाऱ्यांच्या गृपकरीता भाडेतत्त्वावर १२०० स्वे.फुट** दोन बेडरूम किचन व हाप बेडरूम ३०० फुट गॅलरीसह अधिकाऱ्यांच्या गाड्यांच्या पार्किंगसह कॉटेज सर्व सोयीयुक्त भाडेतत्त्वावर देणे आहे. संपर्क - ८०१०६३४३५७
- **पाहिजे अलिबागमधील पॅथॉलॉजीकल** लॅबमध्ये सकाळी नऊ ते पाच वाजेपर्यंत कामासाठी मदतनीस मावशी पगार आठ हजार संपर्क- ९३७२५४९५३२

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९० / २२२७६१**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळवितो की, माझे अशिल सुवर्णा सुनिल सुर्वे, रा. गोंधळपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड यांची मिळकत मौजे गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील जुना सर्व्हे नं. ९४/१/अ म्हणजेच नवीन सर्व्हे नं.९४/१/१ ही आहे. तसेच निर्मला विश्वनाथ बिर्जे यांच्याकडे फक्त क्षेत्र ०-३३-०० हे.आर., आकार ७.६८ रु.पै. एवढेच मिळकतीचे क्षेत्र आहे. परंतु माझे अशिलांची संमती न घेता ती मिळकत म्हणजे नवीन सर्व्हे नं.९४/१/१ या मिळकतीतून क्षेत्र जास्त घेवून तुम्ही एकूण क्षेत्र ०-४५-०० हे. आर., आकार ८.९४ रु.पै असे क्षेत्र ७/१२ पत्रकी कोणाचीही संमती न घेता चुकीची नोंद केली आहे. त्याप्रमाणे गोंधळपाडा, ता.अलिबाग सर्व्हे नं. ९४/१/२ (जुना सर्व्हे नं. ९४/१ब) तयार केल्याचे समजले आहे. त्याचप्रमाणे सदर ७/१२ पत्रकी चुकीची नोंद केली आहे.

परंतु गोंधळपाडा सर्व्हे नं.९४/१/२ (जुना सर्व्हे नं.९४/१/ब) ही मिळकत निर्मला विश्वनाथ बिर्जे यांची क्षेत्र ०-३३-०० हे.आर., आकार ७.६८ रु.पै. एवढी मिळकत असतांना तुम्ही सदर क्षेत्र ०-४५-०० हे.आर., आकार ८.९४ रु.पै. बेकायदेशीर केलेले असल्याने त्यास माझ्या अशिलांची सक्त हरकत आहे.

तरी सदर मिळकत गोंधळपाडा सर्व्हे नं.९४/१/२ ही मिळकत तुम्ही विक्री व कब्जा करीत असल्याने माझे अशिलांस समजले असल्याने त्यास माझे अशिलांची सक्त हरकत आहे. याही उप्पर कोणीही सदर मिळकतीची खरेदी-विक्री अथवा हस्तांतरणाचा कोणताही व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार हा माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक :- १४/११/२०२५

**ॲड. जितेंद्र भगत**
जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड
मो.नं.९०७५२२८५६१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल श्री. रामदास शंकर पवार यांनी श्रीम. गुलाब तानाजी हिलम यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे शिंगढोल, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| २९ | ५/क | ०.७२.८० | ०.६४ |

तंद्‌गभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबाकबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - १६-११-२०२५

**ॲड. दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस, एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो. नं ९५६१७१९४९४
९०११७१६००१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी दिलेल्या सुचनेवरून आम्ही मौजे किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील विद्यमान मालक १) विलास गजानन पवार, २) किरण गजानन पवार, ३) विद्या दत्तात्रेय शिंदे, ४) सुलभा चंद्रकांत पवार, ७) दिपक चंद्रकांत पवार, ६) ज्योती दिनकर शेलार, ७) संध्या उदय खोचरे व ८) प्रकाश चंद्रकांत पवार यांच्या नावे असलेल्या खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीच्या मालकी हक्कांच्या निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत. मिळकतीचे मालकांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत व ती विकणेचा त्यांस पुर्ण हक्क अधिकार आहे.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतीमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी.द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायमस्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतीचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहेत असे गृहित धरून आमचे अशिल नियोजित खरेदी-विक्री व्यवहार पुर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती अलिबागपैकी ग्रुपग्रामपंचायत किहीमचे हद्दीतील व दुय्यम निबंधक अलिबाग यांचे अधिकार क्षेत्रातील मौजे किहीम, ता.अलिबाग, जि.रायगड येथील गट नं.३५६ क्षेत्र ० हे. ७०.३० आर (पोटखराब्यासह), आकार ५ रूपये ८३ पैसे ही संपूर्ण मिळकत.

अलिबाग
तारीख : १६/११/२०२५

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१, २, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

माझे आशील ०१) भागिरथी दादू थळे ०२) रेषा मधुकर माने, दोहो मु. मांडवा, ता.अलिबाग, जि.रायगड ०३) निर्मला सुरेश धुमाळ, मु.दिवलांग पेझारी, ता.अलिबाग जि.रायगड यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे.

मौजे बेलपाडा, ता.अलिबाग, जि. रायगड येथील गट नं.९, क्षेत्र ०.१६.८० हे.आर., आकार रू.२.५० पैसे व इतर मिळकती माझे आशील यांनी श्रीमती शानूबाई गजानन थळे, वगैरे मु. फुफादेवीपाडा, रेवस, ता.अलिबाग, जि.रायगड यांचे विरूद्ध मा. दिवाणी न्यायालय, अलिबाग येथे वाटपाकरीता व निरंतरचे ताकीदीकरीता रेग्युलर मुकदमा क्र.१४४/२०१७ चा दाखल केला आहे. सदरचा दावा सध्या प्रलंबित आहे. सदरची मिळकत माझे आशिल यांचे पुर्वगामी यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची होती. त्यांचे पश्चात सदर मिळकत माझे आशिल यांचे कब्जा वहीवाटीत आहे. ०१) शानूबाई गजानन थळे ०२) उषा चंद्रशेखर म्हात्रे, मु.फुफादेवीपाडा, रेवस, ता.अलिबाग, जि.रायगड ०३) आशा नरेश म्हात्रे, मु.मांडवखार, ता.अलिबाग, जि.रायगड ०४) सुनिल गोविंद थळे ०५) गणेश गोविंद थळे ०६) राजकुमार नारायण थळे ०७) जितेंद्र नारायण थळे ०८) जानकी उर्फ लक्ष्मी नारायण थळे ०९) महानंदा विश्वास थळे, १०) स्वाती आशिष महाडीक ११) गंगुबाई केशव पाटील क्र.४ ते ११ मु.सारळ, फुफादेवीपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड १२) नंदा निलेश कुली, मु.मुळेखंड, तेलीपाडा, पो.करंजा, ता.उरण जि.रायगड हे माझे आशिल यांचा हक्क डावलून संदर्भीत मिळकत त्रयस्त व्यक्तींचे लाभात हस्तांतरीत करण्याचे प्रयत्नात आहेत.

सबब, या जाहीर नोटीशी अन्वये सर्व लोकांस कळविण्यांत येते की, ०१) शानूबाई गजानन थळे ०२) उषा चंद्रशेखर म्हात्रे, मु.फुफादेवीपाडा, रेवस, ता.अलिबाग, जि.रायगड ०३) आशा नरेश म्हात्रे, मु. मांडवखार, ता.अलिबाग, जि.रायगड ०४) सुनिल गोविंद थळे ०५) गणेश गोविंद थळे ०६) राजकुमार नारायण थळे ०७) जितेंद्र नारायण थळे ०८) जानकी उर्फ लक्ष्मी नारायण थळे ०९) महानंदा विश्वास थळे, १०) स्वाती आशिष महाडीक ११) गंगुबाई केशव पाटील क्र. ४ ते ११ मु.सारळ, फुफादेवीपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड १२) नंदा निलेश कुली, मु.मुळेखंड, तेलीपाडा, पो.करंजा, ता.उरण जि.रायगड यांचेशी संदर्भीत मिळकती बाबत कोणीही कोणत्याही स्वरूपाचा खरेदी, विक्री, साठेकरार व अन्य व्यवहार करू नये. त्यास माझे आशील यांची सक्त हरकत आहे. याउपरही कोणीही बेकायदेशीरपणे अशा प्रकारे व्यवहार केल्यास तो माझे आशिल यांजवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. कळावे.

अलिबाग
तारीख १५.११.२०२५

**ॲड. एस.वाय.बारटके**
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे रांजणखार, ता.अलिबाग येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) | मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| रांजणखार | १८ | ०-०७-९०<br>पो.ख. ०-००-२०<br>०-०८-१० | १.१२ | श्री.शंकर श्रावण पाटील |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता.१६/११/२०२५

**ॲड विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली निवासी सदनिका मिळकत सदनिका मालक श्री. महेश विश्वनाथ सोनावळे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**निवासी सदनिका मिळकतीचे वर्णन**

कर्जत नगर परिषद, कर्जत यांचे हद्दीतील मौजे कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्वे नं. / हिस्सा नं. २/१ब, प्लॉट नं. ०३ या बिनशेती मिळकतीवरील युवराज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित मधील पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका नं. १०३, क्षेत्र ५४.०८ चौ. मी. म्हणजेच, ५८२ चौ. फुट बिल्टअप (कर्जत नगर परिषद, कर्जत जुना मालमत्ता क्र. Z1000463, नवीन मालमत्ता क्र.९१२/६.)

तरी वरील निवासी सदनिका मिळकतीमध्ये जर कोणतीही व्यक्ती बँक, वित्तीय संस्था या म ालमत्तेवर वारसा, वाटा, विक्री, गहाण, भाडेपट्टा, दान, बक्षीस वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क सांगत असेल तर, हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : १६/११/२०२५

सही/-
**ॲड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : शॉप नं.१५, सनराईज अपार्टमेंट,
कचेरी रोड, कर्जत, जि. रायगड - ४१० २०१.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**




## राशीभविष्य

- **मेष** : अपेक्षापूर्तीचं समाधान लाभेल. अकारण चिंताग्रस्त राहू नका. धार्मिक स्थळांच्या यात्रेचे योग आहेत.
- **वृषभ** : घेतलेल्या निर्णयावर ठाम रहा. प्रयत्नातील सातत्य कायम ठेवायला हवं. अपचनाचा त्रास संभवतो.
- **मिथुन** : वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. थोरामोठ्याचं सहकार्य लाभेल. व्यवसायात उलाढाल वाढती राहील.
- **कर्क** : आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करावेत. कार्यक्षेत्रात अनपेक्षित अडचणी येतील. संयम बाळगावा.
- **सिंह** : रखडलेल्या योजना मार्गी लागतील. स्थावरबाबत तुर्तास निर्णय घेऊ नये. आर्थिक स्थिरता राहील.
- **कन्या** : व्यवसायात स्पर्धा वाढीस लागेल. परिस्थिती पाहून निर्णय घ्यावेत. रखडलेलं कामं मार्गी लागेल.
- **तूळ** : आर्थिक आवक समाधानकारक राहील. कलाकारांचा नावलौकीक वाढेल. खाण्यावर नियंत्रण ठेवावं.
- **वृश्चिक** : भागीदारी व्यवसायात विचारानं रहावं. गैरसमजांना वाव देऊ नका. महत्त्वाचे निर्णय तुर्तास नको.
- **धनु** : शुभकार्याची बोलणी होतील. सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. अनावश्यक ताण टाळायला हवा.
- **मकर** : आर्थिक बाबतीत ओढाताण होईल. मुलांचे प्रश्न चिंता निर्माण करतील. विचारपूर्वक पावलं टाकावी.
- **कुंभ** : खर्च वाढला तरी प्राप्तीचं प्रमाण तसंच राहील. वैवाहिक सौख्य लाभेल. जुनी येणी वसुल होतील
- **मीन** : कार्यक्षेत्रात उलाढाल वाढती राहील. नव्या योजना मार्गी लागतील. मानसिक स्वास्थ लाभेल.

## ब्युटी मंत्रा
### अंडरटोननुसार प्रसाधनं निवडा

* नसांचा रंग हिरवट असेल तर तुमचा अंडरटोन वॉर्म आहे असं समजावं. वॉर्म अंडरटोन असणाऱ्या महिलांना सोन्याचे किंवा सोनेरी रंगाचे दागिने शोभून दिसतात. उन्हात गेल्यानंतर त्वचा काळी पडत असेल पण रापत नसेल; ती पिवळसर दिसत असेल तर अंडरटोन वॉर्म असतो. * नसांचा रंग हिरवट निळसर असेल तर ते न्यूट्रल अंडरटोनचं लक्षण समजावं. न्यूट्रल अंडरटोन असणाऱ्या महिलांना सोनं आणि चांदी अशा दोन्ही प्रकारचे दागिने शोभून दिसतात. उन्हात गेल्यानंतर त्यांची त्वचा हिरवट दिसते. * मेक अप उत्पादनांवर डब्ल्यू, सी आणि एन अशा खुणा असतात. डब्ल्यूची खूण असणारं उत्पादन वॉर्म अंडरटोनसाठी योग्य असतं. सी खूण असणारं उत्पादन कूल अंडरटोनसाठी तर एन खूण असणारं उत्पादन न्यूट्रल अंडरटोनसाठी योग्य असतं. पण अशी कोणतीही खूण नसल्यास कूल अंडरटोनवाली उत्पादनं हलक्या गुलाबी रंगाची असतात आणि वॉर्म अंडरटोनसाठीची उत्पादनं हलक्या पिवळ्या रंगाची असतात हे जाणून घ्या. न्यूट्रल अंडरटोन असणाऱ्यांनी पिवळ्या आणि गुलाबी रंगामधील कोणत्याही छटा निवडाव्या.

## दिनविशेष
### १६ नोव्हेंबर

- १९६० : 'गॉन विथ द विंड'चा नायक क्लार्क गेबलचे निधन.
- १९९१ : सुप्रसिद्ध गणिततज्ज्ञ वसंत हुजूरबाजार यांचे निधन.
- २००२ : जनरल परवेझ मुशरफ यांची पाकिस्तानच्या राष्ट्राध्यक्षपदी दुसऱ्यांदा निवड झाली.
- २०१३ : मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर आणि रसायनशास्त्रातील विज्ञानयोगी प्रा. सी. एन. आर. राव यांना भारतरत्न जाहीर.
- २०१५: कटिहार-माल्डा पॅसेंजर ट्रेनमध्ये सात जिवंत बॉंब आढळून आले.

## स्मार्ट टिप्स
### असा बनवा टाईमलॅप्स व्हिडिओ

टाईम लॅप्स व्हिडिओमध्ये स्लो मोशनमध्ये व्हिडिओ शूट केला जातो. रस्त्यावर धावणाऱ्या गाड्या असो किंवा पळणारी माणसं, स्मार्टफोनच्या मदतीने तुम्ही त्यांचा टाईप लॅप्स व्हिडिओ बनवू शकता.

* गुगल प्ले स्टोअरवर टाईम लॅप्स व्हिडिओसाठी बरीच ॲप्स आहेत. फ्रेम लॅप्स, लॅप्स इट, मायक्रोसॉफ्ट हायपरलॅप्स, आय टाईमलॅप्स प्रो, आय मोशन, ओ स्नॅप यापैकी कोणतंही ॲप तुम्ही डाउनलोड करू शकता. * टाईमलॅप्स व्हिडिओ तयार करताना तुम्ही एका गोष्ट डोक्यात ठेवायला हवी, ती म्हणजे हालचाल. तुम्हाला नेमकं काय शूट करायचं आहे ते ठरवा आणि तुम्हाला तीच हालचाल टिपायची आहे हे लक्षात ठेवा. यामुळे व्हिडिओ घेताना अडचण येणार नाही. * टाईमलॅप्स व्हिडिओ शूट करण्यासाठी तुम्हाला ट्रायपॉड म्हणजे कॅमेऱ्याचा स्टॅंड वापरावा लागेल. स्मार्टफोन हातात धरून शूट केल्यास व्हिडिओ हलू शकतो. त्यामुळे ट्रायपॉडचा वापर करणं गरजेचं ठरतं. * सर्वप्रथम स्मार्टफोन ट्रायपॉडमध्ये नीट बसवा. नंतर डाउनलोड केलेल्या ॲप्सच्या मदतीने टाईमलॅप्स व्हिडिओ तयार करा आणि बिनधास्त शेअर करा.

## आरोग्यमंत्र
### स्टडी टेबलचा वापर चांगला

ऑनलाईन काम करण्यासाठी लॅपटॉप वापरावा लागत असेल तर घरातील स्टडी टेबलचा वापर करणं जास्त चांगला ठरतो कारण स्टडी टेबल आणि त्यासमोर असणारी खुर्ची ही बसण्याची योग्य पद्धत लक्षात घेऊनच बनवली गेलेली असते. खुर्चीवर बसताना पाठ ताठ आणि खांदे सरळ करुन बसणं आवश्यक आहे. त्यामुळे तुम्हाला मान आणि कंबरेच्या दुखण्यापासून आपल्याला दूर राहणं शक्य होईल. घरी असताना आपल्यापैकी बरेच लोक सोफा, पलंग, डायनिंग टेबल किंवा सेंट्रल टेबलवर बसून लॅपटॉपवर काम करतात त्यामुळे आपल्याला व्यवस्थित बसता येत नाही. लॅपटॉपवर काम करताना मान खाली झुकवण्याचा प्रयत्न न करता लॅपटॉपखाली काही पुस्तकं, उशी किंवा काहीतरी उंच वस्तू ठेवून लॅपटॉपची उंची वाढवली तर लॅपटॉप अगदी डोळ्यासमोर येतो आणि खाली वाकून काम करण्याची गरज पडत नाही. काम करताना सतत शरीराची हालचाल करावी आणि बसण्याची पोजिशन थोडी थोड्या वेळानं बदलत रहावी. कधी भिंतीला पाठ टेकवून बसावं तर कधी लॅपटॉप मांडीवर घेऊन बसावं. शक्य असेल तर काही वेळ उभं राहूनही काम करायला हरकत नाही. सतत शरीराची हालचाल केल्याने स्नायूंमधील अवघडलेपणा निघून जाईल आणि शरीराच्या सर्व अवयवांना आराम मिळेल. माऊसचा वापर केल्याने हाताच्या स्नायूंवर पडणारा ताण कमी होतो. लॅपटॉपचा अधिक वापर करावा लागत असेल काळजी घ्यावी आणि दुखणी टाळावी.



## पंचांग

**रविवार, १६ नोव्हेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, कार्तिक कृ. १२, चंद्रराशी : कन्या, नक्षत्र : हस्त, योग : प्रीति, सूर्योदय ६.४९, सूर्यास्त ५.५८

## फॉरवर्डस

**हवा क़े रुख़ बदलनें क़ा क़्या ख़ौफ़ साहब...**

**हमनें तों अपनों कों भीं वक़्त पर बदलतें देख़ा हैं...!**

## भटकंती

* त्रिउंड ट्रेकही बराच लोकप्रिय होत आहे. हा कठिण ट्रेक आहे. त्यामुळे इथे तयारीनेच जायला हवं. मार्च ते जून या काळात इथे जाता येईल. दोन दिवसात हा ट्रेक पूर्ण करता येईल. * सिंगालिला कांचनजंग ट्रेकही खूप छान आहे. हा अनुभव खूप थरारक असेल यात शंका नाही. नेपाळ आणि सिक्किमच्या सीमांलगत हा ट्रेक आहे. मार्च ते मे आणि सप्टेंबर ते ऑक्टोबर या काळात इथे जाता येईल. या ट्रेकसाठी २० दिवस लागतील. * गंगोत्री गोमुख ट्रेक तुम्हाला अनोखा अनुभव देऊन जाईल. उत्तराखंडमधला हा ट्रेक तुमच्या डोळ्यांचं पारणं फेडणारा असेल. मे ते जून आणि ऑगस्ट ते ऑक्टोबर या काळात इथे जाता येईल.

## करिअरवाटा
### ...तर पदोन्नतीची वाट सुकर

नोकरीत सुरूवातीची काही वर्ष घालवल्यानंतर आपल्याला पदोन्नती मिळावी तसंच उच्च पदांवर काम करण्याची संधी मिळावी अशी अपेक्षा असणं साहजिक आहे. परंतु यासाठी काही विशेष तयारी आवश्यक ठरते. मुख्यत्वे संबंधित उद्योग, व्यवसायासंदर्भात अधिक माहिती प्राप्त करून घेणं, त्या क्षेत्रातील ताज्या घडामोडी, संशोधन याविषयी जाणून घेणं गरजेचं ठरतं. बऱ्याच लोकांना सतत स्वत:च बोलत राहण्याची किंवा आपलंच म्हणणं खरं मानण्याची सवय असते. ती चुकीची आहे. समोरच्या व्यक्तीचं म्हणणं शांतपणे ऐकावं. त्याच्या बोलण्यातील एखादा मुद्दा तुमच्या हिताचा ठरू शकतो. तुमच्या बोलण्यात विनम्रता हवी. समोरच्या व्यक्तीबरोबर चर्चा सुरू असताना कसं बसावं, हालचाली कशा असाव्या याचेही काही संकेत आहेत. ते जाणून आत्मसात करण्याचा प्रयत्न करावा.



सध्या ज्या पदावर आहात त्याद्वारे किती उत्तम काम केलं, कंपनीच्या-उद्योगाच्या प्रगतीला किती हातभार लावला या बाबी पदोन्नतीसाठी महत्त्वाच्या ठरतात. त्या व्यवसायाला शोभेसे कपडे, शूज यातून व्यक्तिमत्त्वाला वेगळा उठाव मिळतो. कामानिमित्त अनेकांशी नित्याचे संबंध येतात. त्यातील काहींबरोबर डिनर घेणं भाग पडतं. अशा वेळीही काही संकेतांचं पालन करावं. अशा छोट्या गोष्टींमधून व्यक्तिमत्त्व प्रभावी बनेल आणि तुम्ही यशस्वी ठराल.

## खेचाखेची
### उप पत्नी

हल्ली बायकांवर कामाचा खूपच ताण येतो...
म्हणून जिल्हाधिकाऱ्याला मदत करायला उपजिल्हाधिकारी आणि सहायक जिल्हाधिकारी असतात,
कार्यकारी, अधीक्षक आणि मुख्य अभियंत्यांना उप व सहा. अभियंते असतात
तसं मुख्य पत्नीला मदत करण्यासाठी उपपत्नी आणि सहायक पत्नी असायला हवी...
यावर आपले काय मत आहे ?

## वेगळं काही

जपानमधल्या ३५ वर्षांच्या अकिहिको कोन्डोची प्रेयसी जीवंत स्त्री नाही तर एक बाहुली आहे. तिच्या शरीरात व्हर्च्युअल रिॲलिटी सिंगिंग होलोग्राम बसवण्यात आला आहे. तिच्याशी केलेल्या लग्नात या इसमाने तब्बल १३ लाख रूपये खर्च केले. जपानमध्ये अनेक तरूण अविवाहित राहतात. पण अकिहिकोने बाहुलीशी लग्न करण्यामागे असं कोणतंही कारण नाही. त्याने आपल्या पत्नीचं नाव हसुने मिकू ठेवलं आहे. त्याचं पत्नीवर खूप प्रेम आहे. यामुळे तो पत्नीशी प्रतारणा करण्याचा विचारही करू शकत नाही. आपल्या जोडीदाराकडूनही त्याला हिच अपेक्षा आहे. म्हणूनच त्याने सजीव स्त्रीशी नाही तर बाहुलीशी लग्न केलं आहे. तिचं वय वाढणार नाही. तसंच ती कधीही अकिहिकोची फसवणूक करणार नाही.

## फॅशन फॅशन
### जीन्स आणि कुर्तीची नजाकत



गुलाबी थंडीची मजा घेताना आपण स्टायलिश दिसायला हवं असा अनेकींचा आग्रह असतो. त्यादृष्टीने नवनवीन फॅशन्सच्या, आकर्षक पेहरावावर भर दिला जातो. असं असलं तरी स्टाईल आणि कम्फर्टसाठी जीन्सला प्राधान्य दिलं जातं. जीन्सवर शर्ट, टी-शर्ट किंवा कुर्ता घातला की फॉर्मल, कॅज्युअल आणि एथनिक लूक मिळतो. खरं तर जीन्स हा 'ऑल टाईम फेवरिट' ऑप्शन आहे. इंडो-वेस्टर्न लूक मिळवण्यासाठी जीन्सवर पारंपरिक कुर्ती घालता येईल. बॉलिवूड सेलेब्जही हा लूक कॅरी करतात. तुम्ही कुती, जीन्सचं कॉम्बिनेशन करून हटके लूक मिळवू शकता.

लाँग कुर्ता आणि जीन्स हा लूकही बेस्ट! सध्या डेनिमच्या जेगिंग्ज मिळतात. त्यावर कुर्ता घालता येईल. जीन्सवर कोणत्याही रंगाचे कुर्ते शोभून दिसत असल्याने मॅचिंग लेगिंग शोधण्याचा त्रास वाचतो. पायघोळ फ्लोरल कुर्तीचा ऑप्शनही आहे. कुर्तीवर ट्रेंडी लाँग नेकलेस घालू शकता. सिंपल कुर्तीवर लांब कानातली घालता येतील. थंडीचा अंदाज घेता कुर्ती आणि जीन्सवर बूट घालता येतील. तर सखींनो, आवडत्या कु र्ती जीन्ससोबत कॅरी करा आणि व्यक्तिमत्त्वाला आगळी झळाळी द्या.

## सुडोकू २९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ६ | | | | ५ | ९ | | |
| | | | | ८ | | | २ | ६ |
| ५ | १ | | २ | ६ | ७ | | | |
| | २ | ७ | ५ | ९ | ३ | ६ | ८ | |
| ३ | | | | | | | | ९ |
| | ९ | ६ | ७ | १ | ४ | २ | ३ | |
| | | | ३ | ७ | २ | | ९ | ४ |
| ९ | ३ | | | ५ | | | | |
| | | २ | ६ | | | | ५ | ८ |


**टीप -**

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू २८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ८ | ६ | ७ | १ | २ | ९ | ३ | ५ |
| २ | ७ | ९ | ३ | ४ | ५ | ८ | ६ | १ |
| ३ | १ | ५ | ९ | ६ | ८ | ४ | ७ | २ |
| ७ | ४ | ३ | ५ | ८ | ९ | २ | १ | ६ |
| ५ | २ | ८ | ६ | ३ | १ | ७ | ९ | ४ |
| ६ | ९ | १ | २ | ७ | ४ | ३ | ५ | ८ |
| ९ | ६ | २ | ४ | ५ | ३ | १ | ८ | ७ |
| ८ | ५ | ४ | १ | ९ | ७ | ६ | २ | ३ |
| १ | ३ | ७ | ८ | २ | ६ | ५ | ४ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक २९



**आडवे शब्द :-**
१) अधिक महिना
४) शेवट, परिणाम
८) अल्प, किंचित भाग
९) कलंकाचा ठिपका
१०) ढाळ, उतरण, टेकडी
११) झोंबणारे
१४) जुगाराचा एक प्रकार
१६) नक्षीदार ताट
१८) काटकसर
१९) सुसर
२०) मडक्याचा तुकडा, मातीचे भांडे
२१) सामान
२२) प्रस्थान करणे
२४) वर्तमानपत्रातील स्तंभ, कॉलम
२६) तर्क, अंदाज, अनुमान
२८) सूट
२९) चांदीचा पर्वत
३१) गर्व हरण, ताठा नष्ट होणे
३३) हालचालीवर ठेवलेली नजर
३५) शोध, माग
३७) गतिमान
४०)उसनवार ४२) लाकडाची एक जात
४३) अंत:करण
४४) बहुमोल
४५) आस्था, माया, करुणा
४६) दात
५१) सोने
५३) पथकाचा प्रमुख
५५) पांढरपेशा, नोकरी करणारा
५७) छोटा
५९) मऊ
६०) व्याज आकारणीतील द.सा.द.शे चे विस्तृत रुप

**उभे शब्द :-**
१) मोठा दगड
२) धैर्य सुटणे, डळमळणे
३) सडलेला
४) पुन्हा पुन्हा
५) धाक, दरारा
६) सारांश
७) फुटकी कवडी
८) वर-वधू मधील पडदा
१२) पद्धत
१३) अंतरिक्ष
१५) उपहास
१९) फणसाचा एक प्रकार मौज करणे
२३) फुरसत
२५) स्त्री
२६) पर्वत
२७) ललाट
२८) आमनेसामने
३०) इतराहून निराळा, दुर्लभ
३२) गंध
३३) पर्ण
३४) तृष्णा
३५) पोळी भाजण्याचे पात्र
३६) पाप
३८) रानरेडा
३९) न्यूनता, उणीव
४०) अरण्य
४१) वाळ्याची सुगंधी मूळ
४२) व्याजाने कर्ज देणारा
४३) मनची इच्छा
४४)अपमान
४७) रक्तवाहिनी
४८) अकस्मात
४९) लाज
५०) दुधाच्या वड्या
५२) खूप मोठा
५४) अर्धा शेर
५६) पांढुरका रंग, कठोर
५८) मोठी नदी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर




राज्य सरकारची आर्थिक स्थिती चांगली नसली, की काय अनर्थ घडू शकतो, हे दाखवणारे रोहित आर्य प्रकरण अनेक सजग नागरिकांना अस्वस्थ करुन गेले. आपले कथित थकित देणे मिळावे, यासाठी वर्षभर प्रयत्न करूनही हाती काही न आल्याने सरकारचे लक्ष वेधण्यासाठी रोहितने चुकीचा मार्ग निवडला आणि त्याचा बळी गेला. मात्र हा बळी अनेकांना अंतर्मुख करुन गेला. सरकार, शासन याबाबत अंतर्मुख होईल का?

# ओलिसनाट्याचा अस्वस्थ करुन गेलेला अंत







**राही भिडे**

मुलांना ओलीस ठेवण्याच्या मुंबईतील प्रकरणात पोलिसांच्या गोळीबारात ठार झालेल्या रोहित आर्य याचे एक पत्र समोर आले आहे. त्यात त्याने आपली असहाय्यता आणि निधी न मिळाल्यामुळे येणाऱ्या समस्यांचे वर्णन केले आहे. एका सरकारी प्रकल्पात रोहितचे पैसे अडकले होते आणि वारंवार प्रयत्न करूनही त्याला ते मिळाले नाहीत. त्यामुळे त्याने मुलांना ओलीस ठेवले होते. रोहितने पत्रात लिहिले आहे, की तो २०१३ पासून 'प्रोजेक्ट लेट्स चेंज' (पीएलसी) चालवत आहे. २०१५ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात हा प्रकल्प सुरू केला होता. रोहितने २०२२ मध्ये 'पीएलसी'च्या 'स्वच्छता मॉनिटर' टप्प्याची संकल्पना मांडली. एक सामाजिक उद्योजक म्हणून त्याने हा प्रकल्प स्वखर्चाने पाच हजारांहून अधिक शाळांमध्ये राबवला आणि त्याचे परिणाम दाखवले. २०२३-२४ मध्ये त्याचा प्रस्ताव मंजूर झाला. मुख्यमंत्र्यांच्या 'माझी शाळा सुंदर शाळा' मोहिमेत सर्वाधिक गुण स्वच्छता मॉनिटरला देण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'पीएलसी स्वच्छता मॉनिटर मोहिमे'ची सुरुवात केली. 'संकल्पना माझी होती, ती प्रभावी करण्यासाठी केलेली गुंतवणूक माझी होती, मोहिमेचे नाव माझे होते, प्रस्ताव माझा होता, अंमलबजावणीसाठी केलेले कष्ट माझे होते; पण पैसे दुसऱ्याला देण्यात आले', असा आरोप रोहितने वारंवार केला. या संदर्भातील अनियमिततेकडे त्याने लक्ष वेधले. अनियमितता निदर्शनास आणून देताच त्याच्या कामात जाणीवपूर्वक गोंधळ आणि अराजकता निर्माण करण्यात आली, असा त्याचा आरोप आहे. दुर्दैवाने यातूनच त्याच्या एन्काउंटरचे दुर्दैवी कांड घडले.

२०२४-२५ मध्ये रोहितने नवीन प्रस्ताव सादर केला; परंतु त्याच्याशी संपर्क न साधता त्याची 'स्वच्छता मॉनिटर' मोहीम थेट 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' मोहिमेत समाविष्ट करण्यात आली. थकित रकमेसाठी उपोषण केल्यानंतर मंत्र्यांनी वैयक्तिक धनादेशाद्वारे केवळ २५ टक्के रक्कम दिली. 'पीएलसी सॅनिटेशन मॉनिटर' प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर पुढील तीन वर्षांमध्ये उर्वरित रक्कम देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. रोहितने म्हटले आहे की शिक्षण मंत्री दादा भुसे यांना भेटण्याचे अनेक प्रयत्न निष्फळ ठरले. त्यामुळे न्याय मिळवण्यासाठी पुन्हा उपोषण सुरू करण्याशिवाय दुसरा पर्याय दिसत नव्हता. याचा अर्थ या प्रकरणात कुठे तरी पाणी मुरते होते. आता ओलीस नाट्यानंतर शिक्षण मंत्रालयाने म्हटले आहे, की आर्य याच्या कंपनीला एका प्रकल्पाचे नेतृत्व करण्याचे काम देण्यात आले होते. स्वच्छता कार्यक्रमात ५९ लाख विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात येणार होते. त्या वेळी ९.९ लाख रुपयांचे पेमेंट करण्यात आले होते. त्यानंतर २०२३-२४ मध्ये 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' नावाच्या योजनेचा दुसरा टप्पा सुरू झाला. २०.६३ कोटी रुपयांव्यतिरिक्त स्वच्छता मॉनिटर्सवर दोन कोटी रुपये खर्च करण्यात येणार होते; परंतु आर्य याने दिलेली कागदपत्रे अपूर्ण होती. त्याला एक माहितीपट बनवायचा होता; परंतु महागडे शुल्क, मनुष्यबळ आणि तांत्रिक मदतीतील अडचणींमुळे ही योजना मोहिमेत समाविष्ट करता आली नाही.

एका वर्षानंतर आर्य याला पुन्हा प्रकल्पावर काम करण्यास सांगितले गेले. त्यानंतर त्याने २.४२ कोटी रुपयांची मागणी केली. प्रस्तावावर चर्चा सुरू असतानाच आणखी एक त्रुटी समोर आली. भुसे यांनी सांगितले, की कोणत्याही प्रकल्पासाठी काही निविदा, अटी आणि शर्ती आवश्यक असतात. या प्रकरणात अशी कोणतीही प्रक्रिया सुरूही झाली नव्हती. एका खासगी मीडिया फर्मने शाळांकडून परस्पर पैसे वसूल केले. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये आर्य याच्याकडे जमा झालेली रक्कम सरकारी खात्यात जमा करण्यास सांगण्यात आले होते. संपूर्ण रक्कम जमा करत नाही, तोपर्यंत त्याचा प्रकल्प मंजूर होणार नाही, असे सांगण्यात आले. शाळांमध्ये स्वच्छता देखरेख प्रकल्पासाठी रोहितला दोन कोटी रुपये देण्याचा कोणताही करार झाला नव्हता. त्याने स्वेच्छेने काम केले आणि या कामासाठी त्याला योग्य प्रमाणपत्र देण्यात आले. त्यानंतर 'माझी शाळा सुंदर शाळा' कार्यक्रम राबवण्यासाठी त्याची सरकारशी चर्चा झाली; परंतु ती यशस्वी झाली नाही. महाराष्ट्र सरकारकडे रोहितची कोणतीही थकबाकी नव्हती. एकीकडे भुसे आणि शिक्षण विभाग यांचे म्हणणे वेगळे असताना ज्यांच्या काळात करार झाला, ते दीपक केसरकर यांचे म्हणणे मात्र वेगळेच होते.

रोहितने शिक्षण विभागात येऊन प्रकरण सोडवायला हवे होते, अशा प्रकारे कोणाला तरी ओलीस ठेवणे चुकीचे ठरले, असे सांगून केसरकर म्हणाले, की आपण मंत्री असताना रोहितला काही कंत्राटे देण्यात आली होती. त्याचे पैसे मी वैयक्तिक पातळीवर दिले. सरकारी काम होते, तर वैयक्तिक पैसे का दिले आणि आर्य याच्या चकमकीनंतर आजी-माजी शिक्षणमंत्र्यांना कंठ फुटला असेल, तर रोहितने ज्या वेळी आंदोलन केले, उपोषण केले, त्या वेळीच कंठ का फुटला नाही, असा प्रश्न इथे उपस्थित होतो. १७ मुले आणि दोन ज्येष्ठांना ओलीस ठेवणाऱ्या रोहितचे जुने वैरही समोर आले. मूळचा पुण्याचा रहिवासी असलेला रोहित शिक्षण विभागासोबत एका प्रकल्पात सहभागी होता. रोहितने ऑगस्ट २०२४ मध्ये एक महिनाभर उपोषण केले होते. १९ ऑगस्ट २०२४ रोजी त्यांची प्रकृती बिघडल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. पत्नी अंजली आर्य हिने सरकारने आपल्या पतीचे कोट्यवधी रुपये दिले नाहीत, असा आरोप केला. त्यांनी असाही आरोप केला, की मंत्र्यांनी आश्वासने दिली होती; पण ती पूर्ण करण्यात अयशस्वी ठरले. अंजलीने सांगितले, की 'स्वच्छता मॉनिटर' प्रकल्प रोहितचा होता आणि मंत्र्यांनी तो 'माझी शाळा, सुंदर शाळा' योजनेत समाविष्ट केला होता. तिच्या म्हणण्यानुसार दोन कोटी रुपये मंजूर झाले होते; परंतु पैसे मिळाले नाहीत आणि रोहितला श्रेय दिले गेले नाही. असे असले, तरी शालेय शिक्षण विभागाच्या तत्कालीन सहसचिवांनी त्या वेळी सांगितले होते, की या प्रकल्पात चूक झाली आहे आणि त्याची चौकशी आवश्यक आहे. रोहितने आरोप केला होता, की त्याला अडकवण्याचा कट रचला जात आहे. मुंबईतील पवई परिसरातील 'आरए स्टुडिओ'मध्ये आर्य याने १७ मुलांना ओलीस ठेवले होते. पोलिस आणि विशेष कमांडोंनी केलेल्या कारवाईत सर्व मुलांना सुरक्षितपणे वाचवण्यात आले, तर चकमकीत जखमी झालेल्या रोहितचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणात एक नवीन दृष्टिकोन समोर आला. पोलिस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार मुलांना ओलीस ठेवल्यानंतर रोहितने राज्याचे माजी शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्याशी बोलण्याची मागणी केली. 'माझी शाळा, सुंदर शाळा' या प्रकल्पाची मूळ योजना त्याच्या संकल्पनेपासून प्रेरित होती, असा त्याचा दावा होता. सरकारने २०२२ मध्ये ही योजना लागू केली; परंतु त्याला कोणतेही पैसे देण्यात आले नाहीत किंवा कोणतेही श्रेय देण्यात आले नाही. त्यामुळे तो गंभीर तणाव आणि आर्थिक संकटात सापडला. रोहितने केसरकर यांचाही निषेध केला होता. मागील अहवालांनुसार, मंत्र्यांनी त्याच्या मागण्या पूर्ण केल्या जातील आणि भविष्यात पैसे दिले जातील, असे आश्वासन दिले होते; परंतु नंतर चौकशीचा हवाला देत त्याच्या फायली रोखून ठेवण्यात आल्या. मुलांच्या सुटकेनंतर काही तासांमध्येच शिक्षण विभागाने एक निवेदन जारी करून रोहित आणि अप्सरा मीडिया यांची २०२२ आणि २०२३ मध्ये 'प्रोजेक्ट लेट्स चेंज' या शहरी स्वच्छता मोहिमेचे नेतृत्व करण्यासाठी निवड करण्यात आली होती. या मोहिमेत ५९ लाख विद्यार्थ्यांना स्वच्छता निरीक्षक म्हणून तैनात करण्यात आले होते. यानंतर ३० जून २०२३ रोजीच्या सरकारी आदेशाद्वारे ९.९ लाख रुपये वितरित करण्यात आले.

दुसरा टप्पा २०२३/२४ साठी मुख्यमंत्र्यांच्या 'माझी शाळा सुंदर शाळा' या योजनेद्वारे पूर्ण करण्यात आला आणि त्यासाठी २०.६३ कोटी रुपये राखून ठेवण्यात आले. त्यात स्वच्छताविषयक उपक्रमासाठी दोन कोटी रुपये समाविष्ट होते. तथापि, रोहितने यासाठी सादर केलेले प्रकल्प दस्तावेजीकरण अपूर्ण होते. यामध्ये जाहिराती, मनुष्यबळ, तांत्रिक सहाय्य आणि आर्य यांच्या 'लेट्स चेंज' माहितीपटाच्या प्रदर्शनासाठी वाढवलेला खर्च समाविष्ट होता. या कमतरतांमुळे ही योजना अंमलात आणता आली नाही. एका वर्षानंतर रोहितने ही योजना पुन्हा सुरू करण्याची विनंती केली. प्रशासनाच्या मते 'लेट्स चेंज प्रोजेक्ट'चा संचालक म्हणून रोहित आर्य स्वच्छता मोहिमेत सहभागी होणाऱ्या शाळांकडून अधिकार नसताना नोंदणी शुल्क वसूल करत होता. त्यामुळे संबंधित पैसे परत येईपर्यंत त्याचा प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही, असे सांगण्यात आले. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रिपदी आल्यानंतर हा उपक्रम रद्द करण्यात आला. त्यातून रोहितने मुलांना ओलिस ठेवले. त्याची ती चूकच होती; परंतु रोहितचा खात्मा करावा, असा त्याचा अर्थ नाही. चर्चेचे दरवाजे बंद केल्याने हे नाट्य घडले आणि त्यात रोहितचा बळी गेला. **

# मुंबई कामगार नाका... स्वयंरोजगाराचा मोका



**निलेश साठे**

मुंबईमध्ये अनेक कामगार नाके तयार झाले आहेत. या नाक्यांवर अनेक कामगार एकत्र जमा होतात. जे बेरोजगार आहेत त्यांना नोकरी नाही. मग ते स्वतःच स्वतःच्या नोकरी व्यवसायाची तजवीज करतात. वरळी कामगार नाकासोबत सर्वात जास्त प्रसिद्ध असलेला नाका म्हणजे परळ पूर्व परिसरात असलेला कामगार नाका. नाका कसला तो नाका नाहीच, हम रस्त्याच्या बाजूने असणाऱ्या दुकानांसमोर सकाळी साडेनऊ वाजता अनेक कामगार येथे जमतात. त्यामध्ये कुणी कुशल कुणी अर्धकुशल तर ज्यांना काहीच जमत नाही असे सुद्धा कामगार येथे मोठ्या संख्येने जमत आहेत. यामध्ये कुणी उत्तम वायरमेन आहे तर कुणी उत्तम प्लंबर आहे कुणी रंगारी आहे तर कोणी बांधकाम कामगार आहेत. अगदीच कुणाला काही जमत नसेल तर तो हमाली करण्यासही तयार असतो. म्हणजे मिळेल ते काम करण्याची तयारी असणारे कामगार येथे नाक्यावर जमत असतात. जवळपास ५० कामगार या परळ नाक्यावर सकाळी साडेआठ ते साडेनऊ वाजेपर्यंत येतात दिवसभरात काही काम भेटले तर ठीक अन्यथा मग घरी जाऊन दिवसभर आराम करतात. परंतु काम भेटतेच. मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर इमारत बांधकामाचे काम चालू आहे. खूप क्वचित वेळा काम भेटत नाही असे होते. असे येथील कामगार सांगतात. आपल्या घरातील कुठलंही छोटं मोठं काम करायचं असेल तर मोठ्या प्रमाणावर विभागातील नागरिक इथे येतात आणि या कामगाराकडून योग्य तो मोबदला देऊन काम करवून घेतात. दिवसाला दोन हजार रुपये तरी हजेरी पडते असे येथील कामगार सांगतात. इथे येणारे बहुतेक जण परप्रांतीय आहेत. ते इथे नोकरी शोधत बसले नाहीत. मिळेल ते काम करण्याची जिद्द आणि मेहनत करण्याची तयारी आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी येथे चांगलाच जम बसवला आहे. मुंबईमध्ये आणखीही बऱ्याच ठिकाणी असे कामगार नाके तयार झालेले आहेत. केवळ नोकरीच्या जीवावर अवलंबून न राहता त्यांनी स्वतःच रोजगाराची संधी निर्माण केली आहे. विभागातील नागरिकांनाही याचा चांगला फायदा होताना दिसत आहे. कामाचे स्वरूप आणि लागणारा वेळ यावर त्याचे पैसे ठरवले जातात. बेरोजगारी ने त्रस्त होऊन वाम मार्गाला जाण्यापेक्षा थोडी मेहनत आणि चिकाटीने काबाडकष्ट करून पैसा कमावणे हे केव्हाही चांगलेच. मुंबई आणि पुण्यासारख्या शहरांमध्ये मराठी तरुणांनी अशा प्रकारचे नाके तयार करायला काय हरकत आहे. जर इतर लोक करू शकतात तर आपण का नाही. जे काही आपल्याकडे हुणर आहे कला आहे आणि जे काम आपल्याला जमतं त्यामध्ये छोटं मोठं काम करून स्वतःचा उदरनिर्वाह नक्की होऊ शकतो. जे बेरोजगार मराठी तरुण आहेत त्यांनी असा प्रयत्न करून बघायला काही हरकत नाही. मराठी तरुणांना जमणार आहे का हे? **

# जुन्या लग्न पत्रिकांचे विसर्जन करा !

**जगन घाणेकर**

तुळशी विवाह संपन्न झाले की सर्वत्र लगीन सराई सुरु आहे. सध्या सर्वत्र लग्नसमारंभांचा माहोल आहे. प्रतिदिन कुठे ना कुठे विवाहाची गाणी, बेण्डबाजाचे स्वर ऐकू येत आहेत. विवाह हा जीवनातील अत्यंत महत्वाचा क्षण मानला जातो. तो क्षण अधिक आनंददायी आणि यादगार व्हावा यासाठी प्रत्येक जण आपापल्या ऐपतीनुसार प्रयत्न करत असतो. विवाह निश्चित झाला कि सर्वात प्रथम कृती केली जाते ती म्हणजे पत्रिका छापण्याची आणि कोणाकोणाला निमंत्रण द्यायचे त्याची यादी तयार करण्याची. पत्रिकेसाठी मजकूर तयार करणे, पत्रिकेत नमूद करायची नावे काढणे, पत्रिकेचे नमुने पाहणे या गोष्टी एकामागोमाग सुरु होतात.

कोकणात पूर्वी विवाहाचे निमंत्रण द्यायला जाताना नारळ घेऊन जात असत. घरातील ज्येष्ठ मंडळींच्या हातात आदराने श्रीफळ देऊन त्यांचा आशीर्वाद घेतला जात असे. घरातील शुभकार्याला कुटुंबातील सर्वांना उपस्थित राहण्याचे तोंडी निमंत्रण दिले जात असे. पुढे प्रिंटेड पत्रिकांचा जमाना आला. कोणाकोणाला पत्रिका द्यायच्या याची यादी तयार करून कोणाला कोणी आणि कधी पत्रिका द्यायला जायचे याचे नियोजन केले जाते. या संपूर्ण निमंत्रण प्रक्रियेसाठी किमान १५ दिवस राखून ठेवावे लागतात. आता तर सोशल मीडियाचा जमाना आहे. सर्वच कार्यक्रमांचे निमंत्रण व्हाट्सअप च्या माध्यमातून एका सेकंदात एका क्लिकमध्ये सर्वांना पाठवले जाते. हल्ली तर पत्रिकेच्या फोटोसह निमंत्रणाचा व्हिडीओ तयार करून तो पोस्ट केला जातो. फेसबुक, ट्विटर आणि इंस्टाग्रामवर पत्रिकेची इमेज अपलोड करून सर्वांना लग्नाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले जाते. जमाना बदलला असला, निमंत्रण पद्धतीत सोशल मीडियाने अतिक्रमण केले असले, तरी निमंत्रण पत्रिकेचे महत्व अद्याप कमी झालेले नाही हेही खरे. थोड्या का होईना जवळच्या नातेवाईकांना आणि प्रतिष्ठित मंडळींना देण्यासाठी पत्रिका छापल्या जातातच. कुटुंबाच्या ऐपतीनुसार निमंत्रण पत्रिकेचे मूल्य ठरवले जाते. ज्याला बडेजाव दाखवायचा आहे अशी मंडळी एकेका पत्रिकेसाठी १०० ते २०० रुपयेसुद्धा खर्च करतात. अर्थात पत्रिका पाहणारा केवळ लग्नाची तारिख आणि मुहूर्त पाहतो त्यामुळे बाकीच्या शोबाजीला काही अर्थ उरत नाही. सध्या लगीनसराई सुरु असल्याने घरोघरी लग्नाच्या पत्रिका वाटल्या जात आहेत. त्यामुळे प्रत्येकाच्या घरात पत्रिकांचा खच येऊन पडला आहे. हिंदू धर्मात लग्नपत्रीकेवर श्री गणेशाचे चित्र छापण्याची किंवा मुखपृष्ठावर गणेशाचे चित्र असलेली पत्रिका विकत घेण्याची प्रथा आहे. गणपतीचे चित्र असलेल्या अशा पत्रिका केराच्या डब्यात टाकल्याने श्री गणेशाचा अवमान होतो. ज्या गणेशाच्या स्मरणाने आणि पूजनाने आपण कोणत्याही शुभकार्याची सुरुवात करतो. ज्या गणेशाला गणेश चतुर्थीच्या काळात मूर्तिरूपाने आपण सन्मानाने घरी आणून त्याची मनोभावे पूजा करतो, ज्याला आपल्या देवघरात अग्रभागी स्थान देतो. त्याच्या कृपेसाठी उपास तापास करतो त्या गणेशाचा अशाप्रकारे होणारा अवमान आपण कधी लक्षातच घेत नाही. रद्दीत दिल्या जाणाऱ्या पत्रिकांचे पुढे काय होते हेही आपणास ठाऊक नसते. देवतेचे नाम अथवा देवतेचे चित्र ज्या ठिकाणी असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप आणि शक्ती कार्यरत असते असे शास्त्र सांगते. त्यामुळे पत्रिकेवरील देवतेच्या चित्राचा सन्मान राखणे आवश्यक आहे. मात्र या पत्रिका साठवून तरी काय करायचे हाही प्रश्न आहेच. अशावेळी पत्रिकेवरील देवतेचे चित्र व्यवस्थित कापून ठेवावे आणि त्या चित्राचे देवघरातील निर्माल्यासोबत वाहत्या पाण्यात विसर्जन करावे, जेणेकरून आपल्या हातून देवतेचा अवमान होणार नाही आणि मनाचेही समाधान होईल. घरी येणाऱ्या श्री सत्यनारायण महापूजेच्या, वास्तुशांतीच्या पत्रिकांचा बाबतीतही आपण वरील प्रमाणे कृती करू शकतो. वर्ष संपत आले आहे, त्यामुळे नवीन कॅलेंडर आपल्या घरी आलेच असेल. जुने कॅलेंडर रद्दीत देताना, त्यांतील देवतांच्या छायाचित्रांची कात्रणे काढून तीसुद्धा निर्माल्यासोबत विसर्जित करूया! **

# गेट-टुगेदरची नवसंजीवनी

**"न सांगताच आज हे कळे मला, कसा जीव माझा तुझ्यामध्ये गुंतला, मग भीती कुणाची, कशाला?"**



**धनंजय शेटये**

काळाच्या अथांग सागरात विखुरलेल्या स्मृतींचे शिंपले आज पुन्हा किनाऱ्यावर येऊन चमकू लागले आहेत.

शाळा आणि महाविद्यालयीन आयुष्यातील ते निरागस दिवस, ती निरभ्र मैत्री, ती गुपचुप नजरांची देवाणघेवाण असते. हे सगळं जणू पुन्हा एकदा जगण्याच्या अंगणात नाचू लागतं, जेव्हा एखादा गेट-टुगेदर समोर येतो.

तो फक्त भेटीगाठींचा कार्यक्रम नसतो. तो असतो हृदयाच्या गाभाऱ्यात साठवलेल्या आठवणींचा उत्सव, भावनांच्या शिवारात फुललेल्या नवपल्लवांचा जल्लोष!

काळाचा पडदा आणि आठवणींची नाट्यरंगमंची उघडझाप होत असते.

पूर्वीचा गेट-टुगेदर म्हणजे निष्पाप हसण्याचा, शुद्ध मैत्रीचा मेळावा असायचा. पण आता या आधुनिक युगातील गेट-टुगेदरमध्ये भावनांना एक गूढ आणि गहिरं वळण मिळालं आहे.

काळाच्या वाळूत गाडलेल्या अपूर्ण प्रेमकथा, न बोललेली शब्दफुले, अपुरे राहिलेले स्पर्श या सगळ्यांचे ज्वालामुखी पुन्हा उबाळू लागतात.

फेसबुकच्या 'रीकनेक्ट' बटणाने जणू निद्रिस्त भावनांना नवसंजीवनी दिली आहे.

एक क्लिक, आणि भूतकाळाचा पडदा सरकतो... समोर ती 'ती' उभी असते, तीच हसरी, तीच ओळखीची नजर, तीच ओढ... आणि हृदयाच्या धडधडीचा ताल पुन्हा एकदा जिवंत होतो!

भावनांचा पुनर्जन्म आणि अनामिक ओढ असते.

"जर त्या वेळी आपण बोललो असतो, तर?" मनाच्या कप्प्यातली ही कुजबुज आता खुल्या आभाळात डोके वर काढते.

पन्नाशीतल्या शांत आयुष्यात एकाएकी पुन्हा किशोरवयीन रोमँटिक वादळ उठतं.

कुणी आठवणींच्या राखेतून निखारा शोधतोय, तर कुणी विस्मृतीच्या ढगांतून जुन्या प्रेमाचा इंद्रधनुष्य शोधतोय.

हे प्रेम नाही, हे जणू भावनांचा पुनर्जन्म आहे.

"ती आता कशी दिसत असेल?"

"ती अजूनही तेवढीच सुंदर असेल का?"

"त्या काळी धाडस झालं नव्हतं, पण आता जर सांगितलं तर...?"

अशा शेकडो विचारांच्या तरंगांनी मनाचे समुद्र उसळू लागतात.

सामाजिक भानाची आठवण ठेवायला हवी.

पण या ओघात एक गभीर प्रश्न मनात डोकावतो.

ही नव्याने फुलणारी नाती खरंच चिरंतन प्रेमाची कहाणी असतात का, की ती फक्त क्षणभंगुर आकर्षणाचं मृगजळ असतं?

आयुष्याच्या उत्तरार्धात स्वातंत्र्य आणि जबाबदारी यांचा संगम सांभाळणं ही खरी कला आहे.

प्रेमाच्या या नव्या तरंगात बुडून जाताना, आपल्या कुटुंबाचा, आपल्या मुलांचा, आणि समाजाच्या नजरेचा विचार करणं गरजेचं आहे.

मांजर जरी स्वतः डोळे मिटून दूध पित असलं, तरी जगाचे डोळे कधीच मिटलेले नसतात.

म्हणूनच आनंद साजरा करा, पण मर्यादांच्या चौकटीत राहून. भावनांना स्पर्श द्या, पण नियंत्रण गमावू नका.

गेट-टुगेदरचा खरा अर्थ समजून घ्यायला हवा.

गेट-टुगेदर म्हणजे फक्त जुने मित्र भेटणे नाही,

तो आहे भूतकाळाच्या नाजूक धाग्यांनी वर्तमानाचे वस्त्र विणण्याचा प्रयत्न असतो.

तो आहे संयम आणि संवेदनांच्या संगमात साजरा करायचा भावनिक उत्सव!

जिथे काळ पुन्हा मागे वळतो, नाती नव्या तेजाने उजळतात,आणि मन क्षणभर का होईना पुन्हा एकदा तरुण होतं...

शेवटची हळवी जाणीव असायलाच हवी. कधी कधी मनातल्या आठवणींचं गुलदस्तं उघडावं लागतं पण ते फक्त स्वतःसाठी.जुनी प्रेम पत्रं पुन्हा वाचू शकतो आपण, पण ती नव्या कथेची सुरुवात ठरू नये.

पन्नाशीतील मन तरुण असू शकतं, पण समाजाचे डोळे अजूनही जागे असतात...

गेट-टुगेदरला जा हसून या, पण हरवून नका जाऊ...आठवणी साठवा, पण आयुष्य विसरू नका! **



# उदासीनतेचे निष्पाप बळी...?



शिवाजी चौगुले

समाज जीवनामध्ये अनेक प्रकारच्या समस्या केव्हा कसे डोके वर काढतील याचा नेम नसतो. ज्या वेळेला आपण समाज व्यवस्था म्हणून विचार करतो. त्यावेळेला सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाला अधिकाधिक सुरक्षितता प्राप्त करून देणे याला प्राधान्य असते. जेणेकरून सामान्य माणसाचे रोजचे व्यवहार सुरळीतपणे पार पडतील त्याचे त्याच्या रोजगारावर, व्यवसायावर किंवा एकूण जीवनातील जी काही उद्दिष्टे आहेत ते साध्य करण्यावर लक्ष केंद्रित करता येईल. अशा प्रकारची अधिकाधिक सुरक्षितता जिथे असते त्या ठिकाणची समाज व्यवस्था सुदृढ आहे असे म्हणता येऊ शकते. भारतातल्या समाज व्यवस्थेचा विचार केला तर ती सुदृढ जरी असली तरी त्यातल्या समस्यांची वाढती संख्या लक्षात घेतल्यानंतर या सुदृढ समाज व्यवस्थेला गालबोट लावण्याचे किंवा नख लावण्याचे काम वेगवेगळ्या पद्धतीने सुरू असल्याचे दिसते. प्रामुख्याने अचानकपणे उद्भवणाऱ्या या समस्यांची गांभीर्याने दखल घेतली जात नाही आणि समस्यांचा निपटारा करण्याकरिता त्या पद्धतीची इच्छाशक्तीही दिसत नाही. विशेषतः समाज व्यवस्थेची ही सुरक्षितता ७० ते ८० टक्के ही सरकारी यंत्रणांवर, सरकारी कारभारावर अवलंबून असते. कारण सामान्य माणूस आपले दैनंदिन व्यवहार पार पाडत असताना तो या सरकारी नियमांना बांधील असतो. त्याला अनुसरून त्याला आपला जीवनक्रम चालवायचा असतो. नैतिक बंधन हा समाज व्यवस्थेचा वेगळा भाग झाला पण सगळ्या समाजाला सोयीची ठरेल अशा प्रकारची नियमावली सरकारकडूनच राबवली जात असते आणि त्याचे तो पालन करत असतो. सर्वसामान्य माणूस जो या समाज व्यवस्थेचा प्रमुख घटक असतो तो जर या सरकारी नियमांचे शक्य तितके पालन करत असेल तर त्या सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाच्या सुरक्षिततेचे नियम सरकारी यंत्रणांनी तितक्याच संवेदनशील हाताळले पाहिजेत. दुर्दैवाने आज ती परिस्थिती दिसत नाही आणि म्हणूनच देशाच्या सगळ्या प्रमुख भागांमध्ये, शहरांमध्ये एवढेच नव्हे तर गाव खेड्यांमध्ये सुद्धा चित्र विचित्र समस्यांची निर्मिती झालेली पाहायला मिळते.

**समाजव्यवस्था पोखरणारे प्रकार..**

सध्या देशभर भटक्या कुत्र्यांचा आणि बिबट्यांचा धुमाकूळ विशेषत्वाने पाहायला मिळतो आहे. या भटक्या कुत्र्यांनी आणि बिबट्यांनी इतका उच्छाद मांडला आहे की, ज्या शहरांमध्ये की गावांमध्ये स्वतःला सुरक्षित म्हणून सामान्य माणूस राहतो तिथेच आता या भटक्या कुत्र्यांनी आणि बिबट्यांनी सुद्धा शिरकाव केल्याने त्यांच्या या हिंस्त्र आक्रमणाला तोंड देता देता सामान्य माणसाला नाकीनऊ येत आहे. अलीकडे सर्वोच्च न्यायालयाने याबाबत कठोर निर्देश देऊन रुग्णालय, शाळा, महाविद्यालय म्हणजेच जी सार्वजनिक ठिकाणे आहेत त्या ठिकाणी या भटक्या कुत्र्यांना तातडीने आवर घालण्याच्या सूचना केल्या आहेत. एकीकडे हे निर्देश दिले जात असतानाच महाराष्ट्रासारख्या राज्यात सुद्धा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेला गावागावातला किंवा खेड्यापाड्यातला बिबट्यांचा धुमाकूळ थांबण्याकरिता काही उपाय करायला सुरुवात केली आहे. परंतु महाराष्ट्रातही बिबट्यांबरोबर भटक्या कुत्र्यांची ही समस्या आहे. व्यापक अर्थाने विचार केला तर मनुष्याच्या किंवा सर्वसामान्य माणसाच्या आजूबाजूला कोणती हिंसक घटना कशाप्रकारे घडून येईल याचा भरोसा नसतो. मग कधी जातीवादाचे हिंस्त्र रुप पाहायला मिळते तर कधी राजकीय हेवादाव्यामधून एकमेकांच्या हत्या करण्याच्या दिल्या जाणाऱ्या सुपाऱ्यांचा हिंस्त्रपणा पाहायला मिळतो. माणसांचा व्यवहार तर दुसरीकडे जे मुके प्राणी आहेत ते मुके प्राणीसुद्धा माणसाला हैराण करण्यासाठी टपून बसलेले पाहायला मिळतात. एकूणच समाज व्यवस्थेचा विचार करताना भटक्या कुत्र्यांपासून ते बिबट्यांपर्यंत किंवा माणुसकीलाही काळीमा फासणाऱ्या अनेक हिंसक घटनांचा एक विचित्र आघात सातत्याने पाहायला मिळतो आहे. सर्वोच्च न्यायालयाने कुत्र्यांबाबतचे दिलेले आदेश हादेखील देशातला एक अभूतपूर्व प्रकार ठरतो. ज्या कुत्र्यांना आपण पाळीव प्राणी समजतो आणि ज्यांच्याकडे नेहमीच दुर्लक्ष होत असते परंतु तोच कुत्र्यांचा विषय हा थेट सर्वोच्च न्यायालयाच्या प्रमुख निर्देशाचाही एक भाग होतो यावरून त्याची गंभीरता प्रकषनि लक्षात येते.

**सुरक्षिततेचे आव्हान..**

एकूणच वेगवेगळ्या पद्धतीने या समस्यांना सामोरे जाण्याची वेळ सामान्य माणसावर येत असते आणि म्हणूनच त्याच्या सुरक्षिततेचे प्रश्न अधिकाधिक गंभीर होत आहेत. या सर्व परिस्थितीतून स्वतःला सहीसलामत ठेवणे हीदेखील त्याच्यासाठी मोठी कसरत ठरलेली आहे. याच्या बरोबरीने दिल्लीसारख्या महानगरात तर आता प्रदूषणासारखा जीवघेणा प्रकार अतिशय गंभीर झालेला आहे. त्या प्रदूषणाच्या संदर्भात सुद्धा सर्वोच्च न्यायालयाला निर्देश द्यावे लागले आहेत. दिल्ली खालोखाल मुंबईच्या प्रदूषणातही वाढ होते आहे आणि जागतिक पातळीवरच्या एका सर्वेक्षणातून असे सिद्ध झालेले आहे की, दिवसेंदिवस वाढत जाणारे हे प्रदूषण त्यात भर घालणारे तापमान या सर्वांमधून एकूण मनुष्य जीवनाला नवे संकट ग्रासत आहे आणि गेल्या वर्षभरामध्ये प्रदूषणाच्या कारणाने जे विविध प्रकारचे आजार किंवा विकार निर्माण होतात त्यातून वर्षाकाठी थोडेथोडके नव्हे तर तब्बल वीस लाख लोकांचे मृत्यू होतात मग कधी कोणाला या प्रदूषणातून आतड्यांचा रोग, हृदयविकार, श्वसनाचे रोग अशा प्रकारच्या व्याधी जडतात आणि त्यात त्यांचे बळी जात असतात. म्हणजे चारी बाजूंनी मनुष्य जीवनाला भेडसावणाऱ्या समस्या समाज व्यवस्थेला पोखरून काढत आहेत. त्याला नख लावत आहेत आणि म्हणून या समस्यांचा त्या त्यावेळी बंदोबस्त करणे आणि जिथे मनुष्याच्या जीवालाच धोके उत्पन्न होत आहेत त्याला सर्वाधिक प्राधान्य देऊन या समस्यांचे निराकरण करणे अत्यंत गरजेचे ठरते. शोकांतिका हीच आहे की, सरकारी यंत्रणा याबाबतीत आवश्यक ती तत्परता दाखवत नाहीत आणि त्या उदासीनतेचे निष्पाप बळी जात राहतात. **

# शिक्षण : दिशा आणि दशा!

मुक्तांगण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

ऑगस्ट,१९७२मध्ये ''अर्थशास्त्राचा व्याख्याता'' या पदावर माझी अलिबागच्या जे.एस.एम. महाविद्यालयात नेमणूक झाली. अल्पावधीतच अर्थशास्त्र, हा विषय, विविध वर्गांना शिकविण्याच्या कार्यात रमून गेलो. ज्येष्ठ प्राध्यापकांच्या सहवासामुळे वाचन, लेखनाला प्रोत्साहन मिळाले. प्राध्यापक संघटनेतील सहभागामुळे प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांची आणि त्याबाबत त्यांच्या विविध विचारांची ओळख झाली. जनजागृती ग्राहक मंच-रायगड, लोकप्रबोधन आणि अंधश्रद्धा निर्मूलन या विविध सेवाभावी संस्थांमधील, मी आणि माझ्या पत्नीच्या, सक्रिय सहभागामुळे, विविध आर्थिक, सामाजिक प्रश्नांची ओळख झाली. निवृत्तीनंतरही काही वर्षे हे सर्व काम सुरू होते. नंतर वाढत्या वयामुळे, आम्ही दोघे, आता वाचन, लेखन आणि अलिबाग अंनिसच्या कार्यात सहभागी होत असतो. अलिबाग अंनिसच्या कार्यात, काही व्यक्ती, गेल्या काही वर्षात नव्याने जोडल्या गेल्याने, त्यांचीही ओळख झाली. प्राथमिक शिक्षक म्हणून काम करणाऱ्या संदीप वारगे यांचा आणि नंतर त्यांच्या संपूर्ण परिवाराचा परिचय झाला. त्यांच्याशी झालेल्या विचार विनिमयामुळे आणि त्यांच्या पुढाकाराने विद्यार्थी, शिक्षक यांच्यासाठी झालेल्या माझ्या व्याख्यानांचेवेळी आणि नंतर त्यांच्याशी वेळोवेळी झालेल्या संवादातून, त्यांचे विविध विचार समजून आले.

संदीप दत्तात्रेय वारगे, हे जून, १९९५ पासून प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. सध्या ते रायगड जिल्हा परिषदेच्या हटाळे येथील प्राथमिक शाळेत कार्यरत आहेत. गेले वर्षभर ते प्रभारी केंद्रप्रमुख म्हणून नागाव येथे काम करीत आहेत. तीस वर्षांच्या त्यांच्या सेवाकालात, त्यांनी बी.ए., बी.एड. या पदव्याही प्राप्त केल्या. त्यांना रायगड जिल्हा आणि महाराष्ट्र राज्याचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच अलिकडेच त्यांना हरियाणा विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट प्रदान करण्यातआली. डॉ. कलाम इंटरनॅशनल फाउंडेशन, रामेश्वरम यांच्या अब्दुल कलाम लॉन्च व्हेईकल या राष्ट्रीय मोहिमेत १५० उपग्रह निर्मिती आणि प्रक्षेपण चेन्नई येथे झाले. त्यामध्ये रायगड जिल्ह्यातील बारा विद्यार्थी, वारगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागी झाले होते. राष्ट्रीय शैक्षणिक वाहिनीवर त्यांचे शैक्षणिक व्हिडिओ प्रसारित झाले आहेत.

शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून, समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी ते अत्यावश्यक आहे. आजच्या युगात वाढती स्पर्धा, बदलते तंत्रज्ञान आणि वेगवान जीवनशैली, यामध्ये शिक्षणाचा आत्मा विसरला जात आहे. परंतु शिक्षकांनी हे विसरून चालणार नाही की, शिक्षणामुळेच मानवी मूल्यांची पायाभरणी होते. त्यामुळे आजचे विद्यार्थी उद्याचे जबाबदार आणि मूल्याधिष्ठित नागरिक होतील. यादृष्टीने डॉ.संदीप वारगे आणि त्यांचे सहकारी शिक्षक कार्यरत






आहेत. त्यांनी शाळेला केवळ ज्ञानकेंद्र नव्हे, तर जीवनकेंद्र केले. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील धडे शिकवतानाच, जीवनाचे धडे दिले.त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने सहशिक्षण, डिजिटल साक्षरता, स्वच्छता अभियान, वृक्षसंवर्धन, वाचन संस्कार आणि विज्ञान प्रयोग यासारख्या विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि जबाबदारीची भावना जागवली. प्रत्येक विषय अनुभवातून शिकण्याच्या पद्धतीवर भर दिला गेला. भाषा समृद्ध व्हावी यासाठी वाचनालयात मुक्त संवाद साधला गेला. वर्ग खोलीच्या पलिकडे जाऊन वारगे यांनी पालक, ग्रामसभा, स्थानिक प्रशासन आणि स्वयंसेवी संस्था यांना शिक्षण कार्याशी जोडून घेतले. शाळा हे समाजाचे प्रतिबिंब असते आणि शिक्षक हा त्या समाजाला प्रेरक ठरू शकतो. ग्रामसहभागाद्वारे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाकडे लक्ष देण्यात आले. शैक्षणिक प्रेरणा शिबिरांमुळे, नव्याने भरती झालेले शिक्षक आपल्या नवनवीन कल्पना राबवू लागले. त्यांच्या मते, शिक्षकाचा खरा पुरस्कार म्हणजे विद्यार्थ्याच्या डोळ्यात उमटणारा त्याचा आत्म विश्वास होय. आज कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑनलाइन शिक्षण आणि डिजिटल स्पर्धेच्या काळात शिक्षणाद्वारे मानवी मूल्य टिकवणे ही मोठी गरज आहे. तंत्रज्ञानाचा वापर करताना त्यामध्ये मानवी स्पर्श जपला पाहिजे. माहिती प्राप्त करताना आज समाजसेवा, पर्यावरण संवर्धन आणि नवोपक्रम कसे साधले जातील हेही त्यांनी शिकवले. त्यामुळे शिक्षणामध्ये तंत्र आणि संस्कार यांचा संगम साधला गेला. डॉ.वारगे यांच्या मते आज अनेक शैक्षणिक धोरणे कागदावर मांडली जातात. परंतु ही धोरणे 'वरून' नाही तर 'तळातून' तयार झाली पाहिजेत. प्रत्यक्ष अनुभवांतून तयार केलेल्या शिक्षण पद्धतीची उदाहरणे आज अनेक शिक्षकांच्या प्रशिक्षणात दिली जात आहेत. वारगे यांनी दाखवून दिले की, एक शिक्षक जर आपला कार्यकाळ, श्रम आणि विचार शिक्षणासाठी अर्पण करील, तर समाज परिवर्तन शक्य आहे, तेही शांतपणे, सखोलतेने आणि सातत्याने! शिक्षण हे केवळ करिअर नाही, तर ती एक संस्कार यात्रा आहे. हे व्यापक स्तरावर होण्यासाठी, विशेषतः ग्रामीण भागातील प्राथमिक शाळा हे संपूर्ण गावाचे सांस्कृतिक केंद्र व्हावे. त्यासाठी शाळेमध्ये उत्तम ग्रंथालय असल्यास, तेथे उदार ग्रामस्थांच्या सौजन्याने नियतकालिके येत असल्यास, विद्यार्थी आणि प्रौढ, त्यांचा लाभ घेऊ शकतील. विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम शाळांमध्ये आयोजित करता येतील. या दृष्टीने शिक्षकांनी, सुजाण गावकऱ्यांच्या मदतीने प्रयत्न केले पाहिजेत.

आपल्या भारतात १४ लाखांहून अधिक शाळा असून, सुमारे २५ कोटी विद्यार्थी आणि एक कोटी शिक्षक कार्यरत आहेत. भारतामध्ये आठ हजार शाळा विद्यार्थ्यांविना आहेत. तरीही तेथील २१ हजार शिक्षक वेतन घेतात. शिक्षण हा मूलभूत अधिकार असूनही जगभरात २७ कोटींहून जास्त मुले शाळेबाहेर आहेत. अपुरी आर्थिक तरतूद, बालमजुरी, युद्धग्रस्तता या समस्या सोडविल्याशिवाय सर्वांना शिक्षणाचा मूलभूत अधिकार प्राप्त होणार नाही. अशा स्थितीत दर्जेदार शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण कसे होणार, असा प्रश्न कैलाश सत्यार्थी करतात. यातूनच शिक्षणाच्या दिशा आणि दशेची कल्पना येते. शिक्षण आणि आरोग्य यांना, भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये, प्राधान्य दिल्यासच, शिक्षणाला योग्य दिशा प्राप्त होऊन, शिक्षण स्थिती सुधारू शकेल. **

# वीण दोघातली ही तुटेना...

**हल्ली छोट्या पडद्यावरील कुटुंबाभोवती फिरणाऱ्या टुकार मालिकांच्या दलदलीत मराठी पाऊल फसत चालले आहे. ना कथानक, ना अभिनय, ना वैविध्य, ना कल्पकता. रिमोट आपल्याच हाती असला तरी वाहिन्यांची, लेखकांची, कलाकारांची काही जबाबदारी आहे की नाही? २१ नोव्हेंबर हा जागतिक दूरचित्रवाणी दिन. म्हणूनच या दिवशी या विषयावर चर्चा करणे, बदल व्हावा यासाठी प्रयत्न करणे औचित्यपूर्ण ठरावे.**



डॉ. साधना कुलकर्णी

ते दिवसच वेगळे होते. १९७८ ते १९८२ या कालावधीतले. नागपूरला रहात असल्यामुळे पुण्या-मुंबईला दिसणाऱ्या टीव्हीचं खूप अप्रूप होतं. घरात बसल्या बसल्या टीव्हीवर कार्यक्रम, सिनेमा बघणं ही सुखाची परमावधी वाटायची तेव्हा. त्या काळात एकदा पुण्याला मावशीकडे गेल्यावर शेजाऱ्यांच्या टीव्हीवर दाराच्या फटीतून 'गजरा' बघितल्यावर लंडनच्या अल्बर्ट हॉलमध्ये कार्यक्रम बघितल्याचा फील आला होता. नागपूरात अनेक दिवस तो अनुभव सांगताना शब्द पुरत नव्हते. घरी 'टीव्ही आणू या' असं म्हणण्याची तर हिंमतच नव्हती. आधी अभ्यासात दिवे लावा. काय करायचाय घरात तो इडियट बॉक्स, असे वाग्बाण कोण झेलणार हो? महाराष्ट्रातील तमाम मराठी मध्यमवर्गीय घरातल्या परंपरेनुसार, नवीन कोणत्याही तंत्रज्ञानाला सुरुवातीला विरोध करणं म्हणजे शास्त्र असतं ते. याशिवाय मॅट्रिकची परीक्षा असेल तर विरोधाचे एक सबळ कारण घरच्यांच्या हातात असायचे. त्यातल्या त्यात दिलासा म्हणजे मामाकडे टीव्ही घेतला. मग काय, महिन्यातून एक-दोन वेळा टीव्ही बघण्याचं सुख मिळू लागलं. एका सुदिनी मामाने घरचं कार्य असल्यासारखं सगळ्या नातेवाईकांना आमंत्रण दिलं. त्या रविवारी संध्याकाळी दूरदर्शनवर 'आनंद' हा चित्रपट दाखवणार होते. आता संध्याकाळचा सिनेमा संपेस्तोवर रात्रीचे नऊ वाजणार. मामाचं घर दूर. त्यावेळी घरी गाड्या, बाईक्स असली चैन नव्हती. मग काय, मुक्कामालाच जायचं. बिचाऱ्या मामीने पंधराजणांचा स्वयंपाक आधीच रांधून ठेवला. आम्ही पोचलो तर मामा 'हाऊसफुल्ल'चा बोर्ड लावायचा का, या विचारात होता.

हॉलमध्ये सोफा, खुर्च्या, स्टूल, टीपॉय, सतरंज्या, आसनं घेऊन शेजारची मंडळी आधीच येऊन बसली होती. मग काही खिडकीत, काही जिन्यात तर काही डायनिंग टेबलवर आसनस्थ झाले. आता शेजारधर्म म्हणून चहापाणी ओघाने आलंच. सिनेमा सुरू झाल्यावर थोड्या वेळाने मुसमुसण्याचा आवाज येऊ लागला. नंतर नाकाचा सू सू आवाज आणि त्यानंतर हुंदके सुरू झाले. समस्त माता-भगिनींचं सामूहिक रुदन ऐकून पुरुषवर्ग अवघडून गेला. त्यात मध्येच कुणाला पाणी तर कुणाला घाईची हे सतत सुरू होतं. आम्ही सगळे आनंद सिनेमा पाहून रडलो पण मामा मामी मात्र प्रेक्षकांची उस्तवार करता करता रडकुंडीला आले. तेव्हापासून मामाने कानाला खडा लावला. हे सगळं आठवण्याचं कारण म्हणजे, २१ नोव्हेंबर हा जागतिक दूरचित्रवाणी दिन आहे. १९९६ मध्ये संयु राष्ट्र संघाने पहिला जागतिक दूरदर्शन मंच आयोजित केला होता. तेव्हापासून २१ नोव्हेंबर हा दिवस दूरचित्रवाणी या माध्यमाचे महत्व अधोरेखित करण्यासाठी साजरा केला जातो. जगभरातील लोकांना एकत्र आणण्यासाठी, देशातील शांतता आणि सुरक्षितता अबाधित ठेवण्यासाठी तसंच शिक्षण, मनोरंजन, माहिती, बातम्या यासाठी दूरचित्रवाणी या माध्यमाची भूमिका अधिक प्रगत सशक्त करण्यासाठी हा दिवस नेमून दिला आहे. जगभरातील पत्रकार, विद्वान, लेखक यांनी या भूमिकेवर २१ नोव्हेंबर रोजी चर्चा करणे, बदल करणे, अद्ययावत करणे अपेक्षित आहे.

माहिती, ज्ञान, मनोरंजन आणि संवाद ही चतु:सूत्री ठरवून भारतात १५ सप्टेंबर १९५९ रोजी नवी दिल्ली येथील आकाशवाणी भवनात तात्पुरत्या उभारलेल्या स्टुडिओतून दूरदर्शवरून पहिले प्रसारण करण्यात आले. पु. ल. देशपांडे हे दूरदर्शनचे पहिले संचालक होते. त्यांनीच टेलिव्हिजनसाठी 'दूरदर्शन' असे नाव सुचवले. यासाठी दूरदर्शनवर काम करण्यापूर्वी त्यांनी बीबीसीमध्ये एक वर्षासाठी प्रशिक्षण घेतले होते आणि फ्रान्स तसेच पश्चिम जर्मनीमध्येही यासंबंधी काम केले होते. पु.लं आणि शिवेंद्र सिन्हा यांनी दूरदर्शनवर एक तासाचा पहिला कार्यक्रम तयार केला होता. त्यात पपेट शो, वैजयंतीमाला यांचे नृत्य, भेसळ प्रतिबंधात्मक कारवाईची माहिती अशा लोकप्रबोधन आणि मनोरंजन यांचा मिलाफ साधणाऱ्या कार्यक्रमांचा अंतर्भाव होता. प्रायोगिक तत्त्वावरचे हे प्रक्षेपण आठवड्यात तीन दिवस दिल्ली परिसरातच पाहता येत होते. मुंबईत १९७२ मध्ये दूरदर्शन केंद्र सुरू झाले. दूरदर्शनच्या आशियाई स्पर्धेतील सामन्याच्या वेळी भारतात दूरदर्शनचे प्रसारण रंगीत असावे, असे सरकारला वाटले. त्यामुळे पंतप्रधान इंदिरा गांधींनी ही कामगिरी श्री. विजय भटकर यांच्यावर सोपवली. १९८२ मध्ये भारतात झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने रंगीत झालेल्या टीव्हीचं प्रेम पुढे वाढतच गेलं. त्यावेळी दूरदर्शनवर हम लोग, बुनियाद, चित्रहार, सुरभी या मालिका फार प्रसिध्द होत्या. मराठीची फक्त सह्याद्री हीच वाहिनी होती. आभाळमाया, वादळवाट, दामिनी, गजरा असे दर्जेदार कार्यक्रम त्यावेळी होत असत.

पुढे वेगवेगळे खाजगी चॅनेल्स सुरू झाल्यावर टीव्हीने कातच टाकली. चोवीस तास कार्यक्रम, अनेक चॅनेल्स माहिती, बातम्या, मनोरंजन, क्रीडा, ज्ञान... काय नव्हतं त्या चौकोनी पडद्यावर? रामायण, महाभारत, क्यूं की सास भी कभी बहु थी यांनी तर विक्रम केले. हे कार्यक्रम सुरू असताना रस्त्यावर कर्फ्यू लागल्याप्रमाणे शुकशुकाट असे. हळूहळू या टीव्हीने सगळ्यांच्या घरात एका अतिमहत्वाच्या व्यक्तीप्रमाणे स्थान मिळवले. पण मोबाईल आला. त्या मागून इंटरनेट, स्मार्टफोन आले. टीव्हीनेही आपलं धूड बदलून स्मार्ट, स्लीम, एलईडी टीव्हीचं रूप घेतलं. आज व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्राम, फेसबुक, ओटीटीच्या लोकप्रियतेमुळे टीव्हीचं महत्व थोडं कमी झालंय पण तरीही टीव्हीची गरज असतेच. प्रत्येक माध्यमाची ठराविक वैशिष्ट्यं, काही फायदे, काही तोटे असतातच. आपण आपल्या टीव्हीवर काय बघायचं, किती वेळ बघायचं, नेमका कोणता हेतू मनात ठेवून बघायचं हे आपल्याच हाती आहे. मनोरंजन? शिक्षण? बातम्या? जगाची माहिती की टाईम पास? या माध्यमाचा योग्य तो फायदा करून घेण्याची जबाबदारी आपलीच आहे. कारण आपण एकटे नसतो तर सोबत कुटुंबही असतं. माध्यमाला वेगवेगळ्या चाळण्या लावण्याचा संस्कार करणंही आज विलक्षण गरजेचं आहे. पण माध्यमाची स्वतःचीही काही जबाबदारी असेलच ना? आज संपूर्ण विश्वात कुणीही, कुठेही, केव्हाही हे माध्यम बघू शकत असेल तर माध्यमाची जबाबदारी नक्कीच वाढते. आपल्या राज्याचं प्रतिनिधित्व करणाऱ्या मराठी वाहिन्या या आपल्या महाराष्ट्राचं चित्र योग्य स्वरूपात मांडतात का? दुर्दैवाने उत्तर नाहीं हेच आहे.

मराठी वाहिनीवरील कार्यक्रमांचा दर्जा, कल्पकता, वैविध्य, याविषयी बोलण्यासारखी परिस्थिती आहे आज? तंत्रज्ञानाने जगण्यावर कितीही आक्रमण केलं तरी आजही कुटुंबाचं महत्व, कौटुंबिक मूल्य आणि कौटुंबिक संस्कार यांची सर कुणालाच नाही. अशा कुटुंबाची नेमकी कोणती प्रतिमा आपल्या वाहिन्या निर्माण करत आहेत? अनेक वर्षांपासून एकच साचा. मोठ्ठं श्रीमंत कुटुंब. त्यात दोन गट. एक बुद्धिमान, कर्तृत्ववान, मनमिळावू प्रेमळ गट तर दुसरा कपटी, खलनायकी गट; ज्यात स्त्रियांचं वर्चस्व. (असं का?) या कुटुंबावर एकामागून एक संकटं येतच राहतात. (का?) या संकटांच्या वणव्यात खलनायकी गट कायम तेलाची धार ओतत असतो. घरातल्यांचं हे कुकर्तृत्व या बुद्धिमान(?) गटाला कधीच लक्षात येत नाही.(फारच बाई मठ्ठ). बरं, या कर्तृत्ववान, बुद्धीमान गटाचं कौशल्य सिध्द होईल असा एकही प्रसंग मालिकेत नसतो. म्हणजे खरं तर तो गटही 'ढ'च असतो. खलनायकी गट चिकाटीने पदार्थात मीठ ओतणं, दुधाच्या पेल्यात झोपेच्या गोळ्या टाकणं, महत्वाचं पत्र लपवणं, कपड्यांवर डाग पाडणं, रांगोळी विस्कटून टाकणं, डोक्यावर कुंडी पाडणं, फरशीवर साबणाचं पाणी पसरवणं, मेंदीत ॲसिड टाकणं अशा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कल्पक आणि अभिनव युक्त्या लढवण्यात व्यस्त असतो आणि हे कुणाच्याही लक्षात येत नाही. मनमिळावू गटातली स्त्री सोशिकतेची, प्रेमळपणाची, परिसीमा गाठणारी असते. कोणत्याही वाहिनीवरील कोणतीही मालिका लावा.. हेच चित्र असतं.

कुणी लग्न मोडतंय कुणी चक्क आयसीयूमध्ये जाऊन पेशंटला लावलेला ऑक्सीजन मास्क काढून फेकतंय तर कुणी सलाईनमध्ये गुपचूप एखादं इंजेक्शन टाकतंय, हे ही सर्रास पहायला मिळतं. काय हे? असं चित्र असतं का आपल्या कुटुंबात? इतक्या नकारात्मक व्यक्ती असतात आपल्या घरात? कसलीच नीतीमूल्यं नसणारी खलनायकी कुटुंबं दाखवून काय सिद्ध करायचंय? कधी तरी त्या कौटुंबिक अवास्तव आणि निरर्थक भांडणातून बाहेर पडणार की नाही? जगातले विषय संपले की काय? मालिकांचा आणि बुद्धीचा शून्य संबंध, कमालीचं कल्पनादारिद्र्य, दर्जाहीन लेखन, अर्थहीन संवाद. नामवंत म्हणवणारे कलाकारही निर्मितीमूल्यं नसणाऱ्या मालिकांमध्ये कसे काम करतात आणि सिध्दहस्त लेखकही इतकं सुमार लेखन कसं करतात हे एक कोडंच आहे. असो. जागतिक दूरचित्रवाणी दिनाच्या निमित्तानं यावर काही विचार होईल का? नाही तर आहेच आपली वीण दोघातली ही तुटे ना.. म्हणजे मराठी वाहिन्या आणि निर्बुद्धतेची हो. **

# जडेजाच्या फिरकी पुढे आफ्रिकेची दाणादाण

## भारताची सामन्यावर पकड; तिसऱ्या दिवशी विजय मिळवण्याची शक्यता







**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळवण्यात येत आहे. या मालिकेतील पहिला सामना कोलकाता येथील ईडन गार्डन्सवर सुरू आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला असून दक्षिण आफ्रिकेची दुसऱ्या डावात देखील दाणादाण उडाली आहे. रवींद्र जडेजाच्या जादुई फिरकीपुढे दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांचा निभाव लागू शकला नाही. आफ्रिकेने दुसऱ्या डावात ७ बाद ९३ धावा केल्या आहेत. कॉर्बिन बॉश आणि टेम्बा बावुमा क्रीजवर नाबाद राहिले आहेत. टेम्बा बावुमा २९ धावांवर नाबाद आहे, तर बॉश १ धावांवर नाबाद आहे. भारताकडून रवींद्र जडेजाने सर्वाधिक ४ बळी घेतले आहेत.

नाणेफेक जिंकून फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा संघ पहिल्या डावात फक्त ५५ षटकांमध्ये १५९ धावाच करू शकला. दक्षिण आफ्रिकेकडून एडेन मार्करामने सर्वाधिक ३१ धावा केल्या होत्या.

भारताकडून जसप्रीत बूमराने शानदार गोलंदाजी करत ५ विकेट्स घेतल्या. त्यामुळे दक्षिण आफ्रिका संघाला मोठी धावसंख्या उभरता आली नाही. प्रतिऊउत्तरात १५९ धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेला भारतीय संघ १८९ धावा उभ्या करू शकला.

आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या डावात भारतीय संघाने ३० धावांची आघाडी घेतली होती. भारताकडून केएल राहुलने सर्वाधिक धावा केल्या. त्याने ३९ धावांची खेळी केली. आफ्रिकेकडून सायमन हार्मरने ४ आणि मार्को जॅनसेनने ३ बळी घेतले.भारताने ३० धावांची आघाडी घेतली होती. दक्षिण आफ्रिका दुसऱ्या दिवशी मैदानात फलंदाजीसाठी उतरली. दुसऱ्या डावा त देखील दक्षिण आफ्रिका संघ काही खास करू शकला नाही. भारताच्या फिरकीपुढे दक्षिण आफ्रिकेचे फलंदाज हतबल दिसून आले. दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी भारतीय गोलंदाजीपुढे नांगी टाकली. एडेन मार्कराम ४, रायन रिकेल्टन ११, टोनी डी झोर्झी २, ट्रिस्टन स्टब्स ५, काइल व्हेरेन ९, मार्को जानसेन १३ धावा करून बाद झाले. तर दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा कर्णधार टेम्बा बावुमा २९ धावांवर नाबाद आहे, तर बॉश १ धावांवर नाबाद आहे.

भारताकडून रवींद्र जाडेजाने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या, तर कुलदीप यादवने २ आणि अक्षर पटेलने १ विकेट घेतली. आता दक्षिण आफ्रिकेने ६३ धावांची आघाडी घेतली असून त्यांचे आता ३ गडी शिल्लक आहे. तिसऱ्या दिवशी भारत दक्षिण आफ्रिका संघाला कमीत कमी धाव धावसंख्येवर रोखून तिसऱ्याच दिवशी विजय मिळवण्याच्या प्रयत्नात असेल.

### जडेजाची कमाल

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिल्या कसोटी सामन्यात रवींद्र जाडेजाने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. त्याने कसोटी क्रिकेटमध्ये ४,००० धावा आणि किमान ३०० विकेट्स घेत ही कामगिरी केली आहे.

### ऐतिहासिक कामगिरी

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळली जात आहे. या मालिकेतील पहिला सामना कोलकाता येथील ईडन गार्डन्सवर खेळला जात आहे. या सामन्यात भारताचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जेडेजाने खास कामगिरी केली आहे. जगातील नंबर १ कसोटी अष्टपैलू खेळाडूने १५ नोव्हेंबर रोजी आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. त्याने कसोटी क्रिकेटमध्ये ४,००० धावा आणि किमान ३०० विकेट्स घेत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. अशी कामगिरी करणारा जडेजा दुसरा भारतीय आणि जगातील एकमेव चौथा क्रिकेटपटू बनला आहे. जामनगरमध्ये जन्मलेला रवींद्र जडेजा सध्या कोलकाता येथील ईडन गार्डन्स येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ८८ वा कसोटी सामना खेळत असून त्याला हा पराक्रम साध्य करण्यासाठी फक्त १० धावांची गरज होती. त्याने सामन्याच्या दुसऱ्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात १० धावा करत मोठी कामगिरी केली. रवींद्र जाडेजाने गोलंदाजीसह, आधीच ३३८ कसोटी विकेट्स घेण्याची किमया साधली आहे, ज्यामुळे तो जगातील सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत अव्वल स्थानी आहे.

# केशिकाने पटकावला तिहेरी मुकुट



**| नाशिक | प्रतिनिधी |**

भविष्यातील आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून ती सातत्याने अथक परिश्रम घेते. आशियाई स्पर्धा, राष्ट्रकुल स्पर्धा आणि ऑलिम्पिकमध्ये भारतीय तिरंगा उंचावण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी केशिका निर्धाराने पुढे सरकत आहे. शिका श्रीकृष्ण पूरकर या उदयोन्मुख टेबल टेनिसपटूने २०२५ या वर्षात जिल्हा आणि राज्य स्तरावर चमकदार कामगिरीची नोंद करीत क्रीडा विश्वाचे लक्ष वेधून घेतले आहे. तिने विविध वयोगटांमध्ये सातत्यपूर्ण खेळ दाखवत अनेक विजेतेपदे पटकावली. कौतुकाची बाब म्हणजे यंदा जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये केशिकाने आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. जिल्हास्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत तिने तिहेरी मुकुट पटकावण्याचा बहुमान मिळविला. या स्पर्धेत तिने १३ वर्षांखालील, १५ वर्षांखालील आणि १७ वर्षांखालील अशा तिन्ही वयोगटांमध्ये सुवर्णपदकांवर आपले नाव कोरले. या व्यतिरिक्त सेकंड डिस्ट्रिक्ट रँकिंग २०२५ स्पर्धेतही तिने १३ व १५ वर्षांखालील गटात सुवर्णपदक आणि १७ वर्षांखालील गटात रौप्यपदक जिंकले. या कामगिरीमुळे ती या सत्रातील सर्वांत सातत्यपूर्ण खेळाडूंपैकी एक ठरली आहे. राज्य स्तरावरही केशिकाची कामगिरी ऐतिहासिक राहिली. तिने राज्यस्तरीय स्पर्धाही गाजविल्या आहेत. तिने सलग चार राज्य मानांकन स्पर्धा जिंकण्याचा अभूतपूर्व विक्रम केला. या चारही स्पर्धांमध्ये ती अपराजित राहिली. पहिल्या राज्य मानांकन (ऐरोली, ठाणे) स्पर्धेत १३ वर्षांखालील गटातून सुवर्णपदक पटकावताना, १५ वर्षांखालील गटातून उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारली. दुसऱ्या राज्य मानांकन (सांगली) स्पर्धेत १३ वर्षांखालील गटातून सुवर्णपदक पटकावले. तिसऱ्या राज्य मानांकन (नागपूर) मध्ये १३ वर्षांखालील गटातून सुवर्णपदक, नाशिकला झालेल्या चौथ्या राज्य मानांकन स्पर्धेत सुवर्ण व पुणे येथे झालेल्या राज्य मानांकन स्पर्धेत १३ वर्षांखालील गटात रौप्य आणि १५ वर्षांखालील गटातून कांस्यपदकाची कमाई केली.

### श्रीलंकेच्या खेळाडूंना राष्ट्रपतींची सुरक्षा

**नवी दिल्ली :** श्रीलंकेच्या काही खेळाडूंना मायदेशात परण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र श्रीलंका क्रिकेट बोर्डाने त्यांच्या संघाला पाकिस्तानचा दौरा कायम करण्यास सांगितले, तर माघारी येणाऱ्या खेळाडूची चौकशी करणार असल्याचेही स्पष्ट केले. त्यामुळे श्रीलंकेचा संघ सध्या पाकिस्तानमध्येच आहेत. बदललेल्या वेळापत्रकानुसार पाकिस्तान आणि श्रीलंका संघातील वनडे मालिकेतील दुसरा आणि तिसरा सामना अनुक्रमे १४ आणि १६ नोव्हेंबर रोजी होईल. दरम्यान, श्रीलंकेने मालिका कायम खेळण्याचा निर्णय घेतला असल्याने पाकिस्तानकडून श्रीलंकेच्या संघाला मोठ्या प्रमाणात सुरक्षा पुरवण्यात आल्याचे दिसत आहे.

### मुंबई शहर जिल्हा अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा

## विजय क्लब, गोलफादेवी, सिद्धिप्रभा उपांत्य फेरीत



**| मुंबई | प्रतिनिधी |**

विजय क्लब, गोलफादेवी, सिद्धिप्रभा, जय भारत यांनी पश्चिम, तर साऊथ कॅनरा, अमर, शिवनेरी, नवोदित यांनी पूर्व विभागात मुंबई शहर कबड्डी असो. ने आयोजित केलेल्या निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत कुमार गटात उपांत्या फेरी गाठली. मुंबईतील भारतीय क्रीडा मंदिराच्या पटांगणावर सुरु असलेल्या पश्चिम विभागातील कुमारांच्या उपांत्यापूर्व फेरीत विजय क्लब-अ ने चुरशीच्या लढतीत वीर संताजीला २९-२५ पराभूत केले. विश्रांतीला १४-०९ अशी आघाडी घेणाऱ्या विजय क्लबने नंतर मात्र सावध खेळ करीत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

शिवम यादव, मनिष वासकर विजयकडून, तर उत्तम सिंग, निशांत चव्हाण वीर संताजीकडून उत्तम खेळले. ओमकार शिंदे, अमोल गायकवाड यांच्या चढाई पकडीच्या खेळाने गोलफादेवी सेवाने एफर्ड्स युनायटेडला ४२-२०असे नमवीत आगेकूच केली. एफर्ड्सचा तन्मय कदम चमकला. सिद्धिप्रभा फॉऊंडेशनने सुनील स्पोर्टस्‌चा ४३-१५असा पाडाव केला. सिद्धेश भोसले, विशाल गाढवे यांच्या झंझावाती खेळाला या विजयाचे श्रेय जाते. सुनिलचा अमेय दळवी बरा खेळला. जय भारतने विजय क्लब 'ब' चा ३०-१३ असा सहज पाडाव केला तो श्रेयस मटकर, तन्मय बावकर यांच्या आक्रमक खेळाने. विजयचा जयकिसन चव्हाण बरा खेळला.

पूर्व विभागातील कुमारांच्या उपांत्यापूर्व सामन्यात साऊथ कॅनराने यश मंडळाला वर ३२-२९ असा विजय मिळविला. विश्रांतीला चिराग लिमकर, अभिजित यांच्या आक्रमक खेळाने कॅनरा संघाने १५-०८ अशी आघाडी घेतली होती. विश्रांतीनंतर सूर सापडलेल्या श्रवण पवार, अल्केश निचोरे यांनी कडवी लढत देत सामन्याची रंगत वाढविली. पण यश मंडळाला विजय मिळवून देण्यात ते कमनशिबी ठरले. काळाचौकीच्या अमर मंडळाने शिवशक्ती मंडळाला ४१-४० असे चकवीत आपली घोडदौड सुरूच ठेवली. पूर्वार्धात २५-१५ अशी आघाडी घेणाऱ्या अमरला उत्तरार्धात विजयासाठी शिवशक्तीने चांगलेच झुंजविले. शेवटी १ गुणाच्या फरकाने त्यांनी विजयाला गवसणी घातली. साहिल बनगर, सागर राजपूत अमर कडून, तर साई चौगुले, शुभम तळवडे शिवशक्ती कडून उत्कृष्ट खेळले. शिवनेरी सेवा ने न्यू परशुराम संघावर ४२-२४ अशी मात करीत आपला विजय साकारला. यश चोरगे, नीरज ठोंबरे या विजयाचे शिल्पकार ठरले. न्यू परशुरामच्या समर्थ कासुर्डे, हर्ष चव्हाण यांनी उत्तम लढत दिली.

### इशाला रौप्यपदक

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

इशा सिंग हिने कैरो येथे पार पडलेल्या जागतिक अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेतील महिलांच्या २५ मीटर पिस्तूल प्रकारात ब्राँझपदकावर मोहर उमटवली. मनू भाकर हिला मात्र पदकापासून दूर राहावे लागले. महाराष्ट्राच्या राही सरनोबत हिलाही अपयशाचा सामना करावा लागला. भारतीय नेमबाजांनी या अत्यंत महत्त्वाच्या स्पर्धेमध्ये तीन सुवर्ण, पाच रौप्य व चार ब्राँझ अशी एकूण १२ पदकांची कमाई केली. महिलांच्या २५ मीटर पिस्तूल प्रकाराच्या पात्रता फेरीमध्ये मनू भाकर व इशा सिंग या भारतीय नेमबाजांनी छान खेळ केला. इशा सिंग हिने ५८७ गुणांसह पाचवे स्थान पटकावले. मनू भाकर हिने ५८६ गुणांसह सहावे स्थान पटकावले.

# पोर्तुगालच्या रोनाल्डोला रेड कार्ड



**| डबलिन | वृत्तसंस्था |**

पोर्तुगालचा दीर्घकाळचा तारणहार ख्रिस्तियानो रोनाल्डोला त्याच्या २२ वर्षांच्या दैदीप्यमान कारकिर्दीत प्रथमच रेड कार्डला सामोरे जावे लागले. फिफा विश्वचषक २०२६ पात्रता फेरीतील सामन्यात आयर्लंडच्या बचावपटू दारा ओफशेला कोपर मारल्यामुळे त्याच्यावर ही कारवाई करण्यात आली. आताअर्मे नियाविरुद्ध होणाऱ्या पुढील पात्रता लढतीत ४० वर्षांच्या रोनाल्डोला पहिल्या सामन्यात खेळता येणार नाही, असे चित्र आहे. डबलिन येथे झालेल्या आयर्लंड विरुद्ध पोर्तुगाल या गट पात्रता सामन्यात रोनाल्डोने गोलानंतर फिरताना उजव्या हाताचा कोपर ओफशेच्या पाठीवर मारला.

रेफ्रीनी याची गांभीर्याने दखल घेत रोनाल्डोला लगेचच रेड कार्ड दाखवले आणि पुढे व्हिडीओ रेफरलनंतर देखील हा निर्णय कायम ठेवण्यात आला. मैदानाबाहेर जाताना रोनाल्डोने आक्षेपार्ह हातवारे केले. आयर्लंडच्या प्रेक्षकांकडून होणाऱ्या चिडवण्यावर तो थांबून टाळ्या व दोन अंगठे उंचावून उपरोधिक प्रतिक्रिया देताना दिसला. आश्चर्य म्हणजे या सामन्यात आयर्लंडने २-० असा आश्चर्यकारक विजय नोंदवला. रोनाल्डोला आंतरराष्ट्रीय वरिष्ठ कारकिर्दीत २२५ व्या सामन्यात पहिल्यांदाच रेड कार्ड मिळाले आहे. त्याच्या संपूर्ण कारकिर्दीत हा १२ वा रेड कार्ड आहे. मागील रेड कार्ड त्याला गेल्या वर्षी अल नासरसाठी अल हिलालविरुद्ध मिळाले होते. येत्या रविवारी पोर्तुगालचा अर्मे नियाविरुद्ध पुढील लढत होत असून येथे विजय मिळवल्यास पोर्तुगालचा संघ विश्वषकासाठी पात्र ठरणार आहे. आगामी विश्वचषक स्पर्धा अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको येथे होणार आहे. रोनाल्डोसाठी आगामी विश्वषक स्पर्धा शेवटचीआपण सहाव्या विश्वचषकात खेळणार असून त्यानंतर निवृत्त होत असल्याचे रोनाल्डोने यापूर्वीच जाहीर केले आहे.

भारताची पहिल्या स्थानावर झेप | सहा सुवर्ण, तीन रौप्य व एक कांस्य

# आशियाई तिरंदाजीत भारतीयांचा पदकांचा पाऊस

**| ढाका | वृत्तसंस्था |**

भारतीय तिरंदाजांनी आशियाई अजिंक्यपद स्पर्धेमध्ये पदकांची लयलूट करीत पहिल्या स्थानावर झेप घेतली. भारतीय खेळाडूंनी या प्रतिष्ठेच्या स्पर्धेमध्ये सहा सुवर्ण, तीन रौप्य व एक कास्यं अशी एकूण १० पदके पटकावली. दक्षिण कोरियन तिरंदाजांनीही १० पदके पटकावली, मात्र त्यांना दोनच सुवर्णपदके पटकावता आली. यामुळे त्यांना दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले.

धीरज बोम्मादेवरा याने पुरुषांच्या रिकर्व्ह प्रकारात आणि अंकिता भकत हिने महिलांच्या रिकर्व्ह प्रकारात सुवर्णपदक पटकावले. धीरज बोम्मादेवरा याने अंतिम फेरीत राहुलला पराभूत केले. या प्रकारात रौप्यपदकही भारतालाच मिळाले. महिलांमध्येही रौप्यपदकाची लढत भारतीय खेळाडूंमध्ये रंगली. संगीताने दीपिकाकुमारीला पराभूत करीत रौप्यपदक आपल्या नावावर केले. अंकिता भकत हिच्यासमोर सुवर्णपदकासाठीच्या लढतीत पॅरिस ऑलिंपिकमध्ये रौप्यपदक पटकावलेल्या दक्षिण कोरियाच्या नाम सुहयेऑन हिचे आव्हान होते. .पहिला सेट भारतीय खेळाडूने २९-२७ असा जिंकत २-० अशी आघाडी घेतली. पुढील सेटमध्ये २६-२६ अशा बरोबरीमुळे अंकिताकडे ३-१ अशी आघाडी कायम राहिली. तिसरा सेट दक्षिण कोरियन खेळाडूने २८-२६ असा जिंकला व ३-३ अशी बरोबरी साधली. चौथा व पाचवा असे दोन्ही सेट अंकिता भकत हिने प्रत्येकी २९-२८ अशा एका गुणाने जिंकत सुवर्णपदकावर हक्क सांगितला.

### अचूक लक्ष्यभेद

आशियाई स्पर्धा, तीन सुवर्ण आणि एक रौप्य.शूटऑफमध्ये दीपिकाचा पराभवअंकिता भकत व दीपिकाकुमारी या दोन भारतीय महिला खेळाडूंमध्ये रिकर्व्ह प्रकाराची उपांत्य फेरी रंगली. या लढतीत पहिल्या तीन सेटनंतर अंकिता भकत हिच्याकडे ५-१ अशी आघाडी होती. दीपिकाकुमारीने चौथा व पाचवा असे दोन्ही सेट आपल्या नावावर करीत ५-५ अशी बरोबरी साधली. त्यामुळे निकालासाठी शूटऑफचा अवलंब करण्यात आला. शूटऑफमध्ये दोन्ही खेळाडूंनी नऊ गुणांचा वेध घेतला, मात्र अंकिताने सोडलेला बाण हा मध्यभागाच्या जवळ असल्यामुळे तिला विजयी घोषित करण्यात आले आहे.



# निवडक

### महाराष्ट्राचा उत्तराखंडवर दणदणीत विजय



**पुणे :** रांची येथे सुरू असलेल्या बीसीसीआयच्या २३ वर्षांखालील गटाच्या एकदिवसीय राज्य करंडक एलिट 'अ' गटाच्या साखळी क्रिकेट स्पर्धेत सागर पवार आणि नीरज जोशीने केलेल्या अर्धशतकाच्या जोरावर महाराष्ट्राने बडोदा उत्तराखंड संघावर नऊ गडी राखून विजय मिळविला. महाराष्ट्राचा हा सलग तिसरा विजय आहे. उषा मार्टिन मैदानावर गुरुवारी झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या उत्तराखंडचा डाव १२० धावांत गुंडाळला गेला. त्यांची ७ बाद ४३ अशी स्थिती असताना कर्णधार हर्ष राणाने तळाच्या अनमोल आणि देवांश शर्माने डाव सावरला शुभम मेडने तीन तर अजय बोरुडेने दोन गडी बाद केले. प्रत्यूत्तर देताना महाराष्ट्राने एक बाद १२२ धावा करून विजय मिळविला. यावेळी सागर पवारने ३२ चेंडूत आठ चौकार व तीन षटकारांसह ५२ धावा तर नीरज जोशीने ३० चेंडूत आठ षटकार व चार चौकारांसह नाबाद ६७ धावा केल्या. धावफलक : उत्तराखंड - सर्वबाद १२० (हर्ष राणा ३८, देवांश शर्मा २१, अनमोलसिंग १९, शुभम मेड ३-३४, अजय बोरुडे २-९, प्रथमेश गावडे १-१५, नीरज जोशी १-१७, रोशन वाघसरे १-२६) पराभूत विरुद्ध महाराष्ट्र - १ बाद १२२ (नीरज जोशी नाबाद ६७, सागर पवार ५२, ध्रूवसिंग १-२९)

### पिकलबॉल स्पर्धेचे उद्घाटन



**नवी दिल्ली :** भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने इंडियन पिकलबॉल असोसिएशनला अधिकृत राष्ट्रीय क्रीडा महासंघ मान्यता दिल्यानंतर ही पहिलीच राष्ट्रीय स्पर्धा आहे. २० हून अधिक राज्यांमधील ९०० हून अधिक पिकलबॉल खेळाडू या स्पर्धेत सहभागी होत आहेत, जे १२ वर्षांखालील ते ७०+ वयोगटातील पुरुष, महिला आणि मिश्र स्वरुपात वयोगटातील आणि कौशल्य श्रेणींमध्ये आयोजित केलं जातं. इंडियन पिकलबॉल असोसिएशनला मान्यता मिळाल्यानंतर पहिल्यांदाच पिकलबॉल राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा आयोजित केली जात आहे हा एक ऐतिहासिक क्षण आहे.

### लक्ष्य सेन उपांत्यपूर्व फेरीत



**नवी दिल्ली :** भारताचा स्टार बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन याने कुममातो मास्टर्स जपान बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. त्याने गुरुवारी झालेल्या सामन्यात सिंगापूरच्या जिया हेंग जेसन तेहचा सरळ गेममध्ये पराभव करून आपले स्थान निश्चित केले. मात्र, दुसरीकडे भारताचा अनुभवी खेळाडू एच.एस. प्रणॉय याचा प्रवास दुसऱ्या फेरीतच संपुष्टात आला. प्रणॉयला ४६ मिनिटे चाललेल्या या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात डेन्मार्कच्या रासमस गेम्केकडून १८-२१, १५-२१ अशा फरकाने पराभवाला सामोरे जावे लागले. लक्ष्यचा ३९ मिनिटांत विजयसन २०२१ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचा कांस्यपदक विजेता असलेल्या लक्ष्य सेन-ने जगातील २०व्या क्रमांकाच्या तेहवर ३९ मिनिटांत २१-१३, २१-११ असा सहज विजय मिळवला. संपूर्ण सामन्यात लक्ष्यचेच वर्चस्व पाहायला मिळाले. त्याने सिंगापूरच्या खेळाडूला पुनरागमन करण्याची कोणतीही संधी दिली नाही. आता उपांत्यपूर्व फेरीत लक्ष्य सेनची लढत जागतिक क्रमवारीत १५व्या स्थानी असलेल्या सिंगापूरच्या माजी विश्वविजेत्या लोह कीन यू याच्याशी होणार आहे. लक्ष्यने प्रतिस्पर्ध्याला दिली नाही संधीप्री-क्वार्टर फायनलमध्ये लक्ष्यने पहिल्या गेममध्ये ८-५ अशी आघाडी घेतली होती. त्यानंतर तेहने थोड्या वेळासाठी १०-९ अशी नाममात्र आघाडी घेतली असली तरी, ब्रेकपर्यंत भारतीय खेळाडूने पुन्हा आघाडी मिळवली. १४-१३ अशा स्कोअरपर्यंत दोन्ही खेळाडूंमध्ये चुरशीची लढत झाली, पण यानंतर लक्ष्यने सलग सात गुण मिळवून पहिला गेम आपल्या नावावर केला. दुसऱ्या गेममध्येही लक्ष्यने सुरुवातीपासूनच उत्कृष्ट खेळ दाखवला आणि लवकरच ५-० अशी आघाडी घेतली. इंटरव्हलपर्यंत त्याने ११-३ अशी मोठी आघाडी घेऊन आपल्या प्रतिस्पर्धकाच्या आशा धुळीस मिळवल्या. यानंतरही भारतीय खेळाडूने आपली लय कायम ठेवली आणि सहजपणे सामना जिंकला.

### वैभवच्या ४२ बॉल १४४ धावा



**नवी दिल्ली :** आशिया कप रायझिंग स्टार २०२५-२६ स्पर्धेतील युएई विरूद्ध पहिल्याच सामन्यात वैभव सुर्यवंशीने खतरनाक खेळी केली आहे. या सामन्यात सुर्यवंशी एकटा पूरून उरला होता. कारण सुर्यवंशीने एकट्याने या सामन्यात ४२ बॉलमध्ये १४४ धावा केल्या होत्या. त्याच तुलनेत युएई १२० बॉल म्हणजेच २० ओव्हरमध्ये १५० ही धावा गाठू शकली नाही. त्यामुळे त्यांचा १४८ इतक्या मोठ्या फरकाने पराभव झाला आहे. म्हणूनच सुर्यवंशी युएईला एकटाचा काफी ठरला. भारताने प्रथम फलंदाजी करताना ४ विकेट गमावून २९७ धावा केल्या होत्या. त्यामुळे युएईसमोर २९८ धावांचे आव्हान होते. या आव्हानाचा पाठलाग करताना युएईची सूरूवात खराब झाली होती. युएईच्या सलामीवीर स्वस्तात बाद झाले होते. युएईकडून सोहेब खान या एकट्या खेळाडूने सर्वाधिक ६३ धावा केल्या होत्या. त्याच्या व्यतिरीक्त कोणत्याही खेळाडूला मोठ्या धावा करता आल्या नव्हत्या. त्यामुळे युएई २० ओव्हरमध्ये फक्त ७ विकेट गमावून १४९ धावांपर्यंत मजल मारू शकली होती.त्यामुळे भारताने १४८ इतक्या मोठ्या फरकाने युएईचा पराभव केला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)